म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का०वा०
दा. क्र. 3369.



IRBK-0103389
IRBK-0103389

मराठी भाषेचे शिवाजी

# 'माला'कार चिपळूणकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.



G10ch0
3389

मराठी भाषेचे शिवाजी

# ' माला '-कार
# कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. 3389 नों. दि ..............
वि. ........ क्र. ..................

IRBK-0103389
IRBK-0103389

लेखक
वा. दा. गोखले

किंमत एक रुपया

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २.

मुद्रक :
रा. ना. सरनाईक
सुलभ मुद्रणालय,
२९१ शनिवार, पुणें २.

★

प्रकाशक :
दा. त्र्यं. जोशी, बी. ए. ( टिळक ),
चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव,
पुणें २.

★

प्रथमावृत्ति
२० मे १९५०

अनुक्र. २९७६ वा. ९९८६ 3-7-61

# प्रास्ताविक

मराठी भाषेचे शिवाजी ‘ माला ’-कार विष्णु कृष्ण चिपळूणकर यांचें हें चरित्र त्यांच्या शताब्दिदिनीं प्रसिद्ध होत आहे. शास्त्रीबुवांचें चरित्र त्यांचे बंधु कै. लक्ष्मणराव यांनीं प्रथम १८९४ सालीं लिहून प्रकाशित केलें. तत्पूर्वीं कै. खंडेराव भिकाजी बेलसरे यांनीं ‘ निबंध माला-कार विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या चरित्राचें व लेखांचें साधारण स्वरूप ’ (तसबिरीसहित) वाचकांपुढें ठेविलें होतें. त्यानंतर शास्त्रीबुवांसंबंधीं पुष्कळच अनुकूल प्रतिकूल टीकात्मक लिहिलें गेलें, तरीसुद्धां शास्त्रीबुवांचें वाङ्मयीन स्थान विक्रमार्जित असल्यामुळें अद्यापि विलोभनीय असेंच आहे. प्रस्तुत पुस्तकांत शास्त्रीबुवांचें चरित्र व वाङ्मयीन कार्य यांची माहिती देऊन त्यांच्या राजकीय पंथाचें मूल्य व महत्त्व अजमावण्याचा प्रयत्न केला आहे. प्रौढांस व विद्यार्थ्यांस या पुस्तकाच्या वाचनानें मोठा लाभ होईल अशी खात्री आहे.

आधार म्हणून पुढील ग्रंथांचा उल्लेख करणें आवश्यक आहे:—

१. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचें चरित्र. प्रकाशन-वर्ष : १८९४, १९२१
लेखक : कै. लक्ष्मण कृष्ण चिपळूणकर.

२. निबंधमालाकार विष्णुशास्त्री चिपळूणकर : प्रकाशन-वर्ष : १८९१.
लेखक : कै. खंडेराव भिकाजी बेलसरे.

३. मराठी गद्याचा इंग्रजी अवतार. लेखक : द. वा. पोतदार.

४. लो. टिळक यांचें चरित्र. खंड १ ला. लेखक : न. चिं. केळकर.

५. अर्वाचीन वाङ्मय-सेवक. प्रथम खंड चिपळूणकर चरित्र.
लेखक : वा. दा. गोखले.

६. न्यायमूर्ति म. गो रानडे. लेखक : न. र. फाटक.

यांशिवाय नियतकालिकांतील अनेक लेखांचेंहि साहाय्य झालें आहे.

वरील सर्व पुस्तककर्त्यांचे व लेखकांचे, त्याचप्रमाणें ' चित्रशाळा ' व ' सुलभ ' मुद्रणालयांचे आम्ही फार आभारी आहोंत.

ज्येष्ठ शुद्ध २, शके १८७२
शनिवार, २० मे १९५०
पुणें २.

— लेखक

## “ माला ”—कार

# कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर

### चरित्र-प्रयोजन

महाराष्ट्रांत इंग्रजी सत्ता बद्धमूल झाली व लोक इंग्रजांच्या वैभवानें कांहीं काल दिपून गेले. समाजाची ही मूढावस्था घालविण्याचा प्रयत्न ज्या अनेक महाराष्ट्रीय नेत्यांनीं केला, त्या नेत्यांच्या मालिकेंत कै. विष्णु कृष्ण चिपळूणकर यांचा समावेश केला जातो. आपल्या अल्पजीवितावधींत शास्त्रीबोवांनीं प्रचंड उद्योग केला. आपल्या प्रभावी लेखणीनें मराठी भाषेला त्यांनीं विलोभनीय सौंदर्य प्राप्त करून दिलें. निराशेच्या खोल गर्तेंत पडलेल्या महाराष्ट्रीय मनापुढें स्वाभिमानाचा दीप प्रज्वलित करून त्यांनीं अमोघ मार्गदर्शन केलें; महाराष्ट्रांत संस्थागत जीवन निर्माण करून मोठ्या अभिनिवेशानें तरुणांना स्वराज्योन्मुख केलें; या व अशारीतीच्या अनेकविध कार्यांचा परिणाम प्रभावी झाला व त्याचें दृश्य फल आपण आज आस्वादित आहोंत. स्वराज्यांतील तरुणांनीं स्वराज्यप्राप्तीसाठीं कणाकणांनीं आणि क्षणाक्षणांनीं तनु-मन-धन अर्पण करण्याच्या महाभागांचीं चरित्रें अनेकदां वाचलीं पाहिजेत, त्यांचें मनन केलें पाहिजे, व त्यांच्या चारित्र्याचा आदर्श नजरेसमोर ठेवला पाहिजे. शास्त्रीबोवांचा जन्म होऊन आज शतक संपत आहे, म्हणूनच तरुण वाचकांना आम्ही शास्त्रीबोवांच्या चरित्राचें स्मरण करून देत आहोंत.

## तत्कालीन परिस्थिति

विष्णुशास्त्र्यांची सार्वजनिक कामगिरी पूर्णपणें आकलन होण्यासाठीं तत्कालीन परिस्थितीची माहिती असणें आवश्यक आहे. दुसऱ्या बाजीरावानें आपलें सात कोटींचें राज्य इंग्रज ' प्रभू ' च्या चरणारविंदीं अर्पण केलें. हळूहळू महाराष्ट्रावर इंग्रजांनीं आपली राजकीय सत्ता प्रस्थापित केली. इंग्रजांनीं बरोबर आणलेल्या नवीन सुधारणा, त्यांनीं सुरू केलेलें नवीन शिक्षण, त्यांनीं अमलांत आणलेली शांतताप्रधान राज्यव्यवस्था या सर्वांमुळें राष्ट्राचा नूर एकदम पालटला. पेशवाईच्या अखेरच्या कालांतील हालअपेष्टा जुलूम, लुटालूट हीं नाहींशीं झालीं व जिकडे तिकडे शांतता नांदूं लागली.

इंग्रज व्यापारी मोठा धूर्त, तराजू बाजूला टाकून त्यानें नंगी तरवार हातांत घेतली पण तिचा वापर मोठ्या शहाणपणानें केला. आपली सत्ता लोकप्रिय व्हावी याची खबरदारी इंग्रजांनीं इतकी घेतली कीं, आपण परतंत्र-तेच्या पिंजऱ्यांत अडकत आहोंत असें प्रजेंतील शहाण्यांनासुद्धां वाटलें नाहीं. उलट सर्व प्रजा या नवीन ' प्रभू '-वर बेहद्द खुष होती. शिकलेसवरलेले लोक ' स्वत्व ' विसरून परकीय प्रभूच्या ' यशोगानांत ' मग्न झाले होते. " मागील सर्व दुःखें विसरून जा व इंग्रज प्रभूच्या राज्यांत यथास्थित सुख उपभोगा " असा संदेश एका तत्कालीन पंडितश्रेष्ठानें जनतेस काव्य-द्वारां दिला आहे.

परंतु महाराष्ट्र खरोखर सुदैवी आहे ! ' स्वत्व ' विसरून दास्याच्या खाईंत खितपत पडूं पाहणाऱ्या या समाजांत कांहीं महान् व्यक्ती जन्माला आल्या. त्यांनीं इंग्रजी कावा पूर्णपणें ओळखला. आपल्या गुलामगिरीची त्यांना जाणीव झाली. स्वर्गीय सुखानें भरलेलें का असेना पण दास्य तें दास्यच ! त्यांतून समाजाची मुक्तता करणें हें त्यांनीं आपलें ध्येय ठरविलें. विष्णुशास्त्री चिपळूणकर हे याच महनीय विभूतींपैकीं एक होत.

## मूळ घराणें

स्वराज्याच्या ऐन अमदानींत पुणें शहराला राजधानीचें वैभव प्राप्त झालें. साहजिकच इतर प्रांतांतून अनेक कुटुंबें भाग्योदयाच्या इच्छेनें पुण्यास येऊन राहिलीं. चिपळूणकर-घराणें अशांपैकींच एक होतें. चिपळूणकर हे मूळ रत्नागिरी जिल्ह्यांतील पांवस गांवचे राहणारे. त्यांतील एक पुरुष सतराव्या शतकांत त्र्यंबकेश्वरीं येऊन राहिला. पुढें १८०२ सालीं दक्षिणेंत होळकरी दंगा झाला तेव्हां चिपळूणकर-कुटुंब पुण्याला येऊन स्थायिक झालें. घरांतील मुख्य पुरुष हरिपंत हे पेशव्यांकडे शागीर्द म्हणून राहिले. पुढें पेशव्यांनीं पुण्याचा त्याग केला. हरिपंतांची शागिर्दी थांबली व त्यांनीं बरेच दिवस गरिबींत काढले. १८२४ सालीं त्यांना पुत्ररत्न लाभलें. हेच प्रसिद्ध कृष्णशास्त्री चिपळूणकर. आपल्या चरित्रनायकांचे वडील. कृष्णशास्त्री लहानपणापासूनच अत्यंत बुद्धिमान्. पाठशाळेंत त्यांची बरोबरी करणारा एकहि विद्यार्थी नव्हता. त्यांचें अध्ययन त्या वेळचे प्रसिद्ध पंडित मोरशास्त्री साठे यांच्या हाताखालीं झालेलें. शिष्याचें बुद्धिप्रागल्भ्य पाहून मोरशास्त्र्यांनीं मोठ्या अभिमानानें त्यास ‘ बृहस्पति ’ ही पदवी दिली. गुरुजींच्या उपदेशानेंच कृष्णशास्त्र्यांनीं इंग्रजीचें अध्ययन आरंभिलें व अत्यंत अल्पावधींत इंग्रजीवर प्रभुत्व संपादन केलें. यामुळें जुन्या पंडितांत व नवीन विद्वानांत त्यांची प्रतिष्ठा वाढली व सरकारी कृपेखालीं त्यांचा अधिकारहि दिवसेंदिवस वृद्धिंगत झाला.

## जन्म व गृह-संस्कार

अशा बुद्धिवान् पुरुषांचे विष्णुशास्त्री हे ज्येष्ठ चिरंजीव. त्यांचा जन्म पुणें येथें २० मे १८५० रोजीं झाला. कृष्णशास्त्री विद्वान् होते, ख्यातनाम शिक्षक होते; परंतु ते घरांत विशेष लक्ष देत नसत. आपल्या लहान मुलांस जवळ घेऊन ते कांहीं शिकवीत आहेत असें दृश्य कधीं कुणास दिसलें नाहीं. घरांत हरिपंत आजोबा व भागीरथी आजीबाई हीं होतीं. त्यांचाच अंगाखांद्यां-

वर मुलेंबाळें असायचीं. हरिपंत मोठे सालस व धर्मनिष्ठ होते. वृद्धावस्थेंतहि आपल्या कडक आचरणांत त्यांनीं कधीं खंड पाडला नव्हता. आजा-आजोंच्या नैतिक व धार्मिक आचरणाचे सर्व सुसंस्कार विष्णूच्या बालमनावर चिरंतन स्वरूपाचे झाले व त्याचें भावी चारित्र्य निर्मळ होण्यास या संस्कारांचें साहाय्य झालें हें निःसंशय. कृष्णशास्त्री मधूनमधून केव्हां तरी मुलाच्या शिक्षणाची चौकशी करीत. अशाच एका प्रसंगीं त्यांनीं लहानग्या विष्णूस विचारलें, "काय रे, कितवा नंबर आहे तुझा वर्गांत?" तेव्हां तो बराच खालीं असल्याचें त्यांना आढळून आलें. घरांत चौकशी झाली, तींत असें निष्पन्न झालें कीं जेवणें वेळेवर होत नसल्यामुळें मुलांस शाळेंत जाण्यास उशीर होतो. शास्त्रीबोवांनीं एकदम ताकीद दिली कीं, "यापुढें वेळेवर मुलांच्या जेवण्याची तजवीज न झाली तर बाहेर दुसरी सोय पाहावी लागेल!" तेव्हांपासून उशीराचें नांव राहिलें नाहीं!!

## शिक्षण

लहानग्या विष्णूनें शिक्षणाचा आरंभ घरींच केला. सहा-सात वर्षांचा होईतों त्याची सर्व उजळणी व लेखन-वाचन झालें होतें. इंग्रजांच्या नवीन शिक्षणपद्धतीनुसार बुधवारच्या वाड्यांत एक 'इन्फंट् स्कूल' सुरू झालें होतें. त्यांत विष्णु प्रथम दाखल झाला. शाळेंतील शिक्षक रावजी साठे हे आपल्या कामांत मोठे प्रवीण होते. मोठेपणींहि विष्णुशास्त्री साठेगुरुजींची आदरानें आठवण काढीत. या शाळेंतून विष्णु एका इंग्रजी–मराठी शाळेंत गेला. ही शाळा सदाशिव पेठेंत नागनाथाच्या पाराशेजारीं होती. सव्वा वर्षांत विष्णूनें दोन 'बुकें' इंग्रजी शिकून पार केलीं. या शाळेंत शिकत असतांनाच सन १८५९ सालीं विष्णूचा व्रतबंधनसंस्कार मोठ्या समारंभानें पार पडला. घरीं संध्या, पूजा वगैरेंचें अध्ययन चाले. शाळेंत व्यावहारिक विद्याभ्यास होई. मुंज झाल्यावर एका गांवठी शाळेंत वर्ष सव्वा वर्ष घालविल्यावर सन १८६१ सालीं विष्णु पूना हायस्कुलांत प्रविष्ट झाला. एकदम चौथे

इयत्तेंत त्यांचें नांव दाखल झालें. पुढें दर वर्षी दोन वर्ग चढत जाऊन १८६५ सालीं विष्णु मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाला.

शालेय जीवनांत एक अभ्यासू, सालस, पण अबोलका विद्यार्थी अशी विष्णूची ख्याति होती. त्याची वृत्तिच मुळांत थंड, म्हणून त्याच्याकडे सहसा कुणाचें लक्ष जात नसे. शाळेंतील अभ्यास संपला म्हणजे हाताला मिळेल तें पुस्तक वाचावें असा त्याचा क्रम. कृष्णशास्त्र्यांच्या घरीं पुस्तकांना कधींच तुटवडा नव्हता.

## डेक्कन कॉलेज-प्रवेश

वयाच्या सोळाव्या वर्षीं प्रवेश-परीक्षेंत यश मिळवून विष्णुशास्त्री डेक्कन कॉलेजमध्यें उच्च शिक्षणासाठीं आले. त्या वेळीं त्या कॉलेजांत प्रिन्सिपल वर्डस्वर्थ, डॉ. किलहॉर्न, केरोपंत छत्रे, शंकर पांडुरंग पंडित, आबाजी विष्णु काथवटे, अनंतशास्त्री पेंढारकर इत्यादि प्रसिद्ध विद्वान् अध्यापकांचें काम करीत होते. विष्णुशास्त्र्यांनीं आपला अभ्यास मन लावून करावा. इंग्रजी, संस्कृत व इतिहास हे त्यांचे आवडते विषय, यांत त्यांनीं बरेंच प्रावीण्य संपादिलें. त्यांना शिष्यवृत्त्याहि मिळाल्या. मात्र गणिताकडे त्यांचें प्रथम-पासूनच दुर्लक्ष. त्याचा परिणाम पहिल्या परीक्षेंतच दिसून आला. ते अनुत्तीर्ण झाले. या अपयशाला आणखीहि कांहीं गोष्टी कारणीभूत झाल्या. कॉलेजांत नियुक्त पुस्तकांशिवाय इतर पुस्तकें वाचण्याचा त्यांचा छंद प्रमाणाबाहेर गेला होता. घरीं यावें तों नवीन नवीन पुस्तकें वडलांच्या खोलींत येऊन पडलेलीं असावयाचीं. कृष्णशास्त्री हे दक्षिणाप्राईज कमिटीचे समालो-चनकार होते. त्यांचेकडे आलेल्या पुस्तकांचीं परीक्षणें ते लिहून काढीत. विष्णुशास्त्र्यांना तीं आयतीं वाचावयास मिळत. शिवाय कृष्णशास्त्र्यांचें घर म्हणजे पुण्यांतील पट्टीच्या पंडितांचें विश्रांतिस्थान. दररोज विद्वानांचीं संमेल-नेंच घरीं भरत; कधीं एकाद्या ग्रंथावर टीका, कधीं राजकीय परिस्थितीवर

चर्चा, कधीं सामाजिक सुधारणांवर वादविवाद असें कांहींना कांहीं नेमानें बौद्धिक पक्वान्न तयार होई व विष्णुशास्त्र्यांसारखा चोखंदळ जिज्ञासू दाराआड बसून या पक्वान्नाचा यथेच्छ आस्वाद घेई. त्यामुळें विष्णुशास्त्र्यांच्या ठिकाणीं बहुश्रुतपणाची बरीच वाढ झाली व पुढें आयुष्यभर त्यांनीं या गुणाचा भरपूर उपयोग करून घेतला.

## मराठी काव्याचा नाद

याच सुमारास विष्णुशास्त्र्यांस आणखी एका विषयाचा नाद लागला. तो विषय म्हणजे मराठी कविता. कृष्णशास्त्री हे ट्रेनिंग कॉलेजचे प्रमुख होते. कॉलेजच्या ग्रंथसंग्रहांत ‘ सर्वसंग्रह ’ या प्रसिद्ध मासिक पुस्तकाचे सर्व अंक नीट एकत्र बाधून ठेविले होते. वडिलांच्या नकळत कारकुनाकडे वशिला लावून विष्णुशास्त्र्यांनीं हीं पुस्तकें आणून वाचावीं ! एकदां कृष्णशास्त्र्यांच्या नजरेस ही गोष्ट आली व त्यांनीं चिरंजीवाला सांगितलें कीं, हीं पुस्तकें वाचून तुला कांहीं तादृश फायदा होणार नाहीं. वडिलांच्या या सूचनेचा कांहीं परिणाम झाला नाहीं, उलट विष्णुशास्त्र्यांचें हें व्यसन वाढलेंच. त्याला दुसरेंहि एक मोठें कारण घडलें. १८६६–६७ सालीं पुण्याला पन्हाळकरबुवांचीं वर्षभर कीर्तनें चाललीं होतीं; तीं विष्णुशास्त्र्यांस फारच आवडत. पन्हाळकरबुवांची रसाळ वाणी मनाला भुरळ पाडणारें वक्तृत्व आणि मराठी कवितेंतील उत्तम उत्तम पद्य-रत्नांचा ते कीर्तनांत करीत असलेला उपयोग यांमुळें कीर्तनाला लोकांची बरीच गर्दी जमे. बुवांची विरक्ततांहि चांगल्या प्रकारची असल्यामुळें त्यांच्या वाणीचा आकर्षकपणा अधिक वाढला होता. पन्हाळकरबुवांचें कीर्तन कोठेंहि असो विष्णुशास्त्री तेथें हटकून उपस्थित व्हावयाचे. त्यांचा स्वभाव भिडस्त व एकलकोंडा असल्यामुळें ते मागील ओळींत कुठें तरी बसून अगर उभे राहून कीर्तन ऐकत. या कीर्तनश्रवणानें मराठी कवितेबद्दल विष्णुशास्त्र्यांच्या मनांत नितान्त आदर उत्पन्न झाला व तो आमरण टिकला. त्या वेळचे मराठी भाषाभिज्ञ प्रसिद्ध परशुरामतात्या गोडबोले एकदां पन्हाळकरबुवांच्या कीर्तनास

आले होते. कीर्तन संपवून बुवा खालीं बसले. परशुरामतात्यांनीं त्यांच्या रसाळ वक्तृत्वाची तारीफ करून म्हटलें, "बोवांची कर्तबगारी नांवाप्रमाणेंच आहे. कीर्तनास आरंभ झाला म्हणजे बोवांच्या रसाळ वाणीच्या पन्हाळांनीं श्रोतृजन अगदीं तृप्त होऊन जातो."

अशा परिस्थितींत आवडत्या विषयाचें अध्ययन उत्कृष्ट व्हावें व नावडता विषय दृष्टिआड व्हावा हें क्रमप्राप्तच होतें. पुढील वर्षीं पूर्व-परीक्षा झाली आणि विष्णुशास्त्री तर्कशास्त्रांत नापास झाले. प्रा. वर्डस्वर्थ यांचा कृष्ण-शास्त्र्यांशीं मोठा स्नेह होता. त्यांनीं पत्र लिहून कृष्णशास्त्र्यांना कळविलें, "तुमचा मुलगा या वर्षींहि विशेष तयार आहे असें नाहीं. तो गणितांत व इंग्रजींत कसाबसा पास झाला आहे, पण तर्कशास्त्रांत पासापुरतेहि गुण त्यानें मिळविले नाहींत. तथापि हिंवाळ्याच्या सुटींत तुम्ही त्याला तर्कशास्त्र शिक-विण्याचें पत्करीत असाल तर त्यास परीक्षेस पाठवितों." कृष्णशास्त्र्यांनीं या बाबतींत काय प्रयत्न केले हें समजत नाहीं पण विष्णुशास्त्री परीक्षेंत पास झाले एवढें बरीक खरें!

## पूर्वतयारी

१८६९ व १८७० हीं दोन वर्षें विष्णुशास्त्र्यांच्या आयुष्यांतील अत्यंत सुखाचीं होत. वडील विद्वत्तेनें व अधिकारानें लोकमान्य होते, पगारहि चांगला होता, यामुळें विष्णुशास्त्र्यांचें घरचें जीवन समाधानकारक होतें. व्यक्तिशः विद्येंत प्रगति चांगली होत होती व उच्च शिक्षण संपतांच मोठी नोकरी मिळण्याचा मोठा संभव होता. एकंदरींत सर्वच वातावरण उत्साह-वर्धक होतें. चांगल्या स्थितींतील विद्यार्थी बी. ए.च्या वर्गांत एक वर्ष अधिक रहात व अभ्यास चांगला करून परीक्षेंत स्पृहणीय यश मिळवीत. विष्णुशास्त्र्यांनींहि हीच प्रथा अनुसरली. कॉलेजमधील रमणीय वातावरण, अभ्यासाची हौस आणि आवडीच्या विषयांवर वाचनीय अशा पुस्तकांचा

लाभ या सर्वच गोष्टी त्यांच्या बेतास साहाय्यक झाल्या. कादंबरी, वासवदत्ता, राजतरंगिणी इत्यादि संस्कृत पुस्तकें; मोरोपंत, मुक्तेश्वर, वामन इत्यादि मराठी कवींचे ग्रंथ आणि भाषा व इतिहास या विषयांचें इंग्रजींतील उत्तमोत्तम ग्रंथ यांचें विष्णुशास्त्र्यांनीं सखोल आलोचन केलें. या सर्व उद्योगाचा फायदा निबंधमाला सुरू झाल्यावर त्यांना खात्रीनें झाला असला पाहिजे.

## कॉलेजमधील जीवन

विष्णुशास्त्री कॉलेजमध्यें शिकत होते त्या वेळीं सुमारें साठ-सत्तरच विद्यार्थी कॉलेजच्या सर्व वर्गात मिळून होते. त्यांपैकीं बहुतेक सर्व श्रीमंत व पांढरपेशे असल्यामुळें त्या सर्वांच्या जीवनांत विविधता दृष्टीस पडावयाची. कोणी सुस्वभावी, कोणी खोडकर, कोणी हौशी, कोणी तिरसट, कोणी अभ्यासी, कोणी आळशी, कोणी हुषार, कुणी गैदी अशा सर्व तऱ्हा तेथें असावयाच्या. सरळ व साध्या स्वभावाचे विष्णु मोरेश्वर महाजनी, उदार पण चैनी बापूसाहेब भाजेकर, तैलबुद्धि पण कममेहनती कोंडोपंत छत्रे, वृत्तीनें शान्त कोणाच्या आध्यांत ना मध्यांत ना, असे जनार्दन बाळाजी मोडक, गरिबीचीं दुःखें पूर्णपणें अनुभवून स्वावलंबनानें आपलें जीवित यशस्वी करणारे जिन्सीवाले ही सर्व मंडळी—जी पुढें कोणत्या ना कोणत्या क्षेत्रांत ख्यातनाम झाली—विष्णुशास्त्र्यांच्या समकालिनांतील होय. कॉलेजमध्यें असतांना विष्णुशास्त्र्यांचा स्वभाव साधा, गरीब होता. शब्दानें अगर कृतीनें ते कधीं कुणास दुखवीत नसत. बोलण्याचालण्यांत ते अगदीं मोजके असल्यामुळें कॉलेजच्या कोणत्याहि कार्यक्रमांत ते प्रामुख्यानें भाग घेणारे नव्हते. तरी त्यांचा स्वभाव मूळचा रसिक व हौसी होता. म्हणून विद्यार्थ्यांचे कार्यक्रम चालू असतां ते कधीं पुस्तकांत डोकें खुपसून बसत नसत; प्रेक्षक किंवा श्रोता या नात्यानें ते एखाद्या कोपऱ्यांत बसून त्या त्या गोष्टीचा रसास्वाद घेत. नाहीं म्हणावयास एकदांच ते एका नाटकाच्या खटपटींत

शिरले होते. मुंबईच्या एल्फिन्स्टन् कॉलेजांतील विद्यार्थी व डेक्कन कॉलेज-मधील विद्यार्थी यांमध्यें करमणुकीच्या कार्यक्रमाची चढाचोढ लागे. अशा एका प्रसंगीं डेक्कनमधील विद्यार्थ्यांनीं वेणीसंहार नाटकाचा प्रयोग करण्याचें ठरविलें; त्यांत विष्णुशास्त्री यांनीं धर्मराजाची भूमिका घेतली. या पात्राचें काम विष्णुशास्त्र्यांच्या शान्त व विचारशील स्वभावाला शोभण्यासारखें होतें, व तें त्यांनीं उत्तम रीतीनें केलें. प्रेक्षकवर्गांत पुढच्याच रांगेंत कृष्ण-शास्त्री बसले होते व धर्माच्या भूमिकेंत विष्णुशास्त्र्यांनीं जेव्हां वडलांच्या समोर तर्पणाला सुरुवात केली त्या वेळीं प्रेक्षकवर्गांत बराच हंशा पिकला.

विष्णुशास्त्र्यांची अभ्यास करण्याचीहि एक विशिष्ट तऱ्हा होती. शक्य-तों दिवसा अभ्यास करावयाचा व परीक्षेचा लकडा नसला तर सहाध्यायां-बरोबर अनेक विषयांवर वादविवाद तासन् तास करीत बसावयाचें, असा एकंदर त्यांचा परिपाठ होता. अभ्यासांतील त्यांची शिस्त अनुकरणीय होती. शनिवारीं ते गांवांत येत. तेव्हां रविवारचा कार्यक्रम ठरलेला कीं सकाळीं एखाद्या मराठी क्रमिक पुस्तकांतील पांच ओळींचें संस्कृत भाषांतर करावयाचें हा त्यांचा क्रम अव्याहत तीन वर्षे चालू होता. अशा रीतीनें बी. ए. च्या वर्गांत त्यांनीं दोन वर्षें काढलीं. संस्कृत, मराठी, व इंग्रजी यांतील प्रावीण्याबद्दल त्यांना शिष्यवृत्त्याहि मिळाल्या. इतकें असूनहि १८७० सालीं झालेल्या परीक्षेंत ते यश मिळवूं शकले नाहींत; कारण ठराविकच होतें. परीक्षेच्या नियुक्त विषयांचा जेवढा अभ्यास व्हावा तेवढा झाला नव्हता. या अपयशाचा परिणाम असा झाला कीं, त्यांच्या कॉलेज-जीवनाला पूर्ण-विराम मिळाला. ते घरीं आले व परीक्षेचा अभ्यास करूं लागले.

## पदवीपरीक्षा व पुढें

अभ्यास करूनहि बराच वेळ राही. तेव्हां कृष्णशास्त्र्यांच्या सूचनेवरून विष्णुशास्त्र्यांनीं बाबा गोखले यांच्या खाजगी शाळेंत नोकरी पत्करली.

शिक्षक म्हणून त्यांची चांगलीच ख्याति झाली. १८७२ सालीं जोराचा अभ्यास करून ते बी. ए. परीक्षा उत्तीर्ण झाले व पुढील उद्योगास लागले. चिरंजिवांनीं एल्एल्. बी. व्हावें अशी कृष्णशास्त्र्यांची इच्छा होती व तशी सूचनाहि त्यांनीं केली. परंतु इतउत्तर परीक्षांच्या भानगडींत पडावयाचें नाहीं असें विष्णुशास्त्र्यांनीं मनांत ठरविलें. मात्र इंग्लंडमधील ॲडिसन, जॉन्सन, मेकॉले वगैरे विद्वानांनीं ज्या व्यासंगांत आपलें आयुष्य घालविलें त्यांतच आपणहि आपलें जीवित घालवावयाचें असें त्यांनीं निश्चित केलें. मराठी भाषेच्या सेवेला यापूर्वींच त्यांनीं सुरुवात केली होती.

## ' शालापत्रक ' व लेखनारंभ

१८६१ पासून शिक्षणखात्यानें ' मराठी-शाळा-पत्रक ' सुरू केलें. त्याचा उद्देश मराठी शिक्षकांचें ज्ञान वृद्धिंगत करावें हा प्राधान्येंकरून होता. खात्याचें अधिकृत मासिक असल्यामुळें इन्स्पेक्टरच्या मार्फत निघणारे हुकूम, बदल्या वगैरे कार्यालयीन माहितीहि 'पत्रकां'त छापली जाई. कृष्णशास्त्र्यांची नेमणूक पुणें ट्रेनिंग कॉलेजच्या प्राचार्यपदावर झाली आणि १८६५ पासून ' शालापत्रक ' संपादण्याचें काम त्यांजकडे आलें. ' मराठी व्याकरणावरील निबंध ' या शीर्षकाखालीं कृष्णशास्त्र्यांनीं अत्यंत मार्मिक असे पंचवीस लेख 'पत्रकां'त छापले; शिवाय ' रासेलस ' चें सुंदर भाषांतरहि ते देत असत.

या भाषांतराचे अठरा-वीस भाग झाल्यावर १८६८ सालीं थोरल्या शास्त्रीबोवांनीं भाषांतराचें काम आपल्या चिरंजिवांकडे सुपूर्त केलें. आरंभीचे दोन भाषांतरित भाग कृष्णशास्त्र्यांनीं वाचून पाहिले व ते त्यांना भारीच आवडले. यानंतर विष्णुशास्त्री पदवीधर झाले आणि ' शालापत्रक ' लिहिण्याचें सर्वच काम ते स्वतंत्ररीत्या करूं लागले. ' संस्कृत कविपंचक ' या विषयावरील त्यांचे टीकालेख सुमारें दोन वर्षें नियमानें ' शालापत्रकांत ' आले. यांत अनुक्रमें कविकुलगुरु कालिदास, भवभूति, बाण, सुबंधु आणि

दंडी या कवींची उपलब्ध असलेली सर्व चरित्रविषयक माहिती प्रथम दिलेली आहे व नंतर त्या त्या कवीच्या काव्यग्रंथांचें रसास्वादपूर्वक परीक्षण केलेलें आहे. कवींचे गुणावगुण दाखविण्यासाठीं उताऱ्यांची निवडहि अत्यंत मार्मिकपणानें केलेली असल्यामुळें ही निवड विष्णुशास्त्र्यांच्या रसिकतेची चांगली साक्ष देतात. 'संस्कृत कविपंचक' वाचणाऱ्या वाचकाला संस्कृत कवींची व त्यांच्या काव्यसौंदर्याची प्रचीति येतेच पण त्याबरोबर बहुश्रुतपणाहि वाढतो. या सर्वच निबंधांची भाषा मोठी प्रौढ, सुबोध, आहे. त्या वेळीं हे निबंध सर्वांना आवडले व आतांहि ते आवडतील.

'शालापत्रका'चा जो प्रधान उद्देश कीं शिक्षकांची ज्ञानवृद्धि व्हावी तो विष्णुशास्त्र्यांच्या हातून जितका सिद्धीस गेला, तितका पूर्वींच्या संपादकांच्या हातून सिद्धीस गेला नाहीं हें सत्य लपवून चालणार नाहीं. ट्रेनिंग कॉलेजांत तीन वर्षें अभ्यास करून जे शिक्षक खेड्यापाड्यांत अध्यापन-कार्यासाठीं जातात त्यांस तेथें राहून अधिक ज्ञान प्राप्त करून देणें केव्हांहि इष्ट आहे. तेव्हां मराठीपेक्षां ग्रंथसंग्रहाच्या बाबतींत अधिक संपन्न अशा ज्या संस्कृत आणि इंग्रजी भाषा त्यांतील माहिती करून देण्याचा प्रयत्न विष्णुशास्त्र्यांनीं केला. 'कविपंचक' हा विषय अशांपैकींच एक होता. हे लेख वाचल्यावर अनेक मित्रांकडून विष्णुशास्त्र्यांस सूचना आल्या कीं, संस्कृत कवींचें जसें उत्तम विवेचन आपण केलें तसें मराठी कवींचेंहि जर आपल्या हातून होईल तर मराठी भाषाग्रंथांत फार मोठी भर पडल्यासारखी होईल. विष्णुशास्त्र्यांनीं ही सूचना मान्य केली व १८७५ सालीं 'मराठी कविता' हा विषय प्रतिपादण्यास त्यांनीं आरंभ केला. पहिलाच लेख प्रस्तावनेचा म्हणून प्रसिद्ध झाला. त्यांत त्यांनीं एका सरकारी कृत्यावर कडक टीका केली. रा. माधव चंद्रोबा डुकले यांचें 'सर्वसंग्रह' नामक मासिक निघे. त्यांत जुन्या कवींचीं काव्यें छापलीं जात. त्यांत परशुराम तात्या गोडबोले यांचेंहि साह्य होतें. पुढें शाळा खात्यांतील कांहीं अरसिक अधिकाऱ्यांच्या कारवाईनें आणि

विशेषतः मिशनरी लोकांच्या सागण्यावरून सरकारनें या मासिकाची आर्थिक मदत बंद केली व त्यामुळें १८६६–६७ च्या सुमारास ' सर्व-संग्रहा 'चा कारभार आटोपला. शास्त्रीबुवांनीं या घटनेला उद्देशून आपल्या प्रास्ताविक भागांत असा निर्देश केला कीं सरकारी आश्रय काढून घेतल्या-मुळें जुन्या कवितेचें पुनरुज्जीवनाचें काम बंद पडलें ही सरकारची मोठी चूक झाली. विष्णुशास्त्र्यांच्या कडक टीकेनें अधिकाऱ्यांचीं डोकीं आधींच उठलीं होतीं आणि त्यांतून वर सांगितलेला सरकारी अधिकाऱ्यांविरुद्ध मजकूर सरकारी मदतीनें चाललेल्या ' पत्रकां 'त आला. मग काय विचारतां ? आधीं शास्त्रीबुवांच्या दिरंगाईवृत्तीमुळें ' पत्रका 'चे अंक वेळेवर निघत नसतच, त्याबद्दल खात्याची तक्रार होतीच पण कृष्णशास्त्र्यांवर वरिष्ठ साहेबांचा लोभ भारी, तेव्हां त्यांच्याकडून ' पत्रका 'चें काम काढून दुसऱ्याकडे देण्याचें धैर्य खालच्या अधिकाऱ्यांना होईना. या सर्वच प्रकरणाला आळा बसविण्याची एक शक्कल अधिकाऱ्यांनीं काढली व ' पत्रक 'च मुदलांत बंद करण्याचें ठरविलें, तसा हुकूमहि निघाला व १८७५ त ' शालापत्रका 'चा अवतार संपला. विष्णुशास्त्री याविषयीं लिहितात, " पुढें विचित्र योगानें बिचाऱ्या ' पत्रका ' ची इतिश्री होण्यास आम्हीच कारण झालों. मुंबईचें ' एज्युकेशनल रेकॉर्ड ' म्हणून रजा व नेमणुका समजण्याचें अखबार होऊन बसलें आहे. त्यापेक्षां ' मराठी शाळापत्रका ' ची योग्यता कांहीं जास्ती असावी असा आमच्या वडलांच्या संकेत होता; व पुढें आमचाहि होता.................पण १८७४ पासून तें एका जबरदस्त दुष्ट ग्रहाच्या फेऱ्यांत पडलें. व मनुष्य किंवा होडी भोंवऱ्यांत सांपडली असतां, कालेंकरून त्यांची गति जशी केंद्रप्रवण होत होत त्यांत त्यांचा शेवटीं लय होतो, त्याचप्रमाणें पुढील सालापर्यंत वरील ग्रहग्रस्त पुस्तकाची मजल जेमतेम आटपून, तें शेवटीं बुडालें ! हा महान् अनर्थ होण्यास कारण काय झालें म्हणाल, तर पूर्वोक्त कविताविषय ! "

## पूना हायस्कुलांतील नोकरी

शालापत्रकाच्या समाप्तीबरोबर विष्णुशास्त्र्यांच्या लेखनाचा पहिला खंड संपतो. त्यानंतर त्यांनीं आपल्या मोठ्या उद्योगाला हात घातला, परंतु तत्पूर्वीं मध्यंतरीच्या काळांत विष्णुशास्त्र्यांच्या आयुष्यांत ज्या घटना झाल्या त्याबद्दल प्रथम माहिती करून घेणें आवश्यक आहे. बी. ए. होण्यापूर्वीं विष्णुशास्त्री बाबा गोखल्यांच्या शाळेंत अध्यापन-कार्य करीत असल्याची माहिती वर आलीच आहे. १८७३ सालच्या मार्चचे सुमारास पूना हायस्कूलमध्यें शिक्षकाची एक जागा रिकामी झाली. ‘ राजा शिवाजी ’ नांवाचें काव्य लिहिणारे महादेव मोरेश्वर कुंटे हे त्या वेळीं शाळेचे मुख्याध्यापक होते. कुंटे मोठे बुद्धिमान् व हुशार होते, पण त्यांची वागणूक विलक्षण असे. हाताखालील शिक्षकांचें व त्यांचें सहसा पटलें नाहीं. शाळेंत रिकाम्या झालेल्या जागेवर ‘ कृष्णशास्त्री यांच्या मुलास घेता का ? ’ अशा अर्थाचा निरोप विद्याखात्याचे मुख्य चॅटफील्ड यांनीं कुंटे यांस पाठविला. कुंटयांनीं लगेच विष्णुशास्त्र्यांस बोलावून घेतलें, व चॅटफील्डच्या निरोपाचा बिलकुल उल्लेख न करतां ‘ तुमची इच्छा असल्यास रिकाम्या जागेवर तुमची नेमणूक करण्याची शिफारस मी डायरेक्टरसाहेबांकडे करतों ’ असें ते विष्णुशास्त्र्यांस म्हणाले. विष्णुशास्त्र्यांनीं होकार दिला व लवकरच कामावर रुजू होण्याबद्दलचा हुकूम त्यांच्या हातांत पडला. परंतु कुंटयांची कृति कांहीं दडून राहिली नाहीं. विष्णुशास्त्र्यांच्या नेमणुकीमागील गुपित लवकरच बाहेर पडलें. चॅटफील्डसारख्या पाश्चात्य अधिकाऱ्यांचे आणि कृष्णशास्त्र्यांचे संबंध मोठ्या प्रेमाचे असत, व त्यामुळेंच ही योजना झाली. पूना हायस्कूलमधील शास्त्रीबुवांच्या कार्याचा आरंभ तर अशा विचित्र घटनेनें झाला. पुढें विष्णुशास्त्री व कुंटे यांचे वारंवार खटके उडूं लागले. याचा सर्वच दोष कुंटयांकडे होता असें म्हणतां यावयाचें नाहीं. विष्णुशास्त्र्यांतहि शिक्षकपेशाला न शोभणारे कांहीं अवगुण होते. अनियमितपणा हा विष्णुशास्त्र्यांचा

मोठा दोष. घंटा झाल्याबरोबर ते म्हणजे वर्गावर गेले असें सहसा होत नसे. पंधरा-वीस मिनिटें निघून जावयाचीं ! इतकें होऊन ते वर्गावर गेले तर वर्गातील ठाकठीक व्यवस्था, छडीचा किंवा कठोर शब्दाचा वापर इत्यादि शिस्तीसाठीं आवश्यक असणारीं अंगें त्यांच्यांत मुळींच नव्हतीं. स्वतः विद्वान् होते, शिकविण्याची दांडगी हौस होती, अध्यापन-पद्धतिहि नमुनेदार होती पण यांचा फायदा घेणारे आस्थेवाईक विद्यार्थी असते; तर विष्णुशास्त्र्यांच्या शिकवण्याचें चीज झालें असतें; तशांत कांटेकोर शिस्त पाळणारे मुख्याध्यापक ! या दोघांचें जमावयाचें कसें ! कुंटे हे मधून मधून विष्णुशास्त्र्यांसमोर त्यांच्या वडिलांची टवाळी करण्यासहि मागेंपुढें पहात नसत ! या सर्वांचा परिणाम म्हणजे या दोघांतील तेढ दिवसेंदिवस वाढत गेली. दररोज बारीकसारीक गोष्टीवरून कटकटी उत्पन्न व्हाव्या. शालेय जीवन त्रासाचें व दगदगीचें होऊन बसलें ! !

## निबंधमालेचा जन्म

सन १८७३ सालच्या अखेरीस नाताळाच्या सुटींत विष्णुशास्त्री व त्यांचे स्नेही श्री. किर्लोस्कर, जांभेकर, आगाशे हे सर्व आळंदीस सहज मौजेनें म्हणून गेले होते. सहलींतील सर्व गमती, गप्पागोष्टी झाल्यावर मंडळी परत फिरली. वाटेंत एका मित्रानें विष्णुशास्त्र्यांस सहज प्रश्न केला, " तुम्हीं एकादें मासिक पुस्तक कां काढीत नाहीं ? त्यांत कधीं नवीन विषय घालावेत व कधीं तुम्हीं शालापत्रकांत ' संस्कृत कवी ' विषयीं जे निबंध यापूर्वी छापले आहेत त्यांतीलच कांहीं घालावेत. " विष्णुशास्त्र्यांना ही कल्पना एकदम पसंत पडली. ' शालापत्रक ' तर बंदच झालें होतें, पण त्या-मुळें लेखनाचा हव्यास बंद पडावा असें त्यांना वाटणें शक्य नव्हतें. ते सारखा या गोष्टीचा विचारच करीत होते. त्यांत मित्रांची सूचना आली. त्यांनीं निश्चय केला व ते उद्योगाला लागले. एकदां छापलेले निबंध परत छापणें हें कांहीं योग्य नाहीं असें त्यांनीं ठरविलें व स्वतंत्र पुस्तकांप्रमाणें

लेखांची जुळवणी करून सन १८७४ च्या जानेवारींत ‘ निबंधमाले ’ चा पहिला अंक प्रसिद्ध झाला. तेव्हांपासून मध्यंतरीं एक वर्षाचा खंड सोडला तर ‘ निबंधमाला ’ सात वर्षें चालली. पहिल्या अंकावर फक्त विष्णुशास्त्री यांनीं आपलें पूर्ण नांव ‘ विष्णु कृष्ण चिपळूणकर ’ असें घातलें होतें. यापुढील कोणत्याहि अंकावर नांव नाहीं. या ‘ माले ’ चे एकंदर ८४ अंक प्रसिद्ध झाले आहेत.

निबंधमालेच्या रचनेसंबंधीं विष्णुशास्त्र्यांच्या अंगचे दोन गुण लक्षांत घेण्याजोगे आहेत. पहिला म्हणजे मालेचा सर्व उद्योग त्यांनीं स्वतः केला. मासिक पुस्तक काढण्याबद्दल त्यांनीं कोणाचा सल्ला घेतला नाहीं किंवा कोणाकडेहि आर्थिक साहाय्याची याचना केली नाहीं. इतकेंच नव्हे तर मालेच्या कांहीं प्रती विकत घ्या अगर वर्गणीदार व्हा अशी कुणालाहि त्यांनीं पत्रद्वारें अगर अन्यरीतीनें विनंती केली नाहीं. अभिप्रायासाठीं पाठविण्याची तर गोष्टच नको ! विष्णुशास्त्र्यांच्या स्वभावांत ही आगंतुकी वृत्ति अजिबात नव्हती. अन्तवर्ती स्वभावाचें हें मोठें चिह्न आहे. यांत स्वाभिमानाचा अतिरेक आहे असेंहि एका अर्थीं म्हणतां येतें. यामुळें निबंधमालेची ‘ प्रतिष्ठा ’ मात्र राहिली व वाढली यांत शंका नाहीं.

विष्णुशास्त्र्यांचा दुसरा गुण म्हणजे मालेंतील सर्व मजकूर आपण स्वतः लिहावयाचा, त्याचीं मुद्रितें स्वतः तपासावयाचीं, अथपासून इतिपर्यंत सर्व अंक एकहातीं असावयाचा, त्यांत दुसऱ्याच्या हातचा एकहि शब्द मिळावयाचा नाहीं. मुख्य निबंध, व पुरवणी म्हणून सुभाषितें, विनोद महदाख्यायिका, उत्कृष्ट उतारे इत्यादि सर्व मजकूर शास्त्रीबुवा स्वतः तयार करीत. दुसऱ्यांचे लेख घेण्याबद्दल शास्त्रीबुवा असें म्हणत, “ जे लोक आम्हीं लिहूं म्हणत ते अगोदर चांगले काळजीपुरस्सर लिहिणारे नसावयाचे व त्यांतून आपल्या निबंधांतच दुसऱ्यांचे निबंध घुसडल्यानें त्यांत पुष्कळदां मतविरोध होणार. तेव्हां पुस्तकाचें काम सर्वच एकट्याचें असलें म्हणजे

वरील अडचण अर्थातच राहाणार नाहीं. " विष्णुशास्त्र्यांच्या जीवनांतील अनियमितपणा 'माले'लाहि बाधलेला दिसतो. अंक सहसा पहिल्या तारखेला निघावयाचे नाहींत. नेहमीं दोन-तीन महिन्यांनीं तरी मागासलेले असावयाचे. वर्गणीदार कधींमधीं कुरकुरत, पण एकदां अंक हातीं पडला व त्यांतील उत्कृष्ट लेख वाचून समाधान झालें म्हणजे वरील कुरबूर आपोआप थंड होई.

निबंधमालेचे तीन-चार अंक बाहेर पडले; त्यांतील शुद्ध व प्रौढ भाषा, तर्कशुद्ध व निर्भीड विचारसरणी हीं पाहून महाराष्ट्रांतील रसिक प्रसन्न झाले. विष्णुशास्त्र्यांची कीर्ति चारी बाजूंस पसरूं लागली. 'माले' चा गुणग्राही मित्रपरिवार वाढूं लागला; त्याबरोबर एक हेवादावा करणारें अकारण शत्रूंचें मंडळ उदयास येऊं लागलें. केवळ भाषाज्ञान शिकविणारीं मालेंचीं पुस्तकें सध्यांच्या परिस्थितींत निरुपयोगीं आहेत अशी टीकाकारांची टुरटुर अधून-मधून ऐकूं येऊं लागली. पण त्याचा फारसा परिणाम झाला नाहीं. यापुढें मालेवर बरेच खडतर प्रसंग आले. त्यांपैकीं दोन फार महत्त्वाचे आहेत. मालेच्या आठव्या अंकांत 'इतिहास' हा विषय होता. याचा समारोप करतांना विष्णुशास्त्री हिंदुस्थानच्या इतिहासाकडे वळले. मिल्ल, मेकॉले, मॉरीस वगैरे इंग्रजी इतिहासकारांनीं हिंदुस्थानविषयीं लिहितांना अनेक विपर्यस्त विधानें केलीं आहेत, त्यांचीं मनें आपल्या विद्या व कला यांविषयीं शुद्ध नव्हतीं म्हणून असे ग्रंथ आमच्या तरुण पिढीनें वाचूं नयेत असा शास्त्रीबुवांच्या लेखनाचा मथितार्थ होता. या लेखाची भाषा बरीच कडक होती, पण त्यांत 'स्व'त्वाविषयींची तममळ ओतप्रोत भरलेली होती.

## संकटापूर्वीचें वादळ

हा अंक बाहेर पडला आणि चारी बाजूंस बराच गवगवा ऐकूं येऊं लागला. त्या वेळचे प्रसिद्ध मेजर कँडी या साहेबांच्या वाचनांत हा अंक

आला. कँडी हे कृष्णशास्त्र्यांचें अत्यंत चाहते होते. त्यांनीं कृष्णशास्त्र्यांस पत्र लिहून कळविलें कीं, "तुमच्यासारख्यांच्या मुलानें अशा तऱ्हेचा मजकूर लिहिणें ही अतिशय दुःखाची गोष्ट आहे. असें पुन्हां न करण्याबद्दल आपण चिरंजिवांस ताकीद द्यावी." हापावेतों वडिलांनीं मुलाच्या उद्योगाकडे कधींहि लक्ष दिलें नव्हतें; चिरंजिवांनींहि आपली माला वडिलांच्या दृष्टीस पडूं नये अशी खबरदारी घेतली होती. साहेबांचें पत्र येतांच कृष्णशास्त्र्यांनीं तो अंक मागून घेतला व वाचून पाहिला 'असला मजकूर लिहून तुला तादृश काय फायदा होणार ? वकील वगैरे हो, एखाद्या स्वतंत्र धंद्यांत पड आणि मग असलें वाटेल तें लिही' इत्यादि चार गोष्टी थोरल्या शास्त्रीबुवांनीं चिरंजिवांना सुनाविल्या.

याच वर्षीं चॅटफील्डसाहेब हायस्कूल तपासण्यास आले. शिक्षकांपैकीं प्रत्येकाला वेगळें बोलावून त्यांनीं मुलाखती घेतल्या. विष्णुशास्त्र्यांशीं बोलणीं चाललीं असतां मालेचा विषय निघालाच. साहेब म्हणाले, "तुम्ही मराठींत मासिक काढतां ही फार चांगली गोष्ट आहे, परंतु तुम्ही अजून तरुण आहां, तुमचे विचार अद्याप पक्व झाले नाहींत, तेव्हां कोणत्याहि संबंधानें कडक लेख लिहिणें बरें नव्हे. मेकॉले, मिल्ल यांनीं जीं मतें मांडलीं आहेत, तीं तरी कुठें सर्वमान्य आहेत ?" मोठ्या गोड वाणीनें साहेबांनीं शास्त्रीबुवांची कानउघडणी केली व त्याचा थोडासा परिणाम झाला. यापुढें मालेचे विषय शुद्ध भाषेसंबंधीं होते. भाषाशुद्धि, लेखनशुद्धि, वाचन, भाषांतर इत्यादींचें शास्त्रीबुवांनीं केलेलें विवेचन अत्यंत मर्मग्राही आहे. भाषाहि सौम्य व सरळ असून विचारसरणी पोक्त राखिली आहे.

## रत्नागिरीस झालेली बदली

कांहीं झालें तरी विष्णुशास्त्री सरकारी रोषाचे विषय बनले होते व त्यांत मुख्याध्यापक कुंटे व विष्णुशास्त्री यांच्या वैमनस्याची भर पडली. श्री. कुंटे

हे थोरल्या शास्त्रीबुवांची सर्वांसमक्ष वाटेल तशी निंदा करीत, हें वैमनस्याचें बीज. विष्णुशास्त्र्यांचा स्वभाव आंतल्या गांठीचा–अन्तवर्ती होता, त्यामुळें उत्तरास प्रत्युत्तर मिळून हें भांडण मिटलें नाहीं; उभयतांच्याहि मनांत ज्या आढ्या बसल्या त्या कायमच्या ! ! शाळेच्या दैनंदिन कार्यांत अडथळे येऊं लागले. वर्गावर नियमितपणें न जाणें, वर्गव्यवस्था चोख न ठेवणें, इत्यादि साध्या दोषांचे मुख्याध्यापकांनीं पर्वत करावे. मुद्दामच विष्णुशास्त्र्यांस खालचे वर्ग घेण्याचा हुकूम द्यावा, त्यांनीं तो हुकूम धाब्यावर बसवावा, वर्गांत न जातां वाचनालयांत वाचीतच बसावें; अशा एक का दोन–अनेक कटकटी सुरू झाल्या. शाळेंतील इतर शिक्षक मजा पहायचे; अशी एक प्रकारची बेदिली झाली व त्यामुळें शाळेच्या शिस्तीला बाध येऊं लागला. शेवटीं धुमसणाऱ्या या सर्व प्रकरणाचा स्फोट होऊन विष्णुशास्त्र्यांची बदली रत्नागिरीसारख्या आडगांवीं करण्यांत आली. ही एक प्रकारची शिक्षाच होती व या शिक्षेनें इतर नामधारी शिक्षकांप्रमाणें विष्णुशास्त्री आपला हेकटपणा सोडून ताळ्यावर येतील अशी चॅटफील्डसाहेबांची समजूत होती, परंतु ती खोटी ठरली. उटल शास्त्रीबुवांच्या अंगचा निश्चयाचा गुण अधिक प्रकर्षानें दृष्टोत्पत्तीस आला. त्यांच्या कित्येक हितेच्छु मित्रांनीं श्री. कुंटे यांच्या बरोबरचें वैमनस्य टाकून देण्याबद्दल त्यांना उपदेश केला. सरकारविरुद्ध लिहिण्याचें सोडून द्या असें अनेकांनीं सांगितलें; परंतु स्वाभिमान व स्वदेशाभिमान यांना उच्च लेखणाऱ्या विष्णुशास्त्र्यांनीं ‘ जनाचें ऐकिलें व मनाचें केलें ! ’ सरकारी नोकरी राखण्यासाठीं आपल्या उच्च भावना जाळून टाकण्यास ते तयार झाले नाहींत. त्यांनीं परिस्थितीला तोंड देण्याचा निश्चय केला.

विष्णुशास्त्र्यांच्या पत्नी या वेळीं गरोदर होत्या. म्हणून ते एकटेच निघाले; सन १८७७ च्या डिसेंबरच्या ३१ तारखेस आगबोटीनें ते रत्नागिरीस येऊन पोंचले. ते यापूर्वी पुण्याबाहेर फारसे गेले नव्हते; पुणें

सोडतांना त्यांना साहजिकच वाईट वाटलें; याशिवाय 'माले'चें पुढें कसें होणार हा अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न त्यांचें मन अस्वस्थ करण्यास कारणीभूत झालाच होता.

## काव्येतिहास-संग्रह

बदलीचा हुकूम येण्यापूर्वीच विष्णुशास्त्र्यांनीं शंकर तुकाराम शाळिग्राम, काशिनाथ नारायण साने, जनार्दन बाळाजी मोडक, कृष्णाजी रघुनाथ केळकर यांच्या सहकार्यानें 'काव्येतिहास-संग्रह' नांवाचें मासिक व बाळकृष्ण वासुदेव जोशी यांच्या साह्यानें 'चित्रशाळा' छापखाना असे दोन नवीन उद्योग आरंभिण्याचें निश्चित केलें होतें. त्याबद्दलहि त्यांना मनांत एक प्रकारची चिंता उत्पन्न झाली. अशा द्विधा मनःस्थितींत विष्णुशास्त्री रत्नागिरीस आले.

## रत्नागिरी येथील वास्तव्य

पुण्याचें हायस्कूल व रत्नागिरी येथील हायस्कूल यांत विष्णुशास्त्र्याना जमीन-अस्मानाचें अंतर दिसून आलें. रत्नागिरी हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. वामन आबाजी मोडक हे अत्यंत सद्प्रवृत्त व प्रेमळ गृहस्थ होते. शिक्षकमंडळींतहि बराच बन्धुभाव वसत होता. श्री. मोडक यांनीं विष्णु-शास्त्र्यांस पहिल्याच दिवशीं सांगितलें, "या शाळेंतील सर्व शिक्षकमंडळी सर्वतोपरीं एकाच कुटुंबांतील माणसासारखी अशी आम्ही आहोंत." तसें पाहतां श्री. मोडकांबद्दल शास्त्रीबुवांच्या मनांत एक प्रकारची अढी होती. कारण 'माले'च्या चोवीस व सव्वीस या अंकांत श्री. मोडक यांचीं शास्त्री-बुवांशीं सुधारकांच्या विषयावर शाब्दिक युद्धें झालीं होतीं पण मोडकांच्या आदरशील वर्तनानें शास्त्रीबुवांची अढी नाहींशी झाली व पुण्याप्रमाणें येथें हेडमास्तरांचा त्रास होणार नाहीं असें त्यांना वाटलें.

रत्नागिरीचा समुद्रकिनारा, त्या बाजूस असलेली रमणीय वनश्री, गांवां-तील मोठें वाचनालय. आणि बन्धुभावानें वागणारे सहकारी शिक्षक—सर्वच

गोष्टी विष्णुशास्त्र्यांस सुखकर वाटल्या व पहिले पहिले दिवस नवीनपणामुळें बरेच आनंदांत गेले. पण त्यांचें मन सारखें पुण्याकडे ओढ घेई. रत्नागिरीच्या ग्रंथालयाचा त्यांनीं पुरेपूर फायदा घेतला. त्यांचें तें विश्रांतिस्थानच होतें. तें लिहितात कीं, " ही लायब्ररी पूर्वीं युरोपियन व नेटिव लोक या दोघांची एकच असल्यामुळें तींत कित्येक जुनीं जुनीं ऐतिहासिक पुस्तकें, जीं इंग्रजी अंमल सुरू होण्यापूर्वीं किंवा अव्वल इंग्रजींत कांहीं थोर थोर साहेबांनीं लिहिलीं असून त्यांच्या पुढें पुनरावृत्ति न निघाल्या कारणानें त्यांच्या प्रती आतां बहुतेक दुर्मिळच झाल्या आहेत, तीं होतीं. हीं आपल्या देशाचा खरा इतिहास लिहिण्यास फार उपयोगीं पडण्यासारखीं अर्थातच आहेत. त्याचप्रमाणें या लायब्ररींत दोन मोठया दुर्बिणी असून त्यांतून रात्रीच्या वेळीं तारे पाहण्याची वगैरे चांगली सोय असे. "

श्री. मोडक हेडमास्तर दररोज सकाळीं फिरावयास जात. त्यांची वाट विष्णुशास्त्र्यांच्या बिऱ्हाडावरूनच होती. साहजिकच ते विष्णुशास्त्र्यांस हाक मारून बरोबर फिरावयास घेऊन जात. प्रथम कांहीं दिवस शास्त्रीबुवा थोडे दिवस फिरावयास गेले, पण तें करणें त्यांना कांहीं मानवलें नाहीं. एक तर सकाळचा लिहिण्या-वाचण्याचा वेळ फिरण्यांत फुकट जाई व श्री. मोडकांसारख्या गृहस्थाबरोबर सारखें बोलणें हें अबोल स्वभावाच्या शास्त्रीबुवांना अशक्य होतें. शेवटीं ते अनेकदां टाळाटाळी करूं लागले. ते सांगत कीं, 'हेडमास्तरांची स्वारी एके दिवशीं सकाळीं आमच्या बिऱ्हाडाशीं येऊन मला हांक मारून दरवाज्यांत काशीबा गडी उभा होता त्याजपाशीं चौकशी करीत आहेत हें मीं ओटीवरून आडून ऐकिलें. इतक्यांत काशीबा आंत धांवत येऊंन हेडमास्तर फिरावयास येण्याबद्दल बोलावीत आहेत म्हणून सांगूं लागला. मी हळूच त्यास साधारण खुणेनें सुचविलें कीं, मी बाहेर गेलों आहें म्हणून सांग. यावरून हेडमास्तर त्या दिवशीं तसेच एकटे फिरावयास निघून गेले. पण ही त्या दिवसापुरती बतावणी झाली ! दुसऱ्या

दिवशीं पुन्हां तोच प्रसंग यावयाचा. पण आमचा काशीबा मोठा धूर्त असे: 'त' म्हणतांच 'ताकभात' ओळखणारा असा तो हुषार होता. दुसऱ्या दिवशीं हेडमास्तरांची स्वारी त्यानें दुरून येतांना पाहतांच तो देवडीवरून मुकाट्यानें आपला आंत उठून आला म्हणजे आपणांस खोटें बोलण्याची पाळी न येतां हेडमास्तर यांची मर्जी न दुखावतां यजमानांचेंहि काम व्हावें.

## वडिलांचा मृत्यु व कौटुंबिक जबाबदारी

मे महिना उजाडला. शाळेस सुटी झाली. विष्णुशास्त्री पुण्यास आले. ही सुटी कांहीं त्यांना आनंदाची गेली नाहीं. १८७५ च्या आरंभास कृष्णशास्त्री, वृद्ध मातोश्री व इतर कांहीं मंडळी यांसह काशीयात्रेस गेले होते. यात्रेहून परत येतांना त्यांच्या उरांत कळा निघण्यास सुरुवात झाली. पुण्यास आल्यावर हा काळजाचा विकार चालूच होता. औषधपाण्यानें थोडेसें बरें वाटे इतकेंच. त्यांत आणखी मधुमेहाची भर पडली. एकंदरींत प्रकृति ढांसळली ती ढांसळलीच. तरीसुद्धां ते सार्वजनिक कार्यांत भाग घेतच होते. सालाबादप्रमाणें वक्तृत्वसभेचा उपसंहार याहि वर्षीं ता. १० मे १८७८ रोजीं तेच करणार होते. पण त्या दिवशीं एकाएकीं काळजाचा विकार बळावला. एक-दोन दिवस तशाच परिस्थितींत गेले. ता. १७ रोजीं जी कळ आली ती खूप जोराची होती; इतकी कीं कृष्णशास्त्री एखाद्या गुरासारखे ओरडूं लागले. औषधोपचारानें थोडासा आराम वाटला. १९ तारीख उजाडली. मधून मधून कळा येतच होत्या. त्यांत क्षीणपणाहि भारी आला होता. आपण आतां जगणार नाहीं असें त्यांनाहि वाटूं लागलें. विष्णुशास्त्र्यांना जवळ बोलावून ते इंग्रजींत म्हणाले, "माझें हें दुखणें कठिण दिसतें; तूं रजा घेऊन कांहीं दिवस येथेंच रहा!" असेंच थोडें बोलणें झालें आणि कांहीं वेळानें कृष्णशास्त्र्यांनीं इहलोक सोडला. ही गोष्ट ता. २० मे १८७८ दुपारीं १ वाजतां झाली. विष्णुशास्त्र्यांवर हा मोठा

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
वा. क्र. दि.
वि.

आघातच होता. संसाराच्या कटकटींतून ते हापावेतों मोकळे होते. वडिलांच्या मृत्यूनें कुटुंबाचें प्रमुखत्व आंतील सर्व दगदगींसह त्यांच्याकडे आलें. थोड्याच दिवसांत भाऊबंदकी सुरू झाली. ही धामधूम कशीबशी आटोपून ते परत नोकरीवर हजर होण्यासाठीं रत्नागिरीस निघून गेले.

## राजीनाम्याची पूर्वतयारी

पण या खेपेस त्यांचें मन रमेना. त्यांतच त्यांचा लहान मुलगा पुण्यास आजारी होता. इतक्यांत हेडमास्तर श्री. मोडक यांचीहि बदली झाली. विष्णुशास्त्री भारी नाउमेद झाले. नोकरी सोडण्याचे विचार वरचेवर त्यांचे मनांत येऊं लागले. 'माले' चें लेखन सुरूच होतें. ऑक्टोबरमध्यें त्यांचा तान्हा मुलगा वारला. घरांतहि भाऊबंदकीला जोर चढला. नोकरीचा राजीनामा देण्याचें त्यांनीं आतां जवळजवळ नक्की केलें. पण पुढें काय ? बाबा गोखलेसारखी खासगी शाळा सुरू करावी, निबंधमाला आहेच, दुसरींहि स्वतंत्र पुस्तकें लिहितां येतील, सरकारी बंधनांतून मुक्त झाल्यावर वाटेल तो उद्योग करून आपण उदरनिर्वाह करूं अशी विचारमाला सारखी त्यांच्या डोक्यांत घोळत असे. शेवटीं त्यांनीं निश्चय केला पण याबद्दल कुणालाहि दाद लागूं दिली नाहीं, कीं कोणाचाहि सल्ला घेतला नाहीं. प्रथम त्यांनीं सहा महिन्यांची अर्धपगारी रजा मे महिन्याच्या सुटीला जोडून घेण्याचा विचार केला. या अवधींत पुढील उद्योगाची तयारी करावी असें त्यांनीं ठरविलें. येणेंप्रमाणें रत्नागिरीस रामराम ठोकून विष्णुशास्त्री मे महिन्याच्या आरंभीं पुण्यास येऊन दाखल तर झाले.

चित्रशाळा छापखाना पूर्वींच सुरू झालेला होता. तो शास्त्रीबुवांनीं आपल्या घरांत आणला. हळूहळू त्यांत छापलेलीं चित्रें लोकप्रिय होऊं लागलीं तसा त्याचा व्यापहि वाढूं लागला. याच सुमारास बुधवारवाड्यास आग लागून त्यांतील सरकारी पुस्तकांचें दुकान जळून गेलें होतें. विष्णु-

शास्त्र्यांच्या डोक्यांत नवीन दुकान काढण्याची कल्पना आली. बुधवार पेठेंत ' किताबखाना ' नांवाचें दुकान त्यांनीं शाळिग्रामांच्या भागीनें सुरू केलें.

## नोकरीचा राजीनामा

अशा रीतीनें नोकरी सोडण्यापूर्वीं स्वतंत्र रीतीनें आपला निर्वाह चालविण्याचीं तीन साधनें निबंधमाला, चित्रशाळा व किताबखाना हीं विष्णुशास्त्र्यांनीं सिद्ध केलीं. सहा महिन्यांची रजा संपतांच त्यांनीं नोकरीचा राजीनामा रत्नागिरीस हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. नारायण विनायक साठे यांजकडे पाठवून दिला. श्री. साठे व त्यांचे सहकारी यांस या अकल्पित घटनेनें फार वाईट वाटलें. सुखाची नोकरी सोडून हा गृहस्थ भलत्याच फंदांत पडत आहे असेहि उद्गार कांहीं मंडळींच्या तोंडून बाहेर पडले. श्री. साठे यांना रहावेनाच. त्यांनीं विष्णुशास्त्र्यांस पत्र लिहिलें कीं, " तुम्हीं राजीनामा पाठविला आहे तो मे. डायरेक्टरसाहेब यांजकडे तसाच पाठवूं काय ? परंतु जर कदाचित् तुमचा विचार फिरेल व त्याबद्दल तुम्ही मला कळवाल तर राजीनामा मी पुढें पाठवीत नाहीं. " हें पत्र वाचून विष्णुशास्त्र्यांना हंसूंच आलें असेल. अर्धवट विचार त्यांच्या स्वभावांत केव्हांच नव्हते. एखादी गोष्ट करावयाची ठरली म्हणजे तींत ते अंतर पडूं देत नसत. त्यांनीं लागलीच श्री. साठे यांस पत्रद्वारें कळविलें कीं, " राजीनाम्याविषयींचा माझा फार दिवसांचा व पक्का निश्चय झालेला आहे; तो आतां मी फिरवूं इच्छीत नाहीं. तुम्ही कृपा करून राजीनामा मंजुरीसाठीं पुढें पाठवून द्यावा. "

सरकारी नोकरीची बेडी व सरकारी अधिकाऱ्यांचा जुलूम या गोष्टींचा विष्णुशास्त्र्यांस इतका वीट आला होता कीं, नोकरी सोडल्याशिवाय त्यांच्या मनास समाधान लाभलें नसतें. त्या काळीं सरकारी नोकरी हा ' देवाचा वर '

समजला जाई. अशा परिस्थितींत विष्णुशास्त्र्यांनीं नोकरीवर लाथ मारली या वार्तेनें महाराष्ट्रभर बरीच चर्चा सुरू झाली. राजीनाम्याच्या कारणांविषयीं अनेकांनीं अनेक तर्क केले. त्यांत कोणी बरें म्हणणारे होते, कोणी वाईट म्हणणारे होते. तरी पण एवढी गोष्ट निःसंशय खरी आहे कीं, त्यांच्या या धाडसाचें सर्वांनाच आश्चर्य वाटलें, कौतुक वाटलें. नोकरी सोडण्याचीं कारणें विष्णुशास्त्र्यांनीं आपल्या एका मित्रास पत्रांतून कळविलीं आहेत. ते लिहितात कीं, " मीं सरकारी नोकरीचा राजीनामा दिला, त्यासंबंधानें येथील व रत्नागिरीच्या मंडळींत बराच गवगवा झाला आहे, पण याचें आश्चर्य करण्याचें कांहींच कारण नाहीं. गुलामगिरी करून पोट भरण्याची आमच्या लोकांची हीन दशा लक्षांत आणली म्हणजे राजसेवा ही ईश्वरदत्त अजब चीज आहे असें जें समजतात, तें ठीकच आहे, असें म्हटलें पाहिजे. अशा वेळीं सरकारी नोकरी बुद्धिपुरःसर सोडून देणें म्हणजे शुद्ध वेडेपणा किंवा प्रत्यक्ष आत्मघात करण्यासारखेंच नव्हे तर काय? परंतु मला विचाराल, तर यासंबंधानें माझी समजूत अगदीं निराळी आहे. जुलमी स्वभावाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांपुढें मस्तक नमविण्यापेक्षां एकदम सर्व संबंध तोडून मोकळें व्हावें हें बरें. मी इथें असतां, × × शीं कशा रीतीनें वागत होतों हें आपल्याला मीं अनेक वेळां सांगितलें आहे. माझी रत्नागिरीस बदली झाली तेव्हांच मीं नोकरी सोडावयची; परंतु कित्येक कारणांमुळें मला माझी जन्मभूमि व आप्तवर्ग सोडून जाणें भाग पडलें. तरी पण तेव्हां सुद्धां योग्य संधि आली कीं स्वातंत्र्यावलंबन करावयाचें असा माझा ठाम विचार झाला होता.

यावरून आपल्या लक्षांत आलेंच असेल कीं, सरकारी शाळेंत पोरें हाकण्याच्या म्हारकीचा मला अगदीं तिटकारा आला होता; व हेंच माझें नोकरी सोडण्याचें मुख्य कारण ...... एक छापखाना काढून तो चांगली मेहनत घेऊन चालवावा व तद्द्वारें होईल तितकें करून देशहित करावें असा माझा विचार आहे. सवडीसवडीनें 'अरेबियन् नाइट्स्' या पुस्तकाच्या

उरलेल्या भागांचें भाषांतर तुम्हांस मिळेल. तसेंच, शालापत्रकांत छापलेले मराठी व्याकरणावरील निबंध, बाकीच्या संस्कृत कवींवरील निबंध, व दुसरीं जीं कित्येक पुस्तकें तयार करण्याचें फार दिवसांपासून माझ्या मनांत वागत आहे, तीं आतां लौकरच लोकांपुढें येतील.

वर जें लिहिलें आहे त्यावरून तुम्हांस कळेलच कीं रुपेरी बेडी पायांत न वागविण्याचा माझा निश्चय घटका अर्ध-घटकेचा नव्हता !"

कुठें ही स्वाभिमानी वृत्ति आणि कुठें सरकारी नोकरांचा मिंधेपणा ! हा मिंधेपणा स्पष्ट करणारें एक पत्र श्री. बेलसरे यांनीं आपल्या पुस्तकांत दिलें आहे. काठेवाडांतल्या एका संस्थानांतील एका गुजराथी मित्राला एका दक्षिणी विद्वान् गृहस्थांनीं हें पत्र लिहिलेलें आहे. विष्णुशास्त्र्यांशीं संबंधित असलेला तेवढाच भाषान्तरित उतारा खालीं देत आहोंत. मूळ पत्र गुजराथींत आहे. वरिष्ठांची गैरमर्जी झाली तर त्याचा काय परिणाम होईल याचें उदाहरण दक्षिणेंत घडलें आहे असा प्रस्ताव करून पत्रकार लिहितात—" रा. विष्णुशास्त्री चिपळूणकर नांवाचे एक ग्रॅज्युएट गृहस्थ रु. १०० पगारावर पुण्याच्या हायस्कुलांत मास्तर होते. हे गृहस्थ विद्वान् आहेत. त्याचप्रमाणें त्यांना मराठी भाषेंत लिहिण्याची मोठी हौस आहे. मला या बाबतींत चांगलीशी माहिती नाहीं, पण त्यांच्या लेखनांत सरकारच्या विरुद्ध व सर्वच विद्वान् लोकांना रुचणार नाहीं, अशी तिखट भाषा लिहिली जाते. आणि त्यामुळेंच त्यांना नोकरी सोडून द्यावी लागली. तेव्हां तुम्ही संभाळावें. ते गृहस्थहि मोठ्या धीराचे आहेत. शंभर रुपयांच्या नोकरीवर त्यांनीं लाथ मारली. त्यांच्या वडलांचें सरकारांत मोठें वजन होतें. पण त्याचा काय उपयोग ? ते आतां कसेबसे पुण्यांत दिवस काढीत आहेत. त्यांनीं एक खासगी शाळा काढली आहे. त्यांतून जो लाभ होईल तो ते जाणूं इच्छीत आहेत. अफसोस ! अफसोस !! मला बिचाऱ्याची फार कींव येते ! कुठेंहि नोकरीवर राहून देशाची त्याचप्रमाणें देशी भाषेची

त्यांना बेशक सेवा करतां आली असती. सांप्रत तुमची स्थिति या गृहस्थां-पेक्षां अगदीं निराळी आहे असें मला वाटतें." इत्यादि इंग्रजांच्या नोकरीनें गुलाम बनलेल्या मनोवृत्तीचें किती हिडीस चित्र आहे हें बरें ?

## ध्येयचिंतन

विष्णुशास्त्र्यांनीं नोकरी सोडली व तेथपासूनच त्यांच्या सार्वजनिक जीवनाला खरी सुरुवात झाली. त्यांनीं मनाशीं ठरविलेंच होतें कीं 'इत-उत्तर अध्ययन, अध्यापन व ग्रंथलेखन या तीन उद्योगांत' काल घालवा-वयाचा. 'निबंधमाला' चालूच होती, जोडीला एक शाळा काढावी असा त्यांनीं बेत केला. शाळेची निर्मिति केवळ पोटाचा धंदा म्हणून त्यांना करावयाची नव्हती. दोन हेतु प्रामुख्यानें त्यांच्या नजरेसमोर असावे. एक व्यावहारिक, तो असा कीं सरकारी शाळेंत दिलें जाणारें शिक्षण राष्ट्रीय दृष्ट्या कुचकामी असल्यानें व त्या शिक्षणानें सुशिक्षितांमध्यें एक प्रकारचें मानसिक दास्य उत्पन्न होत असल्यानें त्या शिक्षणाऐवजीं निराळ्या तऱ्हेचें शिक्षण द्यावें व तेंहि कमी खर्चाचें असावें. दुसरा हेतु उदात्त होता. तत्कालीन शिक्षणानें मनुष्य 'स्वत्व' हिरावून बसे. स्वधर्म, स्वभाषा, स्वदेश यांबद्दल वाटणारा जिव्हाळा शिक्षणानें नाहींसा होई. या शिक्षणाचा परिणाम किती घातुक होई याचें वर्णन लो. टिळकांनीं पुढीलप्रमाणें केलें आहे—

"इंग्रजी शाळांतून पहिल्यापहिल्यानें जी मंडळी बाहेर पडली त्यांच्या मनाची स्थिति एक प्रकारें फारच भयंकर व शोचनीय झालेली होती. स्वधर्माचें किंवा त्यांतील नीतितत्त्वांचें शिक्षण बिलकुल नाहीं आणि पर-धर्माचेंहि नाहींच नाहीं. समाजाच्या परंपरागत बंधनांबद्दल आदर असा-वयाचा तोहि नाहींसा झाला, आणि दोन-चार बुकें झाल्यावर बऱ्याच मोठ्या पगाराची जागा त्या वेळीं मिळत असल्यामुळें, अधिकारपदाचाहि बराच अंमल यांच्या मनांवर बसलेला होता. युरोपांतील किंवा विलायतेंतील

शाळांतून अशाच तऱ्हेचें शिक्षण मिळतें; पण स्वदेशप्रीति, स्वधर्मनिष्ठा, समाजाबद्दल आदर व प्रेम, सदाचरणाची गोडी वगैरे जे गुण बुद्धीचा चांचल्यदोष घालवितात त्यांच्या साहाय्यानें ते शिक्षण मनुष्यास बेहोष करीत नाहीं. आमच्या इकडे या सर्व बंधनांचा अभाव असल्यामुळें त्याच शिक्षणापासून स्वल्पज्ञानानें संतुष्ट, बेपर्वा, स्वहितापलीकडे लक्ष न देणारे आणि स्वतःसच विद्वान् मानून सर्व प्राचीन मतांचा उपहास करणारे असे नवे म्होरपे या कारखान्यांतून प्रथमतः तयार झाले, परंतु याहीपेक्षां विशेष दुर्दैवाची गोष्ट म्हटली म्हणजे या लोकांचा सरकारांतून त्या वेळीं जो मान होत असे तो होय. राज्यकारभाराच्या नवीन पद्धतीस इंग्रजी जाणणाऱ्या माणसांची त्या वेळीं जरूरी होती. यामुळें या अर्ध्याकच्च्या विद्वानांस मोठ्या नोकऱ्या मिळून, अधिकारामुळें त्यांस समाजांत एक प्रकारचा मोठेपणा प्राप्त झाला. तात्पर्य, अव्वल पेशवाईत कुलशील, पराक्रम, सदाचरण, संपत्ति वगैरे गुणांनीं ज्यांच्या पूर्वजांनीं लोकनायकत्व संपादन केलें होतें, त्यांचे वंशज लवकरच भिकेस लागून, त्याचें स्थान समाजाच्या खालच्या वर्गातील अर्धवट इंग्रजी शिकलेल्या या मंडळींस प्राप्त झालें.''

'शालापत्रक' या मासिक पुस्तकाच्या सन १८७२ च्या जानेवारीच्या अंकांत विष्णुशास्त्री यांनीं 'शिक्षकाचें काम' या विषयावर निबंध लिहिला आहे. त्यांत त्यांनीं खालील प्रकारचे विचार प्रकट केले आहेत,—"हल्लीं विद्येचा फार फैलाव झाला. व अभिरुचि वाढली, असें वाटतें पण ती भ्रांति आहे. केवळ सरकारी चाकरीच्या लोभानेंच आमचे लोक विद्या शिकतात. त्यांना विद्येचें व्यसनच काय पण साधारण आवडहि नसते. युनिव्हर्सिटीचे झगे अंगांतून काढतांना त्याबरोबरच स्वदेशाभिमान, विद्याभिरुचि, दुर्जन-तिरस्कार वगैरे सणावाराच्या दिवशीं घालावयाचीं जीं मनाचीं अलंकार-भूषणें तींहि ते काढून ठेवतात. स्वतः शिक्षकालाच आपल्या कामाची थोरवी वाटत नाहीं; मग ती इतरांना कशी वाटावी! उपाय नाहीं म्हणून शिक्षकाचें

काम करावयाचें ही जी त्यांची समजूत तीच लोकांची. पूर्वी गुरुविषयीं शिष्याचे मनांत पूज्यबुद्धि असे. हल्लीं ती नाहीं. उभयपक्षीं संबंध केवळ स्वार्थाचा. शिकविण्याचे विषयहि बांधलेले. धर्म, नीति वगैरेंचें वारें देखील शिक्षणाला लागूं नये अशी सरकारची व्यवस्था. पण ही स्थिति बदलून शिक्षण चालू असतां शिक्षक जर विद्यार्थ्यांच्या मनांत विद्येची खरी थोरवी भरून देऊन तिच्या अभ्यासानें होणाऱ्या अनिर्वाच्य सुखाची त्यांना चट लावून उत्साह उत्पन्न करतील तर शिक्षण हें, ठिसूळ न बनतां तरवारीच्या पोलादासारखें कठिण व लखलखीत होऊन, फार दिवस धिन्हाड करून ज्या अरिष्टरूपी राक्षसांनीं या देशास जेरीस आणलें त्यांचें निर्दाळण करील. व तेणेंकरून सुशिक्षित लोक व त्यांचे कारागीर म्हणजे शिक्षक यांचें दिव्य यश भूमंडळावर मिरवेल."

वरील दोन्ही उताऱ्यांवरून स्पष्ट दिसून येतें कीं, विष्णुशास्त्री व टिळक यांची विचारसरणी जवळजवळ एकाच प्रकाराची होती. समाजाची सेवा करण्याचे मुख्य दोनच मार्ग होते. जुन्या पिढीला उपदेश करणें व नव्या पिढीला शिक्षण देणें. पैकीं पहिला मार्ग म्हणजे उपड्या घड्यावरील ओतलेल्या पाण्याप्रमाणें फुकट जाणारा होता. दुसराच मार्ग खरा परिणामकारक होण्याचा पुष्कळसा संभव होता. शाळास्थापनेंत हा हेतु प्रमुख होता.

## सहकाऱ्यांचा लाभ

योगायोग मात्र खरोखर विलक्षण होता ! विष्णुशास्त्री गांवांत शाळा काढण्याचा विचार करीत होते, त्या समयास डेक्कन कॉलेजांत टिळक व आगरकर हे तरुण देशसेवेचें असिधाराव्रत स्वीकारण्याचा संकल्प सोडण्याच्या तयारींत होते. देशाच्या खालावलेल्या परिस्थितीनें दोघांचींहि मनें व्यथित होत होतीं. कांहीं तरी देशसेवा करावी ही बलवत्तर प्रेरणा दोघांच्याहि मनांत उद्भूत झाली होती. देशसेवा म्हणजे लक्ष्मीची अवकृपा ही गोष्ट दोघेहि पूर्णपणें जाणून होते. आपल्या व्रताचा आरंभ जनतेंतील अज्ञान-निरसनाच्या

कामानें करावा असें दोघांनीं ठरविलें. स्वतंत्र शाळा काढण्याचा बेत ठरला. त्या वेळचे प्रसिद्ध पुढारी म्हणजे न्यायमूर्ति माधवराव रानडे. त्यांचीहि या दोघांनीं भेट घेतली. त्यांचा आशीर्वाद मिळविला आणि शाळेसंबंधीं जुळवाजुळव करण्याच्या कामास सुरुवात झाली. इतक्यांत विष्णुशास्त्रीहि याच कार्याला प्रवृत्त झाले आहेत असें त्यांच्या कानांवर गेलें आणि दोघेहि शास्त्रीबुवांस भेटण्यासाठीं नारायण पेठेंतील त्यांच्या घरीं आले. थंडीचे दिवस होते. बोलणीं होऊन परत जातांना थंडीचा चांगलाच कडाका होता, पण अन्तःकरणाला ध्येयपूर्तींच्या समाधानाची विलोभनीय ऊब लाधल्यामुळें बाहेरील थंड वातावरणाची पर्वा न करतां देशाचे हे भावी पुढारी परत कॉलेजच्या वसतिगृहांत आले.

टिळक—आगरकरांच्या जोडीला आणखीहि दोन तरुण होते. बाळाजी आबाजी भागवत आणि व्यंकटेश बाळाजी करंदीकर हे डेक्कन कॉलेजचे बुद्धिमान् विद्यार्थी प्रथम या शुभ संकल्पांत सामील झाले होते. टिळक आगरकरांची भेट झाल्यावर विष्णुशास्त्र्यांस मोठा हुरूप आला. ता. १३ सप्टेंबर १८७९ रोजीं त्यांनीं आपले धाकटे बंधु लक्ष्मणराव यांस एक पत्र पाठविलें त्यांत आपला बेत यशस्वी होण्याचा योग अकल्पित रीतीनें सिद्धीस गेल्याची खुषखबर मोठ्या ऐटीनें लिहिली आहे. "ता. १ ऑक्टोबरचा संस्मरणीय दिवस जवळ येत चालला आहे. गुलामगिरीच्या बेड्या लाथेनें तोडून टाकून मोकळें होण्याचें सुख त्या दिवशीं मला अनुभवावयास मिळणार आहे. टिळक, आगरकर, भागवत, करंदीकर यांनीं आपण होऊन मजकडे येऊन ( शाळा काढण्याच्या ) माझ्या साहसी कृत्यांत सामील होण्याचें आपखुषीनें कबूल केलें आहे. ता. १ जानेवारी १८८० हा दिवस आमचें निशाण उभारण्याला आम्हीं मुक्रर केला आहे. अशा तोफखान्यापुढें ( सरकारी ) हायस्कूल किती वेळ टिकाव धरणार! तें जमीनदोस्त झालेंच पाहिजे."

अशा रीतीनें पूर्वतयारी होत असतांच शास्त्रीबुवांनीं नवीन शाळेबद्दल वर्तमानपत्रांतून जाहिरात प्रसिद्ध करून टाकली.

## शाळेची तयारी

ही जाहिरात प्रसिद्ध होण्यापूर्वीच विष्णुशास्त्री हे पुढील सालाच्या आरंभापासून नवीन शाळा काढणार ही बातमी विद्यार्थ्यांमध्यें दाट पसरली होती. यामागें कोणतीहि नवीन शाळा निघण्याच्या अगोदर पुणें शहरांत विद्यार्थ्यांमध्यें एवढी चळवळ उत्पन्न झाली नव्हती. विष्णुशास्त्र्यांच्याबद्दल विद्यार्थ्यांमध्यें त्यांच्या सुस्वभावामुळें, त्यांच्या विद्वत्तेमुळें व त्यांच्या उदात्त वर्तनामुळें जितका पूज्यभाव निर्माण झाला होता तितक्या यापूर्वी कोणाहि शिक्षकाविषयीं त्यांमध्यें निर्माण झाला नव्हता. कित्येक विद्यार्थ्यांस ही बातमी पक्की आहे असें समजतांच ते दोन दोन महिने अगोदरच सरकारी हायस्कूल सोडून घरीं बसले होते. त्यांत कित्येक त्या वेळचे नांवाजलेले पगारी विद्यार्थीसुद्धां होते. अशा विद्यार्थ्यांस या नवीन होणाऱ्या शाळेविषयीं उल्हास वाटून आपण जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ति या नवीन शाळेंतून उत्तीर्ण होऊन मिळवावी अशी फार मोठी महत्त्वाकांक्षा होती. ही गोष्ट पुण्याची; पण या शाळेची प्रस्थापना होणार या बातमीनें महाराष्ट्रांतहि मोठें कुतूहल पसरलें होतें. रत्नागिरी येथील शाळेंत शास्त्रीबुवा अवघे वर्ष सव्वा वर्ष होते नव्हते, पण ते पुण्यास नवीन शाळा काढीत आहेत हें ऐकून श्री. वामनराव पोतदार इत्यादि विद्यार्थी रत्नागिरी सोडून पुण्यास आले. अशा रीतीनें न्यू इंग्लिश स्कूल स्थापन होण्यापूर्वी त्या सालच्या डिसेंबर महिनाभर पुण्यांत मोठी चळवळ होऊन राहिली होती.

श्री. वासुकाका जोशी यांचेंहि साहाय्य विष्णुशास्त्र्यांस या वेळीं झालें. ते दोघे एकत्र राहात. रात्रीं दोघांच्या गप्पा होत. न्यू इंग्लिश स्कूल कोठें सुरू करावें याचा विचार ठरला व ती जागा पहावयास शास्त्रीबुवा व

वासुकाका गेले. मोरोबादादांच्या वाड्यांत ही शाळा प्रथम सुरू झाली. त्या जागेला महिना फक्त २० रुपये भाडें होतें. जागा अत्यंत अस्वच्छ होती. या दोघांनींच जागेंतील घाण काढून स्वच्छता केली. पुढें शाळेकरितां बाकें हवीं होतीं. भवानी पेठेंत जाऊन तीस बाकें विकत आणलीं. यासाठीं लागणारा सर्व खर्च शास्त्रीबुवांनीं केला. ऑक्टोबरमध्यें शाळा सुरू करण्याचा पहिला बेत होता पण टिळक—आगरकरादि मंडळी डिसेंबरमधल्या स्वतःच्या परीक्षा आटोपून येणार होती म्हणून १ जानेवारी १८८० रोजीं शाळा सुरू करण्याचें शास्त्रीबुवांनीं ठरविलें. पण आदल्याच दिवशीं त्यांच्यावर एक घरगुती आपत्ति ओढवली. डिसेंबर महिन्यांत भर हिंवाळ्यांत पुण्यास कॉलरा प्रथम सुरू झाला. विष्णुशास्त्र्यांचे चुलते सीतारामपंत यांची बायको या कॉलऱ्याला बळी पडली. या प्रसंगामुळें एक तारखेचा समारंभ झाला नाहीं. ता. २ रोजीं विष्णुशास्त्र्यांनीं हा समारंभ वेळांत वेळ काढून उरकून घेतला. त्यांनीं प्रथम थोडें इंग्रजींत भाषण केलें व शाळा स्थापन करण्याचे हेतु जमलेल्या लोकांस समजावून दिले. सुमारें १५० मुलांनीं नांवें नोंदविलीं व शाळेच्या कामास सुरुवात झाली.

## शाळेचा आरंभ

शाळेला आरंभ झाला त्या वेळीं टिळक उपस्थित होते. आगरकर एम्. ए. च्या परीक्षेंत नापास झाल्यामुळें व थोडक्याकरितां पदवी बुडवून शाळेला येऊन मिळण्यांत आगरकरांपेक्षां शाळेचेंच नुकसान अधिक होण्याचा संभव असल्यानें त्यांनीं एक वर्षभर मागें रहावें असा सल्ला त्यांना मिळाला व तो योग्यहि होता. भागवत-करंदीकर यांच्या उत्साहावर आयत्या वेळीं कुणीं पाणी ओतलें कीं त्यांनीं आपण होऊनच बेत बदलला हें कांहीं समजत नाहीं. ते आलेच नाहींत व त्यांच्यावांचून शाळेचें अडलेंहि नाहीं. शास्त्रीबुवांजवळ शिक्षकवर्ग तयार होता. त्यांत धारप, मांडे, वासुदेवशास्त्री खरे, माधवराव नामजोशी इत्यादि मंडळी होती.

सुरुवातीस १५० मुलांनीं नांवें नोंदविलीं तरी प्रत्यक्ष उपस्थिति सतराच होती. बाकामागें एक मुलगा हें प्रमाण पडलें. पुढें हळूहळू विद्यार्थ्यांची संख्या भराभर वाढूं लागली. थोड्याच महिन्यांत नवीन शाळेनें आपलें प्रस्थ इतकें चांगलें बसविलें, कीं सरकारी हायस्कूलला चांगली ओहोटी लागली.

मे महिन्याच्या सुट्टीकरितां शाळा बंद होण्याच्या वेळीं शास्त्रीबुवांनीं इंग्रजींत लिहिलेलें आपलें भाषण वाचून दाखविलें. त्या भाषणांत राष्ट्रीय शिक्षणाची कल्पना अनेक अंगांनीं झळकत होती. पुण्यांतील इतर मृत किंवा मृतप्राय अशा शिक्षणसंस्थांचा तुच्छतापूर्वक उल्लेख होता व अवघ्या तीन महिन्यांत या शाळेंतील मुलांची संख्या ५०० वर गेल्याविषयीं सहजच अभिमान व्यक्त केला होता. या भाषणांत थोडीशी उद्दामवृत्ति स्पष्टपणें दिसते, पण शास्त्रीबुवा व त्यांचे तरुण सहकारी मित्र यांनीं तत्कालीन लब्ध-प्रतिष्ठितांकडून खुळे, वेडे, टाकाऊ, भ्रांतिष्ट, शेख महंमदी, माथेफिरू असल्या शेलक्या विशेषणांची वृष्टि सोसलेली होती.

शास्त्रीबुवांच्या भाषणांतील इतर मुद्दे पुढीलप्रमाणें होते :

" आमच्या शाळेंत शिक्षकांप्रमाणें विद्यार्थ्यांनाहि पूर्ण व्यक्तिस्वातंत्र्य दिलें जातें. दर तासाला हातांत छडी घेऊन वर्गांवरून तपासणीची गस्त घालीत जाणारा हेडमास्तर येथें भेटणार नाहीं. सरकारी इन्स्पेक्टराचा बागुलबोवा केव्हां फेरी घालील कीं काय, अशी दहशत शिक्षकांनाहि वाटा-वयाला नको. नवा हेडमास्तर आला कीं, तो आपल्या लहरीप्रमाणें पोशाख चालचलणूक वगैरेंची नवीन शिस्त पाडतो, व तिचा अंमल चोपून करवितो ही आपत्तीहि येथें अनुभवास येणार नाहीं. सरकारी शाळांतून पाहिलें तर घड्याळ व वेळापत्रक यांच्या यंत्रांत सांपडून शिक्षक कळसूत्री बाहुल्यां-प्रमाणें कामें करीत असतात; व पोटाला भाकर मिळावी म्हणून वरिष्ठांची आज्ञा शेळपटाप्रमाणें पाळून व स्वाभिमान गिळून वरिष्ठांच्या गुरगुरण्याच्या

आवाजांत मेंढारांप्रमाणें मुठींत जीव धरून काळ कंठीत असतात. आमच्या शाळेंत अनादिसिद्ध अशी वेताची छडी दिसणार नाहीं, किंवा कोणा विद्यार्थ्यानें योग्य शिस्तीचें अतिक्रमण केल्यास तिकडे दुर्लक्ष केलें जाईल असेंहि नाहीं. तथापि पंतोजी या एका शब्दांत जी कदर पूर्वानुभवानें साठविलेली आहे ती या ठिकाणीं बरीच सौम्य झालेली विद्यार्थ्यांनाहि आढळून येईल. शाळातपासनीस हा जसा शिक्षकांना बागुलबोवा वाटणार नाहीं तसाच विद्यार्थ्यांनाहि शिक्षक हा बागुलबोवा वाटणार नाहीं. परिप्रश्न-पद्धतीनें ज्ञान मिळविण्याची मोकळीक विद्यार्थ्यांना हवी तितकी मिळेल. बिचाऱ्या विद्यार्थ्यानें माहिती मिळविण्याकरितां प्रश्न विचरावे, आणि अज्ञानी शिक्षकानें अज्ञानाची लाज झांकण्याकरितां उगीच गुरगुरावें किंवा उलट विद्यार्थ्यावर खेंकसून तोंड टाकावें, असेंहि येथें होऊं दिलें जाणार नाहीं. तरुण विद्यार्थी हे बोलूनचालून भावनाप्रधानच असतात ही गोष्ट लक्षांत ठेवून त्यांच्या खुल्या उद्‌गारांना उर्मटपणा हें भलतें नांव आम्हांकडून देण्यांत येणार नाहीं व त्यांच्या प्रगतिशील प्रवृत्ति केवळ शिस्तीच्या वजनाखालीं दडपून टाकल्या जाणार नाहींत.”

विद्यार्थ्यांनाहि त्यांनीं जो उपदेश केला तो समंजसपणाचाच होता. ते त्यांना म्हणाले, “ बाबांनो, झोंपा काढून, किंवा उनाडक्या करून पैशा-पासरी शिष्यवृत्त्या खाऊन बी. ए. म्हणून परत गांवीं गेलें कीं, लोकांनीं अद्‌भुतदर्शन म्हणून आपल्या भेटीस यावें, हे जुने दिवस आतां गेले. हल्लीं जीवनकलह दसपट तीक्ष्ण झाला आहे. धकाधकीचा मामला जोरांत चालला आहे. म्हणून सुट्यांच्याहि दिवसांत तुम्हांला झटून अभ्यास केला पाहिजे. धनुष्याची दोरी नेहमींच चढवून ठेवूं नये हें खरें पण अभ्यास व करमणूक यांच्या अलटापालटीनें दोहोंचाहि मेळ घालावा. खेडेगांवीं जाणाऱ्या विद्यार्थ्यांनीं सृष्टिसौंदर्य व सुख यांचा लाभ घ्यावा. मुंबईसारख्या मोठ्या



अनुक्रम २९८९६
विभाग वा. वा.
क्रमांक १९८६
नों. दि. ३-४-६१

शहरांतून सार्वजनिक हितबुद्धीनें अनेक लोकांनीं अनेक संस्था निर्माण करून ठेविलेल्या असतात त्यांचाहि लाभ विद्यार्थ्यांना सहज मिळण्यासारखा असतो. ”

## शाळेबद्दल जनमत

न्यू इंग्लिश स्कूलबद्दल जनतेंतहि चांगलें मत होतें. रे. प्रि. मॅक्किन लिहितात, “ सरकारी मदत कोणत्याहि प्रकारें न घेतां किंवा घेण्याची आशाहि न धरतां, पुण्यांतील ही संस्था अशा धडाडीनें उच्च शिक्षणाचें काम करूं लागली असल्यानें, दरसाल ११–११॥ हजार रुपये खर्च करून पुण्याचें सरकारी हायस्कूल कां चालू ठेवावें हा प्रश्नच आहे. ” सरकारी हायस्कूलचे अधिकारी मात्र ‘ न्यू इंग्लिश ’ ला जितका विरोध करतां येईल तेवढा करीत होते. “ रोमँटिक पोरें ” प्रत्यक्ष काय पराक्रम करणार अशा अर्थाचा उपहास श्री. कुंटे यांनीं केला होताच. हायस्कूलचे हेड-मास्तर श्री. वामन आबाजी मोडक यांनीं आपल्या वार्षिक अहवालांत पुढील मजकूर घातलेला आढळतो, “ येथें कांहीं उनाड व हुच्चे तरुण लोकांनीं एक नवीन खासगी शाळा काढल्यामुळें तूर्त आमच्या शाळेंतील संख्या कमी झाली आहे. परंतु अशा शाळेची स्थिति केवळ कुत्र्याचे झाडाप्रमाणें क्षणिक असल्यामुळें आमच्या शाळेची संख्या नेहमींची कमी होण्याची फारशी भीति नाहीं. ”

विष्णुशास्त्री शाळेसाठीं अहर्निश झटत होते, त्याग करीत होते. आरंभीं लागणारे पैसे त्यांनींच दिले होते. पुढें त्यांनीं आपला सर्व ग्रंथसंग्रह शाळेला देऊन टाकला. पैशासंबंधीं शास्त्रीबुवांनीं कधीं फिकीर केली नाहीं. जी वृत्ति त्यांच्या घरच्या व्यवस्थेंत होती ती शाळेंतहि दिसून आली. याचें प्रत्यंतर शिक्षक मंडळी मिळवितांना दिसून येतें. श्री. वामनराव शिवराम आपटे हे अत्यंत बुद्धिमान् गृहस्थ होते. ते प्रथम एका मिशन स्कूलमध्यें शिक्षक होते. त्यांनीं सरकारी नोकरीकरितां अर्ज केला होता, व कल्याणला त्यांची नेम-

णूकहि झाली होती. प्रोफेसर होण्याची लायकी असतांना आपणाला कल्याणच्या पांच इयत्तेच्या शाळेंत सरकारनें नेमावें ही गोष्ट आपट्यांच्या मनाला लागली, व अचूक याच वेळीं टिळकांनीं त्यांना न्यू इंग्लिश स्कूलमध्यें येतां का म्हणून विचारलें. कल्याणची ७० रुपयांची नोकरी व न्यू स्कूलची ३० रुपयांची. आपटे थोडे कुरकुरूं लागले. लगेच शास्त्रीबुवांनीं अपवाद म्हणून त्यांना ५० रुपये देण्याचें ठरविलें. इतरांचा किंबहुना संस्थापकांचा पगार कमी व साध्या शिक्षकाचा अधिक असा हा चमत्कारिक प्रकार होता. पण आपट्यांसारखा हुषार गृहस्थ शाळेला लाभतो आहे ही एकच गोष्ट चिपळूणकर-टिळक-आगरकर यांच्यापुढें होती.

## शास्त्रीबुवांचें असमाधान

अशा रीतीनें शाळेचा लौकिक व प्रतिष्ठा दिवसेंदिवस वाढत होती. पण शास्त्रीबुवांना मात्र समाधान लाभत नव्हतें. शाळा स्थापन करतांना जीं ध्येयें त्यांनीं आपल्या समोर ठेविलीं होतीं, त्यांजकडे पुष्कळ शिक्षकांचें दुर्लक्ष होत होतें. शाळेची योग्यता ठरविण्याचा शास्त्रीबुवांचा निकष व इतर शिक्षकांचा निकष यांत अंतर पडूं लागलें. परीक्षेचा निकाल कसा उत्तम लागेल व आपल्या शाळेंतील जास्तींत जास्त विद्यार्थी कसे पास होतील याकडे बहुतेक शिक्षकांचें लक्ष असे. शिवाय चिपळूणकर–टिळक–आगरकर हे जसे आत्मस्फूर्तीनें या उद्योगाला लागले होते, ती वृत्ति इतर शिक्षकांत नव्हती व तशी ती असावी अशी अपेक्षा करणेंहि जरा व्यवहाराला सोडून होतें. पुढें सरकारी ग्रँटचा प्रश्न निघाला. शास्त्रीबुवांना तर ही गोष्ट मनापासून नको होती. पण बहुमतानें ठरलें व सरकारी ग्रँट मागण्यांत आली व ती घेण्यांतहि येऊं लागली. शाळेची मूळची स्थिति आतां पालटली. म्हणजे तिचा सार्वजनिक लौकिक कमी झाला असें नव्हे, उलट तो सारखाच वाढत होता, पण मूळ ध्येयापासून ही मंडळी दूर चालली होती. खासगी शाळेंतील शिक्षक इन्स्पेक्टरला व्यक्तिशः फारसे भीत नाहींत हें

खरें, पण संस्थेला ग्रँट जास्त मिळण्याला इन्स्पेक्टरची शिफारस अवश्य असल्यानें, स्वतःकरितां नसलें तरी संस्थेकरितां त्यांना किंचित् दबून नमून वागावें लागतेंच. विष्णुशास्त्री हे स्वतः वेळापत्रकाला फारशी किंमत देणारे नव्हते, त्यामुळें आपला तास संपून गेला तरी ते एकाच वर्गावर शिकवीत बसत. त्यामुळें त्या तासाचे शिक्षक कुरबुरत. पुढें आपटे हे शाळेचे मुख्य झाले. त्यांचा वक्तशीरपणा आणि निर्भीडपणा वाखाणण्यासारखा होता. ते एक आदर्श शिक्षक होते. त्यामुळें त्यांच्या कारकीर्दीला सुरुवातच घड्याळ, वेळापत्रक व छडी या तिहींच्या कडक अमलानें झाली.

शास्त्रीबुवांची विषण्णता वाढत गेली. इकडे शाळेची कीर्ति अख्या भारतांत दुमदुमत होती. मोठमोठे अधिकारी शाळेची मुक्तकंठानें स्तुति करीत होते. वर्तमानपत्रांतून शाळेवर स्तुतीचा वर्षाव होत होता. मॅट्रिक परीक्षेत शाळेचे विद्यार्थी उच्चांक गाठीत होते. 'न्यू स्कूलच्या' तेजापुढें सरकारी हायस्कूल निष्प्रभ झालें होतें. पण बाह्य थाटमाटामुळें शास्त्रीबुवांचें समाधान होत नव्हतें. कुठें तरी कांहीं तरी चुकतें आहे असें त्यांना वाटूं लागलें. ही गोष्ट ते आपल्या सहकाऱ्यांजवळ बोलतील असेहि घनिष्ट संबंध त्यांच्यांत निर्माण झाले नव्हते. शास्त्रीबुवा हे मूळचेच संकोची व मितभाषी. अशा स्थितींत शास्त्रीबुवा उदासीन बनले तर नवल कसलें ? त्यांच्या या औदासीन्याचा त्यांच्या सहकाऱ्यांवर कांहीं परिणाम व्हावा व ते मूळ संस्थापकाशीं समरस व्हावे म्हटलें तर तेंहि अशक्यच. कारण त्या वेळच्या शिक्षकांचें यशापयश मोजण्याचें माप अगदीं निराळें होतें. ते विद्यार्थ्यांच्या मार्कांवर, शाळेला मिळणाऱ्या ग्रॅन्टवर व विद्यार्थ्यांच्या संख्येवर यशाचें मूल्यमापन करीत. चिपळूणकरांनीं त्या मापानें यश मोजलें नाहीं. त्यांना विद्यार्थ्यांचें शील, चारित्र्य, देशाभिमुखी वृत्ति, त्यांच्या ज्ञानाची खोली अभिप्रेत होती. शास्त्रीबुवा झटक्यासरशीं आपल्या संस्थेबद्दल निराश झाले. लोकमान्यांना तोच अनुभव कांहीं काळानंतर आला.

## न्यू इंग्लिशची ख्याति

न्यू इंग्लिश स्कूलच्या प्रतिष्ठेबद्दल टिळक-चरित्रकार कै. तात्यासाहेब लिहितात, " ही कीर्ति तीन-चार तऱ्हेनें वाढली होती. चिपळूणकर, टिळक, आगरकर, नामजोशी वगैरे मंडळींचा स्वार्थत्याग ही पहिली गोष्ट. दुसरी गोष्ट वरील गृहस्थांच्या जोडीला लाभलेले सहकारी शिक्षक-मंडळ. यांत नामजोशी, माधवराव गोळे, वासुदेवराव केळकर, नारायणराव धारप, यशवंत नागेश रानडे, गोपाळराव नंदरगीकर, नागोपंत बापट, रामभाऊ जोशी, हरिभाऊ आमडेकर यांचा समावेश होतो. यांपैकीं गोळे, केळकर, धारप, नामजोशी हे पुढें संस्थेचे तहह्यात सभासदच झाले, व नंदरगीकर, बापट, जोशी वगैरे कायमचे शिक्षक म्हणून राहिले. बहुतेकांनीं आपल्या विषयांत प्रावीण्य मिळविल्याचें प्रसिद्धच आहे. मात्र केवळ स्वार्थत्यागाच्या दृष्टीनें पाहतां टिळक, आपटे, आगरकर, गोळे व केळकर येवढ्यांसच तें श्रेय विशेष देतां येईल; व त्यांतल्या त्यांतहि पहावयाचें तर ही कसोटी टिळक, आगरकर या दोघांना जितक्या रीतीनें लागूं शकते तितकी ती इतरांनाहि लागूं शकत नाहीं. टिळकांनीं हायकोर्टाची सनद हातांत पडली असतांनाहि शिक्षकाची जागा पत्करली, व शास्त्रीबोवांप्रमाणें त्यांनींहि पहिल्या वर्षीं एक पै देखील न घेतां शाळेचें काम केलें. आगरकरांनींहि पदवी घेतांच आपल्या मातोश्रीस पत्र लिहून असें कळविलें होतें कीं, " आपल्या मुलाच्या मोठमोठ्या परीक्षा होत आहेत, आतां त्याला मोठ्या पगाराची चाकरी लागेल व आपले पांग फिटतील असे मोठाले मनोरथ, आई तूं करीत असशील; पण मी आतांच तुला सांगून टाकतों कीं, विशेष संपत्तीची, विशेष सुखाची हाव न धरतां मी फक्त पोटापुरत्या पैशावर संतोष मानून सर्व वेळ परहितार्थ खर्च करणार ! " आपट्यांची मात्र गोष्ट तशी नव्हती. आपटे हे शाळेला मिळाले ते मुख्यतः आत्मस्फूर्तीनें नव्हे,

तर एक प्रकारच्या चुरशीनें ! त्यांना त्या वेळीं त्यांच्या मनाजोगी एखादी प्रोफेसराची किंवा असिस्टंट प्रोफेसराची जागा मिळती तर ती सरकारी शाळाखात्यांतहि त्यांनीं पत्करली असती. किंबहुना एम्. ए. ची परीक्षा पास होतांच पुणें येथील रविवार पेठेंत फडके यांच्या वाड्यांत मिशनरी शाळा होती तिची हेडमास्तरी तात्पुरती पत्करून, नोकरी मिळण्याबद्दल सरकारी विद्याधिकाऱ्यांकडे त्यांनीं रीतसर अर्जहि केला होता. पण त्या-वेळचे डायरेक्टर चॅटफील्डसाहेब यांनीं त्यांना कल्याणच्या एका अँग्लो-व्हर्नाक्युलर स्कूलवर फक्त सत्तर रुपयांची नोकरी देऊं केली. तो त्यांना सहजच अपमान वाटला. या तापलेल्या लोखंडावर टिळक व नामजोशी यांनीं आपल्या संस्थेस येऊन मिळण्याबद्दल आग्रहाचे घावावर घाव घातले त्यांनीं आपटे यांचें मन स्वार्थत्यागास निम्मे अधिक तयार झालें होतें. इतक्यांत त्यांचे सासरे सुप्रसिद्ध गणेश वासुदेव जोशी ऊर्फ सार्वजनिक काका हे वारल्यामुळें आणि आपटे यांनीं पुण्यास राहणें अधिक सोईचें ठरल्या-मुळें, अखेर त्यांनीं संमति दिली. पण शाळेस येऊन मिळण्यापूर्वीं त्यांनीं आपल्या फायद्याच्या अशा कांहीं अटी इतर चालकांकडून कबूल करून घेऊन राखून ठेवल्या. त्यांतील मुख्य ही कीं, शाळेव्यतिरिक्त काम करून जर आपल्या मिळकतींत भर टाकतां आली तर तिला कोणी हरकत घेऊं नये. शिवाय अंगांतील तरतरी, दक्षता कामाची हौस यांमुळें शास्त्रीबुवां-सारखे वडील लोक शाळेंत असतांहि, शाळेचा मुख्याधिकार आपल्या हातीं यावा अशी त्यांची इच्छा होती; आणि शिस्तीची अंमलबजावणी करण्याच्या बाबतींत चिपळूणकरांपेक्षां आपटे हेच अधिक योग्य अशीच सर्वांची खात्री असून युनिव्हर्सिटींत त्यांनीं मिळविलेला मान इतर सर्वांहून अधिक भारी होता; यामुळें मुख्याधिकार त्यांजकडे देणें हें जसें अपरिहार्य तसें इष्टहि होतें. या इष्टापत्तीला मान देऊन चिपळूणकरांसुद्धां इतर चालकांनीं सुपरिंटेंडेंट हा नवा हुद्दा निर्माण करून त्यांसह शाळेच्या देखरेखीचा सर्व

अधिकार आपटे यांजकडे खुषीनें दिला. केळकर व गोळे हे अशा वेळीं संस्थेस येऊन मिळाले, कीं कोल्हापूरच्या प्रकरणामुळें शाळेवर एक प्रकारचें संकट आलें होतें. त्या प्रसंगाला अनुलक्षून सहानुभूतीनें ते प्रथम काम करूं लागले, व थोड्याच दिवसांत संस्थेच्या आवडीमुळें ते तहहयात सभासद म्हणून चिकटून गेले.

न्यू इंग्लिश स्कूलच्या कीर्तीचें तिसरें कारण म्हटलें म्हणजे टिळक व आगरकर यांजवर झालेला कोल्हापूर-प्रकरणांतील खटला व चौथें कारण शाळेच्या चालकांनीं दुसऱ्याच वर्षापासून सुरू केलेलीं केसरी व मराठा वर्तमानपत्रें. याबद्दलचा ऊहापोह पुढें येत आहे.

## नवीन उद्योग

न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना होऊन वर्ष लोटलें नाहीं तोंच उत्साही मंडळींना आपलें कार्यक्षेत्र फारच संकुचित आहे असें वाटूं लागलें. ते सर्व बुद्धिमान् म्हणून नांवाजलेले होतेच व शाळेंत शिकविण्याचें काम करूनहि त्यांना पुष्कळ फुरसद मिळे. तारुण्याचा जोरहि अंगांत होता व सार्वजनिक कामाची तर हौस भारी. बोलणीं होतां होतां त्यांनीं टरविलें कीं, शाळेचें काम चालवून आपण एखादा छापखाना हातीं घ्यावा, व नवीन स्वतंत्र मताचा प्रसार करण्याचा प्रयत्न करावा. स्वतः विष्णुशास्त्री हे यापूर्वी सहा वर्षें ' निबंधमाले 'मुळें उत्कृष्ट साहित्यिक व मार्मिक टीकाकार म्हणून प्रसिद्ध झालेच होते. नामजोशी हे तर हौशी संपादक या नात्यानें सर्वांच्या परिचयाचे होते. आगरकरांना लहानपणापासून लिहिण्याचा नाद होता. अगदीं लहानपणीं कऱ्हाडास असतांना तेथील मुन्सफ अमृत श्रीपत नागपूरकर, हे आपल्या घरीं रविवारच्या सभा भरवीत व उत्तम निबंधास एक-दोन रुपये बक्षीस देत. आगरकरांनीं एकदां एक निबंध वाचला, तो इतका उत्कृष्ट होता कीं तो दुसऱ्या कुणी तरी लिहिला असला पाहिजे अशी मुन्सफ-

साहेबांनीं त्यावर टीका केली. स्वाभिमानी आगरकरांनीं तटकन् उठून उत्तर दिलें, " आतांच्या आतां एखादा विषय द्यावा व आपण याच बैठकीस निबंध लिहून दाखवितों. " इतका स्वतःच्या लेखनाबद्दल त्यांना आत्मविश्वास वाटे ! डेक्कन कॉलेजांतहि त्यांनीं निबंध लिहून बक्षिसेंहि मिळविलीं होतीं. वामनराव आपटे यांना पुस्तकें लिहिण्याची भारी हौस होती. अशी अनुकूलता असल्यामुळें छापखाना व वर्तमानपत्रें काढण्याच्या कल्पनेला हळूहळू मूर्त स्वरूप घेऊं लागलें.

## आर्यभूषण छापखाना

एकदां वामनराव आपट्यांच्या घरीं श्राद्धानिमित्त चिपळूणकर, टिळक, आगरकर वगैरे मंडळी जमली होती. जेवणानंतर छापखान्याचा व वर्तमानपत्राचा विषय निघाला. सायंकाळपर्यंत बराच खल होऊन वर्तमानपत्रें काढण्याचें ठरलें पण हीं पत्रें छापण्यासाठीं स्वतःच्या छापखान्याची व्यवस्था आधीं करावी असा बेत त्यांनीं केला. योगायोग असा होता कीं विष्णुशास्त्री यांनीं या वर्षाचे सुरुवातीसच " किरण " छापखान्याचें सामान एका व्यापाऱ्याकडून अडीच हजारांस विकत घेतलें होतें, व ही रक्कम तावडतोब न देतां प्रत्येक वर्षीं अडीचशें रुपये देऊन दहा वर्षांनीं फेडून टाकावयाची असा करार होता. हें सामान शिवाजी छापखान्यांत घालून रा. कृष्णराव मांडे, रा. विष्णु श्रीपद देशपांडे व श्री. शाळिग्राम यांच्या भागीनें एक मोठा छापखाना चालविण्याचा विष्णुशास्त्री यांचा सुरुवातीस विचार होता. परंतु आपट्यांच्या घरचा बेत ठरल्यानंतर विष्णुशास्त्र्यांनीं आपला बेत बदलून टिळक–आगरकरादि शिक्षकांच्या सहकार्यानें नवीनच छापखाना काढण्याचें ठरविलें. कर्जाची फेड भागीच्या उत्पन्नांतून करावयाची होती. अशी सिद्धता होऊन हल्लींच्या ' आर्यभूषण ' छापखान्याची स्थापना झाली.

छापखान्यांत पहिलेंच काम शास्त्रीबुवांच्या ‘ निबंधमाले ’चें मिळालें. ‘ माले ’चा सहासष्टावा अंक हाच या छापखान्यांतील छापलेला तिचा पहिला अंक. छापखान्यासंबंधानें ‘ माले’च्या सहाव्या वर्षांतील शेवटच्या अंकांत शास्त्रीबुवा लिहितात—“ गेल्या वर्षींच्या उपसंहारांत सांगितलेला जो छापखाना तो हा होय. यांत पूर्वोक्त विद्यालयीन ( न्यू इंग्लिश स्कूलची ) मंडळीच भागीदार असून त्यांच्या परिश्रमावर हेंहि अवाढव्य काम सुरू झालें आहे. आजपर्यंत इतर सर्व व्यापारांप्रमाणें छापखान्याचा उद्योगहि अविद्वान् व अडाणी लोकच प्रायः करीत आले आहेत. यामुळें अज्ञान-ध्वंसनाविषयीं केवळ वज्रच असें जें मुद्रणयंत्र त्याचा प्रभाव व्हावा तितका अद्याप प्रकट झाला नाहीं. तो झाला असतां आज उघड माथ्यांनीं जे आपलें उन्नतत्व निर्भयपणें खुशाल मिरवीत आहेत अशा विचाऱ्या कितीक मैनाकांस समुद्राच्या तळीं जाऊन दडून बसावें लागेल.” लाथ मारूं तेथें पाणी काढूं अशी धमक शास्त्रीबुवांच्या प्रत्येक उद्गारांत व कृत्यांत दिसून येई, त्याचें प्रत्यंतर आपणांस वरील उताऱ्यांत पहावयास मिळतें.

## केसरी–मराठा

आतां वर्तमानपत्रांचा विचार सुरू झाला. बरीच भवति न भवति होऊन असें ठरलें कीं मराठी व इंग्रजी मजकुरांचें असें एकच वर्तमानपत्र न काढतां एक केवळ मराठी व दुसरें निव्वळ इंग्रजी अशीं दोन निरनिराळीं वर्तमानपत्रें काढावीत. नंतर लवकरच ‘ केसरी ’ व ‘ मराठा ’ नांवाचीं वर्तमानपत्रें १८८१ च्या जानेवारीपासून सुरू करण्याचें निश्चित झालें. वर्तमानपत्रांच्या नोटिसा चोहोंकडे वाटण्यांत आल्या. त्यांवर विष्णुशास्त्र्यांची पहिली सही होती व तीखालीं टिळक, आगरकर, आपटे वगैरे आठ-दहा गृहस्थांच्या स्वाक्षऱ्या होता.

केसरीच्या पहिल्या वर्षाच्या अंकांत विष्णुशास्त्री, टिळक व आगरकर यांचे लेख येत. विष्णुशास्त्री वाङ्मयविषयकच लेखन करीत. इतिहास, अर्थ-

शास्त्र व समाजकारण यांसंबंधीं आगरकर लिहीत. धर्मशास्त्र व कायदा हे विषय टिळकांचे आवडते होते. वर्तमानपत्री लेखन शास्त्रीबुवांना कधींच साधलें नाहीं, किंबहुना त्यांना वर्तमानपत्रांबद्दल थोडासा कंटाळाच असे. नवनीताची नवीन आवृत्ति, अनुकरण, देशोन्नति, प्रार्थनासमाज वगैरे विषयांवर त्यांनीं लेख लिहिले आहेत, पण एकंदरींत त्यांची विवेचनपद्धति निबंधमालेच्या धर्तीवरच असे.

## शास्त्रीबुवांच्या कार्याबद्दल लोकमत

अशा रीतीनें अनेक मार्गांनीं देशोन्नति साधण्याचा प्रयत्न विष्णुशास्त्री करीत होते. त्यांच्या अंगच्या गुणांची परीक्षा प्रथम प्रथम लोकांना झाली नाहीं हें खरें, पण त्याला त्यांचा भिडस्त, थोडासा अहंकारी स्वभावच कारणीभूत झाला असावा. मि. जेकब यांच्या हाताखालीं विष्णुशास्त्री कांहीं काळ पूना हायस्कूलमध्यें काम करीत होते. शास्त्रीबुवांनीं हातीं घेऊन यशस्वी केलेलीं कामें जेकबसाहेबांच्या कानांवर गेलीं तेव्हां ते उद्गारले, "विष्णुशास्त्र्यांमध्यें एवढें पाणी असेल असें मला वाटलें नाहीं." खुद्द चॅटफील्डसाहेब हे विष्णुशास्त्री यांजविषयीं पुढें कांहीं दिवसांनीं एका विद्वान गृहस्थापाशीं बोलले, "ते ( शास्त्रीबुवा ) फार हुषार आहेत, मात्र एकाच वेळीं अनेक कामें ते करीत असतात."

## कौटुंबिक निराशा

१८८२ साल उजाडलें. न्यू इंग्लिश स्कूलचा उत्कर्ष चांगलाच झाला होता. मुलांची संख्या सारखी वाढत होती. 'केसरी'ची गर्जना महाराष्ट्रभर ऐकूं येत होती. आपण योजिलेल्या कार्यांत यश मिळत गेल्यामुळें विष्णुशास्त्री नेहमीं आनंदांत असत. या आनंदांत त्यांचें घरगुती वातावरण मिठाचा खडा टाकीत असे. पण शास्त्रीबुवा घराबद्दल तितकीशी आस्था बाळगतहि नव्हते. त्यांची पत्नी नेहमीं आजारी असावयाची. भावाभावांतहि

कटकटी होत्या. विष्णुशास्त्री हीं दुःखें मुकाट्यानें सहन करीत, पण हळूहळू या सर्वांचा त्यांच्या प्रकृतीवर परिणाम होऊं लागला. शाळा हें त्यांचें खरें विश्रांतिस्थान असे. निबंधमाला त्यांनीं प्रथम सुरू केल्यास आतां आठ वर्षे होऊन गेलीं होतीं. इतक्या काळांत 'माले'चे चवऱ्यांएशीं अंक संपून त्यांचा एकंदर संग्रह केल्यास तो बाराशें-तेराशें पानांचा प्रचंड ग्रंथ होण्यासारखा झाला होता. तथापि निबंध लिहिणें म्हणजे ग्रंथकाराच्या कामगिरीची केवळ पहिली पायरी होय. तशांत निबंधमाला म्हटली तरी तें एक मासिकच होतें. त्यांतील लेखांना ग्रंथांचा दर्जा प्राप्त होणें शक्य नव्हतें. शास्त्रीबुवांच्या डोक्यांत या वेळीं एक कल्पना सारखी घोळत होती. 'निबंधमाला' बंद करून 'ग्रंथमाला' चालू करावी. हा खरोखर महदुद्योग होता व तो शास्त्रीबुवांच्या हातून पार पडता तर मराठी भाषेचें सौंदर्य वाढलें असतें यांत शंका नाहीं. आठ-दहा वर्षें सारखें लिहून लिहून उत्तम चटकदार अशी साधलेली भाषापद्धति, अनेक ग्रंथांच्या वाचनानें व प्रत्यक्ष अनुभवानें बनलेली प्रौढ विचारसरणी व लेखक या नात्यानें प्राप्त झालेली विलोभनीय-ख्याति या सर्वांमुळें ग्रंथमाला लोकप्रिय झाली असती व लोकशिक्षणांत तिच्यामुळें फार भर पडली असती हें निश्चित पण— ! मानवाचे सर्वच बेत थोडेच सिद्धीला जातात !

## मृत्यूची छाया

घरांत आपल्या कुटुंबियांचा एक फोटो टांगलेला होता, त्याकडे शास्त्रीबुवांचें सहज लक्ष गेलें. फोटो काढून बरेच दिवस झाले होते. तो पुन्हां काढावा असें त्यांच्या मनानें घेतलें, व त्याबद्दल तजवीज करण्यास त्यांनीं सांगितलें. पुरुषमंडळींचा स्वतंत्र व बायकांचा स्वतंत्र असे दोन फोटो काढण्याचें ठरलें. त्याप्रमाणें एका फिरंगी चित्रकारास घरीं बोलावून आणिलें व बायकांचा फोटो ता. १५ जानेवारीस काढण्यांत आला. दुसऱ्या

दिवशीं सर्व पुरुषमंडळी फोटो काढण्यासाठीं गाडींत बसून लष्करांत चित्र-काराच्या घरीं गेली. फोटोच्या दोन प्रती घेण्यांत आल्या. इतक्यांत कुणी तरी सूचना केली कीं, विष्णुशास्त्र्यांचा एकट्याचाच एक फोटो काढावा. विष्णुशास्त्री फोटोसाठीं उन्हांत उभे राहिले. इतक्यांत त्यांना घेरी आली व ते एकदम भुईवर कोसळले. सर्वांच्या तोंडचें पाणी पळालें. पाणी वगैरे डोकीवर घातलें व कांहीं वेळानें ते सावध झाले. परंतु त्यांच्या तोंडास दुखापत होऊन पुढील दोन दांत दुखवले होते, उजव्या कानांतून रक्त-स्रावहि होत होता. तशाच परिस्थितींत मंडळींनीं त्यांना घरीं आणलें. दोन दिवस गेले व त्यांना बारीक ताप येऊं लागला. हातापायांची आग होई. ह्यापावेतों घरगुतीच औषधोपचार सुरू होते. महिना पंधरादिवसांनीं तोंडाची दुखापत बरी झाली; परंतु बारीक ताप चालूच राहिला. अशक्त-पणाहि वाढत होता. ते शाळेंत कामावर जात नसत पण निबंधमाला व केसरी यासाठीं होणारें लेखन चालूच होतें. वरून पाहणारांस शास्त्रीबुवा म्हणजे आजारी आहेत असें मुळींच वाटत नसे, पण आंतून मात्र कांहीं तरी अस्वस्थता होती व ती शास्त्रीबुवांना जाणवत असे हें निश्चित. यांत भर पडली कोल्हापूर-प्रकरणाची.

## कोल्हापूर-प्रकरण

केसरीची संपादक मंडळी तरुण, ताज्या दमाची, आणि सळसळणाऱ्या रक्ताची व ध्येयवादी होती. आपल्या लेखणीच्या प्रभावानें जगाचें नंदनवन करायचा त्यांचा बेत ! केसरीच्या गर्जनेनें अन्यायरूप श्वापदांची दाणादाण उडवूं अशा प्रकारच्या स्वप्नरंजनांत रममाण होत असतां आपण लिहितों तें कायद्याला धरून आहे कीं नाहीं याबद्दल विचार करायला ते थांबत नसत. ह्याचा अनिष्ट परिणाम कोल्हापूर-प्रकरणीं त्यांना चांगलाच भोंवला !

पहिल्या वर्षीं केसरींत व मराठ्यांत राजकीय स्वरूपाचे पुष्कळ लेख आले. त्यांतील पुष्कळ संस्थानांसंबंधीं होते. ब्रिटिश सरकारवरहि टीका

आली, पण खालसा मुलखांतील अन्यायापेक्षां संस्थानांत अन्याय अधिक चीड आणणारा असे. त्यांत कोल्हापूरबद्दल महाराष्ट्रांत अधिक आपुलकी. शिवाजीमहाराजांचे वंशज या नात्यानें महाराष्ट्र कोल्हापूरकरांकडे आदरानें पाही. त्या वेळीं कोल्हापूरच्या गादीवर शिवाजीमहाराज होते. ते वेडे झाल्याची वार्ता सर्वत्र पसरली. त्यामुळें लोकांना वाईट तर वाटलें पण अधिक दुर्दैवाची गोष्ट ही कीं, कोल्हापूरकरमहाराजांना वेड लागण्याला त्यांच्या पदरचे दिवाण हेच कारणीभूत आहेत अशी लोकांना जबरदस्त शंका आली. त्यामुळें दिवाण रावबहादूर माधवराव बर्वे यांच्याबद्दल लोकांत विलक्षण त्वेष उत्पन्न झाला. कोल्हापूरच्या बातमीपत्रें अनेक वर्तमानपत्रांत छापून आलीं. ता. ११ ऑक्टोबर १८८१ च्या केसरींत लिहिलें आहे कीं, " कोल्हापूर छत्रपतिमहाराजांची सध्यांची अशी स्थिति आहे कीं, ती ऐकून पाषाणहृदयाच्या देखील काळजाला घरे पडतील. महाराजांचे प्राण जाऊन शव हातीं आल्यावर आमचे लॉर्डसाहेब जागृत होणार काय? कोणत्याहि कारणानें छत्रपतींच्या जिवास अपाय झाला तर त्याचा कलंक बादशाही राणीच्या आणि तिच्या प्रतिनिधींच्या कपाळीं आल्याखेरीज राहाणार नाहीं. "

केसरीची टीका तर कडक होतीच, पण याहूनहि अधिक कडक टीका लोक खासगी संभाषणांत करीत होते. इंग्रज सरकारची बाजू घेणारीं 'टाइम्स' सारखीं पत्रें याविरुद्ध लेख लिहीत. हापावेतों गुन्हेगारीचीं पत्रें किंवा इतर कागदपत्र केसरींत प्रसिद्ध झाले नव्हते. पण बर्वे यांची व्हावयाची तेवढी बेअब्रू झालीच होती. पुढें केसरीनें कांहीं पत्रें छापलीं. बर्व्यांनीं फिर्याद ठोकली. टिळक-आगरकर जबाबदार संपादक म्हणून काम करीत होते. विष्णुशास्त्री फक्त केसरीकरितां लेख लिहीत. आरोपींत त्यांचा अन्तर्भाव झाला नाहीं. ५ मार्च १८८२ रोजीं आपल्या बंधूला पाठविलेल्या

पत्रांत ते लिहितात, "कोल्हापूर-प्रकरण आतां सर्वांना ठाऊक झालेंच आहे. माझा व्यक्तिशः यांत फारच थोडा संबंध आहे. टिळक आणि आगरकर या दोघांनींच यांत अधिक लक्ष घातलें असून त्यांतून हें प्रकरण उद्भवलें आहे. त्यांत पुष्कळ अंशीं यश येईल असें वाटतें. पाहूं काय होतें तें. प्रकृति थोडीशी नरमगरमच आहे." इत्यादि

## आजारपण

या पत्रांत शास्त्रीबुवांनीं आपल्या आजारपणाचा थोडासा उल्लेख केला आहे. परंतु लवकरच हें दुखणें कोणत्या भयंकर थरावर जावयाचें होतें याची इतरांना किंवा खुद्द शास्त्रीबुवांना कल्पनाहि नव्हती. गेले दोन महिने ते शाळेंत गेले नव्हते. शाळेंतील कांहीं शिक्षक याबद्दल त्यांच्यावर टीकाहि करीत, ती टळावी व आतां थोडें बरेंहि वाटलें होतें म्हणून ते ९ मार्च रोजीं शाळेंत गेले. परंतु एक-दोन तास गेल्यावर त्यांना विलक्षण थकवा आला. ते घरीं आले, थोडेसे अधिक अस्वस्थ झाले. त्यांची आई तीर्थ-यात्रेला गेली होती ती परत आली. तिलाहि विष्णुशास्त्र्यांच्या आजाराची कल्पना आली नाहीं. अद्यापपावेतों घरगुतीच औषधोपचार चालू होते. शास्त्रीबुवांचे जे अनेक तऱ्हेवाईक ग्रह होते त्यांपैकींच डॉक्टरी औषधोप-चारांबद्दलचा एक विलक्षण ग्रह त्यांच्या ठिकाणीं होता. अनेक मित्रांनीं त्यांना डॉक्टरी इलाज करण्याबद्दल सुचविलें पण विष्णुशास्त्र्यांनीं तें ऐकलें नाहीं. शेवटीं देशी औषधोपचारासाठीं रा. गणेशबोवा साकुर्डीकर वैद्य यांना घरीं बोलावून आणलें. वैद्यांनीं तपासणी केली व औषधोपचार सुरू झाले. त्यांतहि शास्त्रीबुवांचें स्वतःचें असें मत होतेंच! आपणांस मलावरोध झाला आहे तो प्रथम गेला पाहिजे असा त्यांचा आग्रह. वैद्यांनीं त्यासाठीं एक काढा तयार करून दिला. परंतु तो कांहीं लागू पडला नाहीं. उलट अंगाची आग अधिक वाढून रात्रीं त्यांस बिलकुल झोंप आली नाहीं.

पहांटेस जरा थोडासा डोळा लागला. परंतु एकंदर अस्वस्थता वाढलीच होती. इतक्यांत त्यांना अशी कुबुद्धि झाली कीं, कांहीं शीतोपचार करावे. त्यासाठीं कलिंगड, द्राक्षें किंवा अंजीर घेऊन येण्याबद्दल त्यांनीं घरांतील मंडळींस सांगितलें. घरांत अनुभवी व पोक्त मंडळी कुणी नव्हती, किंवा असती तरी शास्त्रीबुवांनीं आपला हट्ट सोडला असता असें नाहीं. पण अशा या आजारात त्यांनीं कलिंगडाची लहानशी फोड खाल्ली हें खरें! दिवस कसा तरी गेला, संध्याकाळीं ७ वाजले आणि अंगांत ताप भरत चालला, तो सारखा वाढत होता. ८ वाजतां त्यांस जेवणाकरितां भात वगैरे आणला असतां चुलतबंधु विनायकराव जवळ होते, ते त्यांस कोचावर बसल्या बसल्याच भरवूं लागले. इतक्यांत आई खोलींत येत आहे असें विष्णुशास्त्र्यांना समजलें, एवढ्या तापांत ते लगेच कोचावरून खालीं आले व घाईघाईनें पाट मांडून त्यावर बसून जेवूं लागले. कोचावर बसून आपण जेवत आहोंत हें आईनें पाहिलें तर ती बोलेल असा धाक त्यांना वाटला! थोडासा भात खाऊन परत ते कोचावर पडले, परंतु थोड्याच वेळांत ताप वाढून त्यांचा शब्द अडखळूं लागला. वाताची लहर आल्याचें लोकांच्या ध्यानांत आलें. त्या वेळचे पुण्यांतील प्रसिद्ध डॉक्टर विश्राम यांस बोलाविण्यांत आलें. त्या वेळीं १० चा सुमार होता. विष्णुशास्त्र्यांना भ्रम झाला होता. ते मोठमोठ्यानें ओरडत. ‘काका, काका धांवा, मला कुशींत घ्या, मरतों हो मी! मला घोटभर पाणी द्या हो! पाणी! पाणी! आश्चर्य हें कीं हें सर्व बोलणें इंग्रजींत होतें. कृष्णशास्त्रीहि मरतांना इंग्रजींत बोलले होते. केवढा हा इंग्रजीचा प्रभाव होता त्या वेळीं! डॉ. विश्रामांनीं ताप पाहिला, १०७ अंशांवर होता! ते औषध लिहून देत होते इतक्यांत विष्णुशास्त्र्यांना वायूची लहर आली ते डॉक्टरांना उद्देशून इंग्रजींत ओरडले, ‘मला विष घालूं नका! मी तुमचें औषध बिलकुल घेणार नाहीं. हें पहा तुम्हांला जाब द्यावा लागेल, हें सगळें कोल्हापूर-प्रकरण’ इत्यादि.

## मृत्यु

डॉक्टरांनीं आपला आग्रह सोडला. सीतारामपंत म्हणाले, " विष्णु शुद्धीवर नाहीं. तुम्ही सांगाल तर मी त्याला बळेंच औषध पाजतों. " परंतु डॉक्टरांचें म्हणणें पडलें कीं ' तसें करून उपयोग नाहीं, विष्णुशास्त्री जर वैद्याचेंच औषध घेणार असतील, तर उद्यां सकाळीं वैद्याच्या हातूनच आपण त्यांना औषध देववूं. ' इतकें झाल्यावर डॉक्टर निघून गेले. घरच्या मंडळींत चिंतेचें वातावरण पसरलें. कांहीं मित्रांनीं साकुर्डीकर वैद्यांना बोलावून आणिलें. त्यांनीं काढा करून तो विष्णुशास्त्र्यांना पाजला व ते निघून गेले. मध्यरात्र उलटून गेली. स्नेही मंडळी व घरची मंडळी अगदीं दमून गेली होती, कांहीं जागत कांहीं निजत असें चाललें होतें. सकाळीं ५ वाजण्याच्या सुमारास विष्णुशास्त्र्यांस शेवटचा घोर लागला. त्यांचा अंतकाळ समीप आला हें पाहून सर्वजण घाबरून गेले. कांहीं डॉक्टरकडे गेले, कांहीं वैद्याकडे धांवले पण ते परत येण्यापूर्वींच विष्णुशास्त्र्यांची प्राण-ज्योत विझली होती. ही वेळ साडेपांचची होती व दिवस गुरुवार, ता. १७ मार्च १८८२ हा होता.

## अन्त्यसंस्कार

नित्याप्रमाणें चित्रशाळेंतील लोक कामावर येऊं लागले तों चित्रशाळेचा आधार तुटला हें ऐकून प्रत्येकास धक्काच बसला. सर्वांना परमदुःख झालें. गांवांत तर बातमी केव्हांच पसरली. त्यांच्या आजाराची लोकांना फारशी माहिती न झाल्यामुळें मृत्यूचीच तेवढी खबर कळली व लोक आश्चर्यानें आपापसांत चौकशी करूं लागले. शाळांतील विद्यार्थी, गांवांतील प्रतिष्ठित व सामान्य लोक टोळ्याटोळ्यांनीं डोलकर आळीकडे येऊं लागले. घरांत चारी बाजूंस आक्रोश व रडणें ऐकूं येत होतें. सर्व रस्ता लोकांच्या गर्दीनें भरून गेला. ' कृष्णशास्त्र्यांचें घर बुडालें ', ' मराठीचा पुरस्कर्ता गेला ',

थोड्या वयांत केवढा खटाटोप, केवढा प्रचंड उद्योग केला, आज सर्व संपलें, ' बिचाऱ्या म्हातारीनें काय करावें ' एक का दोन अनेक प्रकारें शोकाचे उद्गार लोकांच्या तोंडून बाहेर पडत होते. इतक्यांत एक कंडी निघाली कीं, कोल्हापूर-प्रकरणाची धास्ती घेऊन विष्णुशास्त्र्यांनीं विष पिऊन आत्महत्या केली. ही बातमी पोलिसांच्या कानांवर जातांच त्यांनीं प्रेत ताब्यांत घेण्याचा व वैद्यकीय तपासणी केल्याशिवाय पुढील व्यवस्था न करण्याचा धाक घातला. परंतु प्रोफेसर केरोपंत नाना, बाबा गोखले वगैरे वजनदार मंडळी पुढें आली, त्यांनीं डॉ. विश्राम यांचा दाखला आणला व पोलिसांची संशयनिवृत्ति झाली. इतकें होईतों अकराचा सुमार झाला. प्रेतयात्रा निघाली व नदीवर येऊन पोंचली. स्मशानाचें विस्तीर्ण आवार लोकांनीं फुलून गेलें होतें. चिता रचून गुणवर्णनपर भाषणांस सुरुवात झाली. प्रोफेसर केरोपंतांनीं भाषणें लांबवूं नका, उगाच पोलिसांची कटकट उपस्थित होईल असा पोक्त सल्ला दिला. तेव्हां एकच भाषण होऊन चितेला अग्नि लावण्यांत आला. थोड्याच वेळांत भडकत्या ज्वाळांनीं या थोर गृहस्थाचा पार्थिव देह आत्मसात् केला व लोक दुःखाच्या ज्वाळांनीं भगभगणारीं मनें घेऊन परत फिरले.

## दुःख–प्रदर्शन

विष्णुशास्त्र्यांच्या मृत्यूची बातमी वर्तमानपत्रांतून अखिल महाराष्ट्रांत पसरली. सर्वच वर्तमानपत्रांतुन त्यांच्या गुणगौरवाचे लेख आले होते. मराठी भाषेविषयींची त्यांची भक्ति, त्यांनीं रसाळ भाषासरणींत लिहिलेले निबंध, त्यांचा ज्वलन्त देशाभिमान, त्यांनीं उत्पन्न केलेले विविध उद्योग व त्यांचें अकालीं व अकल्पित निधन हे विषय सर्वांच्या तोंडीं कांहीं दिवस होते. परदेशांतील पत्रांतहि त्यांच्यासंबंधीं लेख आले होते. त्यांपैकीं एका लेखांत शेवटीं

पुढील वाक्यें आहेत : " आपल्या उद्योगाचें फल पहावयास ते जगले नाहींत असें असलें तरी, देशाच्या प्रगतीसाठीं पहिले प्रयत्न करणारांपैकीं ते एक असल्यामुळें, त्यांनीं सुरू केलेल्या कार्याचा पुरस्कार अनेकांनीं केल्यास आज ना उद्यां हिंदुस्थानला स्वराज्य मिळाल्याविना राहाणार नाहीं. " हें भविष्य आज खरें झालें आहे हें आपण पहात आहोंतच !

## शास्त्रीबुवांच्या संस्था

निबंधमाला, केसरी–मराठा, न्यू इंग्लिश स्कूल, काव्येतिहाससंग्रह, चित्रशाळा आणि किताबखाना या सर्व संस्थांचें जनकत्व विष्णुशास्त्र्यांकडे आहे हें आपण पाहिलें. पैकीं निबंधमाला, न्यू इंग्लिश स्कूल आणि केसरी-मराठा या संबंधींची माहिती यथास्थळीं वर आलीच आहे. कोल्हापूर-प्रकरणांत टिळक–आगरकरांना चार महिन्यांची शिक्षा झाली व ते दोघे डोंगरीच्या कारागृहांत गेले; पण ही शास्त्रीबुवांच्या मृत्यूनंतरची गोष्ट आहे. वरील तीन संस्थांखेरीज इतर संस्थांची आतां आपण माहिती करून घेऊं.

१८७७ साल हें शास्त्रीबुवांच्या जीवनांतील अत्यंत महत्त्वाचें ठरलें. त्यांची एकाएकीं बदली झाली ती याच वर्षी. त्याअगोदर थोडेच दिवस त्यांनीं काव्येतिहाससंग्रह नांवाचें मासिक व चित्रशाळा यांची योजना तयार केली होती. श्री. काशीनाथ नारायण साने व जनार्दन बाळाजी मोडक हे दोघे तत्कालीन विद्वान् इतिहासज्ञ म्हणून प्रसिद्ध होते. त्यांनीं पुष्कळशा बखरी जमविल्या होत्या. शास्त्रीबुवांचे दुसरे एक स्नेही व चहाते श्री. शंकर तुकाराम शाळिग्राम यांना पोवाडे, लावण्या इत्यादि शाहिरी काव्याचें फार वेड होतें, त्यांनींहि बराच संग्रह केला होता. योगायोगानें साने–मोडक यांची व शास्त्रीबुवांची गांठ पडली; त्यांनीं आपली बखरी छापण्याची कल्पना शास्त्रीबुवांजवळ बोलून दाखविली. त्यांना ती एकदम पसंत पडली. पुढें शाळिग्रामांना बरोबर घेऊन या तिघांनीं 'काव्येतिहाससंग्रह' या नांवाचें

म. ग्रं.
ग्रा. क्र.
दि.

मासिक काढण्याचें ठरविलें. संस्कृतग्रंथाबद्दल शास्त्रीबुवांनीं लिहावें, सान्यांनीं बखरीसंबंधीं लिहावें आणि मराठी काव्याची व्यवस्था मोडकांनीं करावी अशी कामाची विभागणी होऊन १८७८ च्या जानेवारीपासून मासिक सुरू करण्याचें मुक्रर झालें.

प्रथम प्रथम हा संपादक-वर्ग एकोप्यानें वागला पण पुढें तो एकोपा टिकला नाहीं. त्यांतल्यात्यांत श्री. साने यांचें शास्त्रीबुवांशीं बरेंच वितुष्ट आलें. दोघेहि विद्वान् पण दुराग्रही, बुद्धिमान् पण तापट; प्रत्येकाला वाटे आपल्या लेखनानें मासिक लोकप्रिय झालें. अखेरीस हें वैमनस्य इतक्या थराला गेलें कीं दोघांनींहि एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढण्यास सुरुवात केली. या दोघांमध्यें झालेला पत्रव्यवहार उभयतांच्या इष्टमित्रांस अप्रशस्त वाटण्याजोगा आहे यांत शंका नाहीं. त्यांत शास्त्रीबुवांच्या शारीरिक अस्वास्थ्याची भर पडली व त्यांनीं १८८१ सालअखेर या मासिकाशीं असलेला संबंध तोडला. थोड्याच अवधींत हें मासिकहि बंद झालें. विद्वान् गृहस्थ सहकार्यानें एखादें कार्य सिद्ध करूं शकत नाहींत हें सिद्ध झालें.

विष्णुशास्त्र्यांच्या घरीं नेहमीं येणाऱ्या व्यक्तींत शंकर तुकाराम शाळिग्राम ही एक प्रमुख व्यक्ति होती. या दोघांच्या परिचयाचें पुढें स्नेहांत रूपांतर झालें व तो विष्णुशास्त्र्यांच्या हयातीपर्यंत टिकला. शास्त्रीबुवांना मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें म्हणजे बखरी-पोवाडे-लावण्या इत्यादिकांविषयीं फार भक्ति वाटे. शाळिग्रामांनीं मोठ्या तत्परतेनें व खटपटीनें यांतील बरीचशीं साधनें जमविलेलीं होतीं. १८७८ च्या ऑगस्ट महिन्यांत शाळिग्रामांनीं विष्णुशास्त्र्यांस सांगितलें कीं शनिवार पेठेंत आपले एक स्नेही आहेत, त्यांस चित्रें काढण्याचा नाद असून त्यांनीं बऱ्याच तसबिरी, चित्रें, नकाशे वगैरे काढिले आहेत. पुढें विष्णुशास्त्री आपल्या बंधूंबरोबर त्या गृहस्थांच्या घरीं गेले. हे गृहस्थ म्हणजे चित्रशाळा छापखान्याचे उत्पादक रा. बाळकृष्ण वासुदेव जोशी हे होत. हे गृहस्थ त्या वेळीं फोटो झिंको ऑफिसांत ड्राफ्ट्-

मनचे जाग्यावर होते. ते स्वभावाने हौशी व ठाकठिकीनें राहणारे होते. खर्चाचा विचार न करतां आपल्या घरीं उत्कृष्ट फ्रेममध्यें बसवून त्यांनीं अनेक चित्रें लावलेलीं होतीं. ही चित्रमालिका पाहून विष्णुशास्त्र्यांस फार आनंद झाला.

बाळकृष्णपंतांस इंग्रजीची ओळख नव्हती, मराठी अभ्यासहि त्रेताचाच होता. त्यामुळें ऐतिहासिक तसविरींकडे त्यांचें लक्ष गेलें नव्हतें. विष्णुशास्त्र्यांनीं त्यांचें लक्ष प्रथम या विषयाकडे वेधलें व सवाई माधवराव व नाना फडणीस यांचीं मोठालीं चित्रें बाळकृष्णपंतांकडून काढविण्यांत आलीं. पण ह्या चित्रांचा व्हावा तसा खप झाला नाहीं. विष्णुशास्त्र्यांनीं आर्थिक साहाय्य देण्याचें कबूल केल्यानें बाळकृष्णपंत निराश न होतां शिळाप्रेसच्या तयारीला लागले व यांतून सांप्रतची 'चित्रशाळा' उत्पन्न झाली.

पुढें विद्यमान व्यक्तींचीं चित्रें काढण्याचें ठरलें. केरुनाना छत्रे, डॉ. विश्राम घोले, कृष्णशास्त्री यांचीं चित्रें विक्रीस निघालीं. पण यांचाहि खप त्रेताचाच झाला. याच सुमारास श्रीमंत औंधकरांनीं सूचना केली कीं 'रामपंचायतना'चें चित्र काढा. या रामपंचायतनानेंच चित्रशाळेला ऊर्जितावस्था प्राप्त करून दिली. या चित्रावर लोकांच्या उड्यावर उड्या पडत. त्या वेळची एक गोष्ट श्री. वासुकाका जोशी सांगत ती अशी कीं, तत्कालीन प्रसिद्ध नाटक मंडळी म्हणजे सांगलीकर ही होय. ही नाटक मंडळी गांवोगांव हिंडे. त्यांचा मुक्काम तंजावरला होता. कंपनीनें बरोबर कांहीं रामपंचायतनाचीं चित्रेंहि नेलीं होतीं. तंजावरला या चित्रावर लोक इतके खुष झाले कीं प्रत्येक प्रत अडीच रुपयाला एक याप्रमाणें सर्व चित्रें खपलीं. शास्त्रीबुवांनीं दिलेल्या भांडवलावर बाळकृष्णपंतांनीं चित्रशाळा चालविली होती.

किताबखान्याचाहि इतिहास मोठा मनोरंजक आहे. १८७९ च्या मे महिन्यांत बुधवारांतील सरकारी वाड्याला आग लागली. त्या आगींत

वाड्यांतील सरकारी पुस्तकाचें दुकान जळून गेलें. शास्त्रीबुवांच्या मनानें घेतलें कीं आपण दुकान सुरू करावें. कृष्णशास्त्री यांचीं पुस्तकें, शाळिग्राम यांचीं लावण्या–पोवाड्यांचीं पुस्तकें व स्वतःचीं पुस्तकें या दुकानांत प्रथम ठेवावीं असें त्यांनीं ठरविलें. चित्रशाळेंतील चित्रेंहि विक्रीसाठीं या दुकानांत मांडण्यांत आलीं. इतक्यांत न्यू इंग्लिश स्कूल काढण्याचें ठरलें. त्यामुळें मुलांना लागणारी मराठी–इंग्रजी पुस्तकें विकत मिळण्याची सोय याच दुकानांत करण्यांत आली. अशा तऱ्हेनें 'किताबखाना' सुरू झाला व शाळिग्राम त्याची व्यवस्था पाहूं लागले. हळूहळू दुकान चांगलें चालूं लागलें पण शाळिग्राम हे स्वभावानें पराकाष्ठेचे आळशी व अव्यवस्थित; कामाचा उरक नसे व हिशोबाला ठिकाणा नसे, यामुळें नाइलाजानें विष्णुशास्त्र्यांनीं शाळिग्रामांना या व्यवहारांतून मुक्त केलें व दुकानाची व्यवस्था श्री. वासुकाका जोश्यांच्या हवालीं केली. पुढें किताबखान्याची मालकी न्यू इंग्लिश स्कूलमधील एक शिक्षक श्री. हरिपंत दामले यांजकडे आली.

## कौटुंबिक परिस्थिति

विष्णुशास्त्र्यांवर लहानपणापासूनच आईबापांपेक्षां आजोबा हरिपंत व आजीबाई भागीरथी यांचा लळा अधिक होता. हे वृद्ध दंपत्य फार सालस, अब्रूदार व धर्मनिष्ठ असे. हरिपंतमामा घरची सर्व व्यवस्था कसोशीनें ठेवीत. देवपूजा, सप्तशतीचा पाठ एकादष्णी, पुराणश्रवण, यांकडे त्यांचें जितकें लक्ष असे तितकेंच बाजारहाट, हिशेबठिशेब इत्यादि सांसारिक बाबींकडेहि असे. स्वभावानें ते मोठे तापट होते. मात्र कृष्णशास्त्र्यांवर त्यांची पराकाष्ठेची भक्ति होती. कृष्णशास्त्र्यांचा बराच वेळ घराबाहेर जाई. पण त्यांची बडदास्त ठेवण्यास वडील नेहमीं तत्पर असत. हरिमामांना स्वतःला विड्याचें व्यसन नव्हतें पण चिरंजिवांसाठीं विड्याचीं पानें आणून तीं साफ पुसून ठेवणें, त्याच्या धोतराच्या निऱ्या करून ठेवणें येथपर्यंत हे म्हातारे पुत्रसेवा करण्यांत दक्ष असत. तसें पाहतां बापलेकांचें भाषण कधींहि होत

नसे. पण वडिलांच्या लोभामुळें कृष्णशास्त्र्यांच्या वांट्याला संसारांतील कटु भाग सहसा आलाच नाहीं.

भागीरथी आजीहि हुषार पण अबोलकी होती. हीचीहि आपल्या पुत्रावर निस्सीम माया होती. विष्णुशास्त्री सांगत, "शास्त्रीबोवांस (कृष्णशास्त्री) बाहेरचा नाद फार लागल्यामुळें मामा व माई यांस फार दुःख होई. एकदां बरीच रात्र झाली तरी शास्त्रीबोवा घरीं आले नाहींत हें पाहून मामा मनांत फार तळमळून म्हणाले कीं, 'मी याला एकदां बोलूं का?' परंतु माई ही अधिक शहाणी! तिनें उत्तर केलें, 'तुम्ही बोलूं नका, बोलण्यानें तो आपला कांहीं नाद सोडणार नाहीं. तुमचा थोडाबहुत जो वचक आहे तो मात्र नाहींसा होईल!"

हरिपंतमामा व भागीरथीबाई यांच्या सहवासांत विष्णुशास्त्र्यांचे लहानपणचे दिवस मोठ्या सुखांत गेले. त्या दोघांबद्दल त्यांच्या मनांत नितान्त आदर होता. विष्णुशास्त्र्यांबरोबर लहानपणीं घरांत असणारीं मुलें म्हणजे त्यांचे चुलते सीतारामपंत व धाकटे बंधु लक्ष्मणराव. या दोघांशिवाय विनायकराव व माधवराव हे दोघे विष्णुशास्त्र्यांचे चुलतबंधु व विष्णुशास्त्र्यांचे मामा काशीनाथपंत जोशी यांचेंहि चिपळूणकरांच्या घरीं जाणें-येणें, खाणें-बसणें फार होतें. या सर्व मुलांत सीतारामपंतांचा स्वभाव प्रथमपासूनच जरा विशेष प्रकारचा होता. त्यांचा हट्ट तर पराकाष्ठेचा होता, पण रिकाम्या डौलाचीहि हौस त्यांना भारी होती. त्यामुळें इतर मुलांचें व त्यांचें जमत नसे. नेहमीं तंटे—मारामारी व्हावयाच्या. इतकें मात्र खरें कीं सर्व मुलांत बुद्धीनें सीतारामपंत वरचढ होते. अंगांत विलक्षण धिटाई होती व परक्याच्या मनावर चटकन् छाप पडेल असें त्यांचें बोलणें-चालणें असावयाचें. लक्ष्मणराव आपले चारचौघांसारखे होते. स्वभावभिन्नतेमुळें विष्णुशास्त्री व सीतारामपंत यांचें जन्मांत कधीं पटलें नाहीं. इतकेंच नव्हे तर घरांत अनेक कटकटी निर्माण झाल्या.

हरिपंतमामा १८६५ सालीं वारले व घरांत जो थोडासा वडिलांचा वचक होता तो नाहींसा झाला. आजोबांच्या मृत्यूनें विष्णुशास्त्र्यांस फार वाईट वाटलें. सीतारामपंतांच्या स्वभावांत विशेष बदल झाला नाहीं. शाळेंत मात्र हुषार विद्यार्थी म्हणून त्यांची प्रसिद्धि होऊं लागली. घरांत विष्णुशास्त्री, लक्ष्मणराव व विनायकराव यांची एकजूट असे. सीतारामपंतांचे सर्व स्नेही बाहेरचे असत. यामुळें ते घरांत ज्या हेकेखोरपणें वागत तितक्याच हेकेखोरपणानें विष्णुशास्त्री त्यांच्याशीं वागत.

हरिपंतमामांच्या मृत्यूनंतर विष्णुशास्त्र्यांचें लग्न झालें. आपल्या नातवाचा विवाह आपल्या दृष्टीस पडावा अशी म्हाताऱ्याची फार इच्छा होती पण ती सफल झाली नाहीं. विष्णुशास्त्र्यांच्या पत्नी काशीबाई या नारायण भिकाजी गोगटे यांच्या कन्या होत. रूपानें व स्वभावानें शास्त्रीबुवांस शोभण्यासारख्याच त्या बाई होत्या.

सीतारामपंतांनीं डेक्कन कॉलेजांतून बी. ए. ची पदवी घेतली व बाबा गोखले यांच्या शाळेंत त्यांनीं शिक्षकाचें काम पत्करलें. ते स्वभावतः मोठे धीट होते व त्यांची बोलण्याची शैली चांगली असल्यामुळें विद्यार्थ्यांत ते भारी प्रिय झाले. अधिकारी-वर्गावरहि त्यांची बरीच छाप बसली. लक्ष्मणरावहि आपली बी. ए. ची परीक्षा आटोपून उद्योगाच्या शोधास लागले.

सीतारामपंतांचें घरांत कुणाशीं पटलें नाहीं. आतांशा तर त्यांनीं कृष्णशास्त्र्यांच्या पत्नीविरुद्ध गवगवा करण्यास आरंभ केला होता. विष्णुशास्त्री या घरच्या कटकटींत कधीं लक्ष घालीत नसत. एक तर वडीलपणाचा अधिकार अद्याप त्यांच्याकडे नव्हता व सीतारामपंतांचा स्वभाव ते पूर्ण ओळखून होते. पुढें कृष्णशास्त्री वारले आणि घरांतील बेबनाव पराकाष्ठेला पोंचला. सीतारामपंतांनीं विभक्तपणाची मागणी केली. कृष्णशास्त्र्यांनीं आपल्या मुलाप्रमाणें त्यांचें लालनपालन केलें होतें, विद्याभ्यास करविला होता, परंतु आपल्या हेकट स्वभावानें त्यांनीं गोष्टी या थराला आणल्या.

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

विष्णुशास्त्र्यांशीं त्यांचें कधींच पटलें नाहीं, ते सारखे लक्ष्मणरावांना या बाबतींत छळूं लागले. व अशा तऱ्हेनें एका मोठ्या कुटुंबाचे तुकडे होण्याची वेळ आली.

विष्णुशास्त्र्यांना या गोष्टीनें परम दुःख झालें. याच सुमारास त्यांची दुर्गा नांवाची बहीण होती तिचा नवरा अल्पवयांतच वारला. विष्णुशास्त्र्यांना हा जोराचा आघात सहन करावा लागला. मुलांच्या बाबतींतहि त्यांना सुख नव्हतें. एक-दोन मुलें होऊन तीं लहानपणींच वारलीं होतीं. घरची परिस्थिति अशी उत्साहवर्धक नसतांहि शास्त्रीबुवा हातीं घेतलेल्या अनेकविध कार्यांत मन गुंतवीत व त्यामुळें त्यांना बरीच हुषारीहि वाटे. सीतारामपंतांचें विभक्तप्रकरण त्यांच्या मृत्यूपर्यंत चालूच होतें. आजोबांच्या आणि वडिलांच्या मृत्यूनंतर विष्णुशास्त्र्यांचें कौटुंबिक जीवन सुखाचें तर नव्हतेंच, उलट नसत्या कटकटी व दगदगी यांनीं ते कंटाळून गेले; पण त्यांचा स्वभावच अन्तर्वर्ती असल्याकारणानें आपल्या दुःखी जीवनाचा आविष्कार त्यांनीं आपल्या बाहेरच्या कार्यांत कधींहि केला नाहीं.

## शास्त्रीबुवांचें ध्येय व तत्त्वज्ञान

महाराष्ट्राची प्रकृति बुद्धिप्रधान आहे. एखादें कार्य करतांना महाराष्ट्र वाटेल ते हालअपेष्टा सोसण्याची तयारी दाखवितो पण कार्य संपतांच आपसांतील चुरस डोकें वर काढते आणि यादवीला आरंभ होतो. असें असलें तरी महाराष्ट्रानें आतांपर्यंत अनेक उपयुक्त संस्था यशस्वी रीतीनें चालवून दाखविल्या आहेत. महाराष्ट्राच्या या संस्थागत जीवनाच्या मूलस्थानीं न्यायमूर्ति रानडे आहेत हें खरें, पण या संस्थागत जीवनाच्या यशाचें बरेंचसें श्रेय विष्णुशास्त्र्यांनाहि द्यावयास हवें. त्यांनीं ज्या ज्या संस्था निर्माण केल्या, त्या त्या उपयुक्त ठरल्या ऐवढेंच नव्हे, तर महाराष्ट्राच्या इतिहासांत त्यांनीं मानाचें स्थान पटकाविलें आहे. श्री. त्र्यं. र. देवगिरीकर हे शास्त्रीबुवांना

'पीयूषपाणि' म्हणतात तें एका अर्थीं खरेंच आहे. शास्त्रीबुवांच्या अमृतमय हातांनीं ज्या संस्थेचें बीज पेरलें, ती संस्था उत्कर्षाला पावलीच म्हणायची.

पण विष्णुशास्त्री आज जे लोकमान्य झाले आहेत ते त्यांच्या वाङ्मयीन कार्यामुळें आणि तद्द्वारा महाराष्ट्राला लाभलेल्या नव्या दृष्टीमुळें. सारें बत्तीस-वर्षांचें जीवन पण या अल्पकालांत मराठी साहित्याचें सारें रूप शास्त्रीबुवांनीं पालटून टाकलें व जे लोक आपल्या मायबोलीला तुच्छ लेखत, तेच तिच्या मनोहर सौंदर्यानें, ओजस्वी थाटानें क्षणभर दिपून गेले. ज्या ज्या विषयांवर शास्त्रीबुवांची दिव्य लेखणी फिरली, ते ते विषय मराठी वाङ्मयांत आज अमर झालेले आपण पहात आहोंत.

निबंधमाला आठ वर्षें चालली. सुमारें बाराशें पृष्ठें भरेल एवढा हा ग्रंथ शास्त्रीबुवांनीं स्वतः लिहिला. शास्त्रीबुवांच्या हयातींतच निबंधमाला अत्यंत लोकप्रिय झाली होती. वाचकांनीं वाट पहात राहावें एवढी ओढ शास्त्री-बुवांच्या रसाळ लेखनांत खात्रीनें होती. प्रत्येक निबंध माहितीनें तुडुंब भरलेला, विद्वत्तापूर्वक विवेचिलेला, शुद्ध भाषेनें शोभणारा, परिणामदृष्ट्या सुफलित झालेला असे. शास्त्रीबुवांची टीका मात्र अत्यंत कठोर व कित्येकदां भावनानिष्ठ व दुराग्रही असे. मराठी भाषेंत तरी 'माला' चालू असतांना तिच्या तोडीचें दुसरें लेखन त्या वेळीं नव्हतें, इतकेंच नव्हे तर आजहि "माले"ची श्रेष्ठता तिच्या अंगभूत गुणांमुळें सर्वमान्यच आहे.

'मालें'तील लेखन निरुद्देश नव्हतें. शास्त्रीबुवांना एक विशिष्ट कार्य करावयाचें होतें. इंग्रजी राज्याच्या स्थापनेनें समाज हादरून गेला होता. धार्मिक व सामाजिक बंधनें शिथिल झालीं होतीं. आपली संस्कृति, आपला धर्म, आपली भाषा हीं सर्व कुचकामाचीं असून पाश्चात्य तेवढें चांगलें या मताचा प्रचार व प्रसार जोरांत होत होता. राजकीय क्षेत्रांतहि पाश्चात्य संस्कृतीनें दिपून गेल्यामुळें 'ईश्वरानें या देशात इंग्रजांना आणलें', 'हे गुरु दूर देशांतून इकडे परमेश्वरानें पाठविले आहेत', 'हिंदु लोकांस हा फार

मोठा लाभ झाला आहे', 'ही इंग्रजसंयोगाची गोष्ट सहजासहजीं घडून आलेली नाहीं, त्यांत कांहीं ईश्वरी योजना आहे' अशा तऱ्हेच्या दास्य पदरीं पाडणाऱ्या तत्त्वज्ञानाचा उदय झाला होता. आध्यात्म तत्त्वप्रधान पौर्वात्य संस्कृति आणि आधिभौतिक सुखभोगप्रधान पाश्चात्य संस्कृति या दोघींच्या झगड्यांत अल्पकाळ का होईना पाश्चात्य संस्कृतीचा विजय होण्याचीं सारीं चिन्हें चारी बाजूंस स्पष्ट दिसत होतीं. अशा बिकट परिस्थितींत आपल्या संस्कृतीचा आमूलाग्र नाश होऊं नये, निदान तिचीं उत्कृष्ट अंगें तरी राहावीं अशा प्रामाणिक समजुतीनें प्रेरित होऊन तत्कालीन कांहीं विद्याविभूषित विद्वान् विशिष्ट दिशेनें प्रयत्न करीत होते. ब्राह्मसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज या व अशा प्रकारच्या संस्था या प्रयत्नांचीं उदाहरणें म्हणून सांगतां येतील.

सामाजिक व धार्मिक सुधारणा घडवून आणावी म्हणून एकोणिसाव्या शतकाच्या द्वितीयार्धात न्यायमूर्ति रानडे, डॉ. भांडारकर, लोकहितवादी, विष्णुबुवा ब्रह्मचारी, महात्मा फुले वगैरे सत्प्रवृत्त गृहस्थ अन्तःकरणपूर्वक झटत होते. 'ज्ञानप्रसारक', 'दंभहारक', 'विविधज्ञान-विस्तार' वगैरे नियतकालिकें आणि दादोबा पांडुरंग, बाळशास्त्री जांभेकर, माडगांवकर, कृष्णशास्त्री चिपळूणकर, परशुराम तात्या गोडबोले इत्यादि विद्वान् मराठी भाषेची सेवा करण्यांत मग्न होते. पण 'निबंधमाला' प्रकट झाली आणि भाषाविषयक कार्याला इतका जोर आला कीं 'माले'पूर्वी झालेले प्रयत्न दृष्टीआड होऊं लागले. सामाजिक व राजकीय सुधारणेच्या बाबतींतहि 'माले'च्या द्वारा शास्त्रीबुवांनीं जी विचारक्रांति करण्याचा प्रयत्न केला, तो कांहीं काल प्रभावी झाला हें निश्चित. मात्र शास्त्रीबुवांचा दृष्टिकोण अंतिम ध्येयाच्या दृष्टीनें अपुरा पडला हें सत्य आज आपणांस पटत चाललें आहे. याबद्दलची चर्चा यथावकाश पुढें येणार आहे. दुसरीहि एक गोष्ट ध्यानांत येते ती ही कीं, शास्त्रीबुवांच्यापूर्वी सामाजिक व राजकीय सुधारणेचें

कार्य झालें, पण त्यानें समाजाला द्यावा तितका जोराचा धक्का दिला नाहीं. हा धक्का 'माले'नें दिला. शास्त्रीबुवांच्या अंगची बुद्धिमत्ता, सरस भाषा-शैली, विषयप्रतिपादनाची परिणामकारक पद्धति इत्यादि गुणांनीं 'माले'नें वाचकांच्या हृदयाची पकड घेतली आणि 'स्वधर्म,' 'स्वदेश' आणि 'स्वभाषा' या त्रयीच्या अभिमानाची ज्योत समाजाच्या मनांत प्रज्वलित केली.

## साहित्यमहती

साहित्यक्षेत्रांत 'मराठी गद्य-वाङ्मयाच्या जनकत्वा'चा मान शास्त्री-बुवांकडे देण्यांत येतो हेंहि साहजिकच आहे. आपण 'मराठी भाषेचे शिवाजी' आहोंत असें शास्त्रीबुवा म्हणतात त्यांत दर्पोक्तीचा गंध असला तरी सत्याचाहि बराच अंश आहे. शास्त्रीबुवांनीं आपली अशी विशिष्ट भाषापद्धति निर्माण केली आणि हें 'चिपळूणकरी' वळण अद्यापहि चालू आहे. शास्त्रीपंडितांच्या ग्रंथांत जाडया जाडया संस्कृत शब्दांचाच भरणा केलेला असे, त्यामुळें त्यांतील भाषा बेडौल व दुर्बोध झालेली असे. तर इंग्रजी शिकलेल्या बहुतेक लेखकांच्या ग्रंथांत इंग्रजीची छाप स्पष्टपणें दिसून येई. गद्याची भाषा शुद्ध मराठी ठेवून सोपे सोपे संस्कृत शब्द मध्यें आणून भाषेची सजावट करण्याचा प्रयत्न थोरल्या शास्त्रीबुवांनीं केला व त्याच भाषापद्धतीच्या उत्क्रांत स्वरूपाचें अवलंबन करून विष्णुशास्त्र्यांनीं आपल्या लेखनांत निरनिराळ्या भावनांचीं सुंदर शब्दचित्रें वाचकांसमोर उभीं केलीं आहेत. हातीं घेतलेला विषय वाचकांस नीट समजावून देणें हा 'माला'कारांचा लेखन-हेतु असल्यामुळें, त्यांचें विषय-विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत व सर्वांगपरिपूर्ण झालें आहे.

ओजस्वितेबद्दल शास्त्रीबुवांची प्रख्यातिच आहे. रूपक, दृष्टान्त, विरोध इत्यादि अलंकारांच्या साहाय्यानें त्यांनीं आपली भाषा प्रसंगीं इतकी

जोरदार केली आहे कीं, ते भाग वाचतांना वाचकांच्या भावना उचंबळून येतात. कित्येक भाग तर सरसतेच्या दृष्टीनें काव्याच्या पदवीला पोहोंचले आहेत. त्यांचीं वर्णनें चटकदार असतात. निरनिराळ्या कोट्या करून आपले लेख विनोदपूर्ण व मनोरंजक करण्याची शास्त्रीबुवांची पद्धति खरोखर अद्वितीय आहे. मात्र त्यांचा विनोद ' सात्त्विक ' तऱ्हेचा नसून प्रतिपक्षाची फजिती करण्यासाठीं कसलेल्या लेखकाकडून योजलेल्या स्वरूपाचा, शस्त्राच्या धारेसारखा आहे. अशा तऱ्हेनें वाङ्मयीन गुणांनीं पुरेपूर नटलेली ' निबंध-माला ' ही मराठी भाषादेवीच्या गळ्यांतील भूषणमाला होऊन राहिली, त्यांत कांहीं वावगें झालें नाहीं.

शास्त्रीबुवांनीं लेखणी हातीं घेण्यापूर्वीं मराठी वाङ्मयांत पुष्कळ लेखन झालेलें होतें; भाऊ महाजन, हरि केशवजी, माडगांवकर, लोकहितवादी, कृष्णशास्त्री यांनीं पुष्कळ लिहिलें, परंतु त्या सर्वांत कलात्मकतेचा तितकासा विकास झालेला दिसत नाहीं. विशेषतः निबंधलेखन हा जो वाङ्मयीन प्रकार तो शास्त्रीबुवांनीं प्रकर्षानें सजविला यांत शंका नाहीं. इतकेंच नव्हे तर पुढें झालेल्या अनेक नामवंत लेखकांनीं ' माले 'चें ऋण उघडपणें कबूल केलें आहे. लो. टिळकांची कुशाग्रबुद्धि, समाजसुधारक आगरकर यांची तळमळ शास्त्रीबुवांच्या लेखनांत दिसून येत नाहीं. याच्याहि जरा पुढें गेल्यावर प्रतिभा, वर्णनशैली, उपहास, अलंकारप्रचुरता या गुणांबद्दल प्रसिद्ध असलेले शिवरामपंत परांजपे; सूक्ष्म विवेचन, कल्पनानावीन्य, सडेतोडपणा या गुणांनीं नांवाजलेले विश्वनाथ काशीनाथ राजवाडे; मनोहर विनोद, मार्मिक टीका यांसाठीं प्रसिद्धि पावलेले श्रीपाद कृष्ण कोल्हटकर; रसिकता, मार्मिकपणा, सहृदयता, अष्टपैलू बुद्धि यांनीं संपन्न असलेले नरसिंह चिंतामण केळकर; साधी सरस भाषा, अथांग भक्ति, पूर्ण श्रद्धा यांनीं आपलें वाङ्मय शोभविणारे लक्ष्मण रामचंद्र पांगारकर या सर्व लेखकांचे निबंध शास्त्रीबुवांच्या निबंधापेक्षां वाङ्मयदृष्ट्या वरच्या दर्जाचे आहेत हें खरें, परंतु या सर्व

लेखकांना वाङ्मयसेवेची व देशभक्तीची स्फूर्ति 'माले'नेंच दिली ही गोष्ट ध्यानांत आणिली म्हणजे. 'माले'नें आपलें कार्य उत्तम प्रकारें पार पाडलें व आपल्याहिपेक्षां सवाई शिष्य निर्माण केले हें आपोआपच सिद्ध होतें.

## राजकीय पंथ

विष्णुशास्त्र्यांचें नांव मराठी वाङ्मयांत चिरंतन झालें. पण त्यांच्या वाङ्मयीन कार्याचें प्रयोजन मुख्यतः साहित्यविषयक नव्हतें, तें राजकीय होतें. पेशवाई बुडाल्यानंतर मराठे व ब्राह्मण सरदार यांची स्थिति फारच वाईट झाली होती. त्यांच्यांत आळस व अज्ञान व यांच्या जोडीला मिजासीखोरपणा या दुर्गुणाचा बराच प्रादुर्भाव झाला होता. १८४९ सालीं लोकहितवादींनीं आपल्या एका लेखांत तत्कालीन सरदार लोकांविषयीं मोठा मार्मिक अभिप्राय दिला आहे. त्याचें तात्पर्य असें, पेशवाई अखेर जे सरदार बाजीरावास कंटाळून इंग्रजांना मिळाले त्या ब्राह्मण—ब्राह्मणेतर सरदारांस असें वाटलें कीं, इंग्रज राजा झाला तर पेशव्यांची ताबेदारी—नोकरी आज करावी लागते ती चुकेल व घरबसल्या खावयास मिळेल. म्हणून त्यांनीं इंग्रजांना मान्यता देऊन सरकारानें जहागिरी वगैरेची केलेली व्यवस्था स्वीकारली. पण पुढें त्याच व्यवस्थेंत घातलेल्या कलमाप्रमाणें उत्पन्नें जप्त होऊं लागलीं तेव्हां केलें काय व झालें काय असें त्यांना वाटूं लागलें. ब्राह्मणवर्गांत जे भटभिक्षुक, शास्त्रीपंडित होते त्यांचें महत्त्व लयास गेलें. पेशवाई दानधर्म थांबला आणि त्यांतले अनेक भिकारी होऊन दीनवाणे रस्त्यांत फिरूं लागले. कारकुनी पेषा मात्र बराच सुरक्षित राहिला. जुना फड गेला आणि साहेबी कचेरी आली एवढाच फरक ! किंबहुना याच कारकुनी वर्गानें इंग्रजी राज्य सुप्रतिष्ठित होण्याला साहाय्य केलें. यांनींच इंग्रज सरकारच्या राज्यस्थापनेच्या मार्गांतील कांटेकुटे झाडून साफ केले. साहेब लोक परकी, ते त्यांच्यावरच सर्व विश्वास टाकत. या अधिकारप्राप्तीनें मुख्य कारकून, शिरस्तेदार, व तत्समान अधिकारी स्वार्थी, जुलमी व अनीतिमान् बनले.

या सर्वांच्या जोडीला इंग्रजांनीं नव्या पद्धतीचें शिक्षण होतकरू पिढीस देण्यास सुरुवात केली. त्यांत मुख्यतः तीन हेतु होते; एक, सरकारला राज्य-कारभार चालवायला नोकर लोकांची वाण पडूं नये म्हणून. दोन, हिंदी-लोकांना पाश्चात्य संस्कृतीचें वळण लागून ते परावलंबी व्हावे व आपला व्यापार कायमचा चालावा. तीन, त्यांनीं धर्मांतर करून ख्रिश्चन व्हावें. आरंभीं आरंभीं इंग्रजांचे हे तीनहि हेतु सफल होऊं लागल्याचीं चांगलींच चिन्हें चारी बाजूंस दिसूं लागलीं. परकीय लेखकांनीं लिहावें, 'तुम्हीं हिंदु म्हटलां म्हणजे गचाळ, तुमचा धर्म मूर्खपणानें भरलेला, तुमच्या सामाजिक चालीरीति रानटी, तुमचा इतिहास म्हणजे आपसांतील भांडणें व वैर, इत्यादि.' शरीरानें व मनानें गुलाम बनलेले आमच्यांतील कांहीं विद्वान् त्यांचीच री ओढूं लागले. जिकडे पहावें तिकडे स्वाभिमानशून्यता, स्वार्थ, देशद्रोह यांचें राज्य !!

सुदैवानें या नरकावस्थेंतून आपल्या समाजाचा उद्धार वाटेल तें करून झाला पाहिजे अशी कल्पना कांहीं स्वाभिमानी गृहस्थांच्या मनांत डोकावूं लागली. पण आपलें ध्येय प्रत्यक्ष अमलांत आणणें त्या काळीं किती कठिण होतें याची कल्पना सांप्रतच्या पिढीला येणेंच शक्य नाहीं. पारतंत्र्याच्या शृंखला तोडून टाकण्याची चळवळ सुरू झाली होती व ती निरानिराळ्या मार्गांनीं चालली होती हें गेल्या दिडशें वर्षांच्या इतिहासानें स्पष्ट केलें होतें. पितामह दादाभाई नवरोजी, न्यायमूर्ति रानडे, लोकहितवादी, महात्मा फुले, नामदार गोखले यांच्या चळवळीचा एक प्रवाह. विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक यांच्या चळवळीचा दुसरा प्रवाह. १८५७ च्या बंडानंतर वासुदेव बळवंत फडके, स्वातंत्र्यवीर सावरकर व त्यांचे बंधु, दामोदर चाफेकर व त्यांचे बंधु, अनंत कान्हेरे इत्यादि तरुणांच्या चळवळीचा तिसरा प्रवाह. अशा तीन प्रवाहांनीं वहाणारी राजकीय स्वातंत्र्याची ही 'त्रिपथगा' नुसत्या महाराष्ट्रांतूनच नव्हे तर भारतांतील बहुतेक सर्व प्रांतांतून वहात होती. या प्रत्येक प्रवाहाचें स्वरूप मात्र वेगवेगळें होतें. नवरोजी, रानडे,

गोखले इत्यादि धुरिणांना सामाजिक क्रांतीची आवश्यकता अधिक वाटली. समाजांतील आपल्या दोषांमुळेंच आपण या हीन दशेप्रत आलों, ते सर्व दोष धुऊन साफ निघाल्याशिवाय गेलेलें स्वातंत्र्य परत येणार नाहीं या प्रामाणिक समजुतीनें त्यांनीं आपल्या कार्याची आंखणी केली होती. पाश्चात्य संस्कृतींतहि कांहीं चांगले गुण आहेत ते घेऊन व आपले चांगले गुण ठेवून हे लोक समाजाचें परिवर्तन करूं इच्छीत होते. यांच्या परिवर्तनवादाला आपल्या इतिहासांत बरेंच महत्त्व आहे, हें आतां सिद्ध झालें आहे.

शास्त्रीबुवा या परिवर्तनवादाशीं एकमत होऊं शकले नाहींत. त्यांची दृष्टि आपल्या प्रतिपक्षावर अधिक भिडली होती. आपल्या घरांत पाहुणा म्हणून आलेला पण आतां आमच्या घरचा मालक बनलेला हा साहेब आधीं घराबाहेर निघाला पाहिजे. तसें होण्यास या साहेबाबद्दल समाजाला जो आदर वाटत आहे, त्याच्याविषयीं समाजांत जी प्रेमभावना निर्माण झाली आहे, तो आदर, तें प्रेम, प्रथम नाहींसें झालें पाहिजे किंबहुना या प्रेमाचें स्थान द्वेषानें घेतलें पाहिजे तरच गेलेलें स्वराज्य परत येईल, अशी विष्णुशास्त्र्यांची विचारसरणी होती. हें ध्येय सिद्ध करण्यासाठीं स्वदेश, स्वधर्म, स्वभाषा यांना विन्मुख झालेल्या समाजाचें तोंड परत या 'स्वत्रयी' कडे फिरविणें आवश्यक होतें. या कार्याला प्रवृत्त झाल्यावर पाश्चात्य तेवढें सर्व वाईट व आपलें तेवढें सर्व चांगलें हें आत्यंतिक धोरण अवलंबिणें क्रमप्राप्तच झालें. मुळांत शास्त्रीबुवांच्या मनाची ठेवणहि याच विचारसरणीला अनुकूल होती. त्याचें स्वच्छ प्रतिबिंब शास्त्रीबुवांच्या लेखालेखांतून आपणांस पहावयास मिळतें. हा पुनरुज्जीवनवाद शास्त्रीबुवांनीं विवेचिला, लोकमान्यांनीं त्याला जहाल स्वरूप दिलें. सामाजिक सुधारणा नंतर झाल्या तरी चालतील, आधीं राजकीय स्वातंत्र्य मिळवूं हेंच या पंथाचें पुढें ध्येयवाक्य बनलें.

तिसरा पंथ क्रांतिवाद्यांच्या. हें तर सतीचें वाण होतें. याला भावनातिशयाची आवश्यकता होती. त्रिवेणीसंगमांतील ही सरस्वती गुप्तपणें अखंड

वावरत होती हें निश्चित. किती कोवळे कोवळे जीव या गुप्त सरस्वतींत राहिल्यामुळें फांशी गेले, किती देशोधडीला लागले, याचा इतिहास मोठा मनोरंजक व रोमाञ्चकारी आहे.

राजकीय दृष्ट्या विष्णुशास्त्र्यांची योग्यता वरील विवेचनावरून आपणांस ठरवावी लागेल. एका प्रमुख पंथाच्या जनकत्वाचा मान त्यांजकडे आहे हें विसरून चालणार नाहीं. त्यांच्या विचारसरणींत व्यापकता नसेल, किंबहुना समाजाच्या प्रगतीला त्या विचारसरणीनें थोडेंसें बंधनहि घातलें असेल पण समाजाचीं मनें एका विशिष्ट प्रकारें तयार करण्याचें काम या पंथानें केलें. व या पंथाला वरच्या वर्गांत अनेक अनुयायीहि मिळाले. ही गोष्ट मानस-शास्त्राला धरूनच आहे. परिवर्तनवादांत प्रत्येक व्यक्तीला आपलें मानलेलें असें कांहीं तरी त्यागावयाचें असतें. या त्यागाला सर्वसामान्यांची लवकर तयारी होत नाहीं. म्हणूनच आगरकरांनीं बोलके सुधारक व कर्ते सुधारक असे प्रकार केले व बोलक्यांवर जोराचा प्रहार केला. क्रांतिकारकांचा मार्ग तर कांट्यांकुट्यांनींच भरलेला. साधी जनता त्याकडे वळते कशाला ? राहतां राहिला पुनरुज्जीवनवादी मार्ग. सामान्यांना तो पटला, रुचला, आवडला. सर्वसामान्यांना प्रत्यक्ष त्याग करण्याची विशेष आवश्यकता नव्हती, पण या वादांतील पुढाऱ्यांनीं जनतेच्या मनांत इंग्रज-द्वेषाचें जें बीं रुजत घातलें, त्याचा वृक्ष होऊन त्याचें फळ म्हणून कांहीं तरी मिळालें हें निःसंशय. बारकाईनें पाहातां या तिन्ही प्रवाहांचा सुंदर त्रिवेणी संगम महात्मा गांधींच्या चळवळींत दिसून येतो. या संगमानेंच अखेरीस भारताला स्वातंत्र्य मिळवून दिलें. या दृष्टीनेंहि विष्णुशास्त्र्यांना त्यांच्या श्रेयाचा भाग आपण दिला पाहिजे.

विष्णुशास्त्र्यांच्या राजकीय कार्यावर टीका करणारे टीकाकार एकाच विशिष्ट दृष्टीनें त्यांच्या कार्याकडे पाहातात व टीका करतात असें म्हणावें लागतें. विशिष्ट परिस्थितींत वाढलेले विष्णुशास्त्री विशिष्ट संस्कारांनीं बन-लेल्या आपल्या बुद्धीच्या साहाय्यानें ‘ पुनरुज्जीवनवाद ’ प्रस्थापूं लागले तर

त्यांचें कांहीं चुकलें असें म्हणतां यावयाचें नाहीं. त्या काळीं ही पक्षनिष्ठता एवढी प्रखर असे कीं एक पक्ष दुसऱ्या पक्षाची अपशब्दानेंच पूजा करी. लोकहितवादी, स्वामी दयानंद, न्यायमूर्ति रानडे, महात्मा फुले यांच्यावर विष्णुशास्त्र्यांनीं टीका केली व त्यामुळें विष्णुशास्त्र्यांचें राजकीय कार्य फुकट गेलें, किंबहुना विष्णुशास्त्र्यांना राजकारण म्हणजे काय तें समजलेंच नाहीं असें म्हणण्यापर्यंत अर्वाचीनांची मजल गेली आहे. पण प्रत्येक व्यक्तीच्या कार्याचें मूल्यमापन करतांना त्या व्यक्तीचा स्वभाव, मनाची ठेवण, एकंदर परिस्थिति याहि घटकांचा विचार करणें आवश्यक आहे. या दृष्टीनें विष्णुशास्त्र्यांच्या मरणाची दुःखद वार्ता कानांवर पडतांच न्यायमूर्ति रानड्यांनीं डोळ्यांतून अश्रुप्रवाह चालला असतांना 'He had no business to die so early' असे जे कळवळ्याचे उद्गार काढले ते अगदीं सार्थ होते असें म्हणावें लागतें !

## विशुद्ध चारित्र्य

विष्णुशास्त्र्यांच्या बाबतींत ध्यानांत ठेवण्याजोगी आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे त्यांचें शुद्ध चारित्र्य. त्या काळीं समाजस्थिति विलक्षण होती. मोठा भळभळीत झोंकदार पोषाक करावा, गाड्याघोड्यांवरून मिरवावें, अत्तरगुलाबांनीं लिप्त असावें, प्रसंगीं मद्यपानादि सर्व प्रकारच्या व्यसनांत भाग घ्यावा, अशा प्रवृत्तीचे लोक सुशिक्षितांतहि पुष्कळ आढळत. घरीं वडिलांचेंहि उदाहरण आदर्श म्हणून ठेवण्याजोगें नव्हतें; अशा परिस्थितींत शास्त्रीबुवांचें जीवन निष्कलंक राहिलें यावरून त्यांच्या मानसिक धैर्याचें कुणीहि कौतुकच करील. शास्त्रीबुवांच्या हातांत पैसाहि पुरेसा असे. नोकरी लागल्याबरोबर कृष्णशास्त्र्यांनीं चिरंजिवांस बजाविलें कीं आपले पैसे वेगळे ठेव. त्यानंतर पैसे किती सांचले, किती खर्च झाला, बँकेंत आहेत कीं नाहीं

याची थोरल्या शास्त्रीबुवांनीं केव्हांच चौकशी केली नाहीं. परंतु विष्णुशास्त्री लहानपणापासूनच सद्प्रवृत्त होते. सुपारीचेंहि त्यांना व्यसन नव्हतें. नाहीं म्हणावयास त्यांना एक फार मोठें व्यसन होतें, तें म्हणजे पुस्तकें खरिदण्याचें! ते स्वतः मुंबईस गेले किंवा त्यांचे कुणी स्नेही गेले म्हणजे नवीन पुस्तकें आणण्याची ते हटकून व्यवस्था करीत. मराठींतील कोणताहि उपयुक्त ग्रंथ किंवा मासिकें शास्त्रीबुवांच्या संग्रहीं असावयाचीं. अशा विद्याव्यसनी व्यक्तीचें खासगी वा सार्वजनिक आचरण शुद्ध राहिलें नसतें तर नवल!

एवढ्या अल्पवयांत एवढी असामान्य कामगिरी केलेला चारित्र्यवान्, त्यागी, स्वाभिमानी, देशाभिमानी, भाषाभिमानी पुढारी आकस्मिकरीत्या आपल्यांतून निघून गेला, यामुळें उभ्या महाराष्ट्राला दुःख तर झालेंच पण शास्त्रीबुवांच्या मृत्यूनें झालेली हानि भरून निघणार नाहीं या सत्य समजुतीनें महाराष्ट्र किती तरी दिवस निराश झाला होता. टिळक-आगरकरांवर आकाशींची कुऱ्हाडच पडली होती. कित्येक दिवस दोघेहि दुःखीकष्टी होते. शास्त्रीबुवांचा यशस्वी चेहरा यापुढें शाळेंत, केसरी-मराठा कार्यालयांत दिसणार नाहीं या विचारानें ते उभयतां विषण्ण मनःस्थितींत किती तरी दिवस होते. पण काळ हाच खरा दुःखाचा विसर पाडणारा असतो. विष्णुशास्त्र्यांनीं त्यांच्या हातीं दिलेली देशसेवेची तेवती मशाल त्यांनीं आमरण प्रज्वलित ठेवली व शास्त्रीबुवांच्या कार्याचा व्याप अतोनात वाढविला यांत शंका नाहीं.

# शास्त्रीबुवांनीं सांगितलेल्या कांहीं गोष्टी

( १ )

विष्णुशास्त्र्यांना गणिताची तितकीशी गोडी नव्हती, तरी त्यांची योग्यता केरू नाना जाणून होते. एकदां विष्णुशास्त्री व त्यांचे चुलते सीतारामपंत हे उभयतां शुक्रवार पेठेंतील दवाखान्यांत डॉक्टर बाळकृष्ण चिंतोबा हे सूक्ष्मदर्शक यंत्रानें रक्तबिंदूंतील द्रव्याच्या पृथक्करणाचा प्रयोग दाखविणार होते, तो पाहाण्यास गेले. तेथें केरोपंतहि सहज आले होते. डॉक्टर बाळकृष्ण चिंतोबा हे सूक्ष्मदर्शक यंत्र लावून रक्तबिंदूचा प्रयोग दाखवूं लागले. त्या वेळीं सीतारामपंतांची चंचलता व बाह्य हुषारी पाहून वरवर परीक्षा करणारे डॉक्टरसाहेब त्यांजवर फार खुष झाले आणि सीतारामपंतांच्या तरतरींत आणि विष्णुशास्त्र्यांच्या संकुचित व अबोलक्या वृत्तींत मोठी तफावत पाहून केरोपंतांकडे वळून म्हणाले, " पहा, हा विष्णु किति थंड आहे ! सीताराम बरा हुषार दिसतो. त्यानें इकडून तिकडून सर्व यंत्र पाहिलें, पण हा विष्णु एका जागेवरून हालला सुद्धां नाहीं. " केरोपंतांचें मत या मुलांच्या बाबतींत वेगळें होतें. त्यांनीं उत्तर दिलें, " विष्णु हा दिसण्यांत चंचल नाहीं हें खरें, परंतु त्यानें एका जागेवरच उभें राहून या प्रयोगांतील जितक्या खुब्या लक्षांत आणिल्या असतील तितक्या चोहोंकडून फिरून पाहूनहि सीतारामाच्या लक्षांत आल्या नसतील अशी माझी खात्री आहे. "

( २ )

विष्णुशास्त्री पूना हायस्कुलांत शिक्षक म्हणून काम करूं लागले त्या वेळीं त्यांच्या बरोबरीच्या शिक्षकवर्गांत नाना घाटे हे एक होते. घाटे मोठे खुबीदार व चाणाक्ष होते. मुख्याध्यापक कुंटे यांची शिस्त फारच कडक. घरीं

कांहीं काम असलें तर विचारून जाण्याचीहि सोय नसे. तेव्हां नाना घाटे एक युक्ति करीत; त्याबद्दल विष्णुशास्त्री सांगत कीं, 'वर्गात खुर्चीवर उपरणें ठेवून देऊन नाना खुशाल शाळेबाहेर पडत व गांवांत एक-दोन चकरा मारून येत.' खुर्चीवर उपरणें असल्यावर नाना शाळेंतच कोठें तरी आहेत असा समज कुंट्यांचा सहजच होत असे!

( ३ )

पुणें शहरांत सार्वजनिक सभा भरण्याकरितां स्वतंत्र व सोईची अशी जागा नाहीं. पुढारी मंडळींस ही उणीव फार दिवस जाणवत होती. परंतु अशा कामास पैसे पुष्कळ लागणार असल्यामुळें व यापूर्वी सार्वजनिक चळवळहि थोडीच असल्यामुळें नगरसभागृहासारख्या सार्वजनिक इमारतींचा योग आला नाहीं. १८७२ सालीं रावबहादुर माधवराव रानडे यांची बदली पुण्यास झाली व ते पुण्यास आल्यापासून सार्वजनिक चळवळीला बराच जोर आला. शेवटीं या सालच्या ऑगस्ट महिन्यांत मुंबईप्रमाणें येथेंहि टाऊन हॉल बांधण्याचा विचार करण्याकरितां एक सभा भरली. तिच्यासंबंधानें हकीकत विष्णुशास्त्री सांगत असत कीं, "मंडळी जमून सभेचा उद्देश वगैरे सांगितल्यानंतर त्याच्या उपयुक्ततेबद्दल सर्वांची तेव्हांच खात्री झाली; परंतु तो तडीस नेण्याकरितां पैशाची यादी निघून तत्त्वमतीशीं गांठ आली तेव्हां यादी गोरीची काळी न होतां, ती एकाच्या हातून दुसऱ्याच्या, दुसऱ्याच्या हातून तिसऱ्याच्या हातांत पडूं लागली! इतक्यांत सार्वजनिक सभेचे चिटणीस श्री. शिवराम हरि साठे हे सहज ती यादी घेऊन छोटेखानी मंडळीकडे आले असतां मीं प्रथम तिजवर एक महिन्याच्या भर पगाराचा आंकडा टाकला असतां श्री. शिवरामपंत आश्चर्य वाटून म्हणाले, 'ही नवी मंडळी कांहीं चमत्कारिक आहे!' श्री. कुंटे यांनींहि सर्व पगाराचा आंकडा घातला; परंतु व्यवहारदक्ष रावबहादुरांच्या पगाराच्या निम्माच आंकडा पडला."

(४)

विष्णुशास्त्र्यांना शिकविण्याची स्वाभाविकच हौस होती. ते एकदां सांगत होते कीं, " रा. काशीनाथपंत गोडबोले, एक्झिक्यूटिव्ह इंजिनियर हे एके दिवशीं सहज हायस्कुलांत येऊन गप्पागोष्टी चालत असतां म्हणाले, " काय बोवा, शिक्षकाच्या कामाचा मोठा त्रास, नाहीं बरें ! मला वाटतें कीं, एक तास शिकविणें आणि तीन तास वाचीत बसणें बरोबर होईल ! " विष्णुशास्त्र्यांनीं यावर फार टीका केली व ते म्हणाले कीं, मीं स्वतः चार चार तास शिकविलें तरी मला त्याचें फारसें कांहीं वाटत नाहीं."

(५)

न्यू इंग्लिश स्कूलची भरभराट पाहून पुष्कळ विद्वान् व प्रसिद्ध गृहस्थहि शाळा पहाण्यासाठीं येऊं लागले. श्री. तेलंग एके दिवशीं टिळकांबरोबर शाळेंत आले. या नूतन संस्थेची एकंदरींत नवीन कल्पना व तिची व्यवस्था पाहून ते खुष झाले. शेवटीं बोलतां बोलतां आम्ही हळूहळू या शाळेला जोडून एक कॉलेजहि काढणार आहोंत असें श्री. टिळक यांनीं सुचविलें. त्यावर श्री. तेलंग हे न्यू इंग्लिश स्कूलच्या तरुण मंडळींच्या सहवासांत क्षणभर तल्लीन झाले व म्हणाले, " मलाहि तुम्हांमध्यें येऊन मिळावेसें वाटतें. आणखी साधारण चार-पांच वर्षांनीं मला तसें करतां येईल. दोन लाख रुपये जमले म्हणजे मी असें करणार. कांहीं थोडे हजार कमी आहेत, ते तेवढ्या वेळांत भरून येतील. " हे उद्गार विष्णुशास्त्री यांनीं मुकाट्यानें ऐकून घेतले. घरीं आल्या-वर ही हकीगत सांगत असतां ते म्हणाले, " काय हो, एकूण दोन लाखांत दहा-पांच हजार कमी असले म्हणजे कांहीं बरें नाहीं ! दोन लाख तंतोतंत पाहिजेत; एरवीं चालावयाचें नाहीं अं ! "

(६)

विष्णुशास्त्री हायस्कूलच्या दुसऱ्या वर्गांत असतांना वर्गशिक्षक रा. चिमणाजी महादेव यांनीं एकदां म्हटलें कीं, ' जे विद्यार्थी अमुक दिवशीं

'डेझरटेड व्हिलेज' सर्व बिनचूक म्हणून दाखवितील त्यांस मी एक एक हातरुमाल बक्षीस देईन." ठरल्याप्रमाणें नियमित दिवशीं परीक्षा होऊन चार विद्यार्थ्यांस बक्षिसें मिळालीं त्यांत विष्णुशास्त्री हे एक होते. हे चिमणाजी मोठे तरतरीत गुरुजी होते असें विष्णुशास्त्री सांगत.

(७)

१८६५ सालची गोष्ट. करख्यामसाहेब हे मुख्याध्यापक व वामन आबाजी मोडक हे उपमुख्याध्यापक होते. करख्याम शिकविण्याची मेहनत फारशी घेत नसत, पण शाळेचें यंत्र सुरळीत चालविण्याच्या कामीं ते विशेष चतुर होते. या सालीं पूर्वपरीक्षा झाली त्या वेळीं रा. वामनराव मोडक यांनीं जी खुबीदार हिकमत केली तिजबद्दल विष्णुशास्त्री सांगत कीं, परीक्षेच्या दिवशीं सर्व मुलें कागद, दौती वगैरे सामान घेऊन तयार होऊन प्रश्नांच्या कागदाची वाट पहात बसले असतां, मोडकांची स्वारी अंमळ इकडून तिकडून सावकाश अशी फेरी मारून सर्व यथास्थित आहे असें पाहून मध्येंच कांहीं स्मरण झाल्यासारखें करून अंमळ हिकमतीनें विद्यार्थ्यांस म्हणाली, 'अरे येथें कोणापाशीं डिक्शनरी आहे काय? मला एक शब्द पहायचा आहे', परंतु कोणी अजागळ मुलानें लपवून ठेवलेली पॉकेट डिक्शनरी गुरुजींची तेवढी अडचण दूर करण्यासाठीं चटकन् पुढें केली नाहीं! तेव्हां स्वारी अंमळ हंसून प्रश्नांचे कागद वाटूं लागली.

(८)

कृष्णशास्त्री हे विश्रामबागवाड्यापाशीं कर्व्यांच्या वाड्यांत रहात. तेथेंच बचंभट मामा म्हणून एक महानिःस्पृह खडखडीत व ठाकठिकीचे भिक्षुक राहात. हरिपंतमामांनीं विनंति केल्यावरून ते भटजी चिपळूणकरांच्या घरच्या सर्व मुलांस ब्रह्मकर्म शिकवूं लागले. वेदाध्ययन म्हणजे लहान मुलांस कंटाळवाणा अभ्यास असतो. त्यांतील अर्थ समजायचा नाहीं, नुसती पोपटपंची करायची, यामुळें मुलांचें लक्ष फारसें पाठ करण्याकडे लागत नसे.

शिवाय वेदऋच्यांत मधूनमधून अशा कांहीं शब्दपंक्तींच्या पंक्ती असतात कीं, त्या उच्चारतांना लहान मुलांना हंसूं आल्याविना रहात नसे. बचंभटमामाकडे चिपळूणकर बटुमंडळी संथा घेत असतांना त्यांस वरील प्रसंगीं कधीं कधीं हंसूं फार येई व तीं मुलें एकमेकांकडे पाहून टिवल्याबावल्या करीत. पण समोर गुरुजींची कडक मूर्ति बसलेली असे व त्यामुळें मुलें मोठ्या कष्टानें आपलें हंसें दाबीत. याप्रमाणें वेदाध्ययनाचा मार्ग हंसें दाबीत दाबीत कसें तरी क्रमीत असतां शेवटीं स्वाऱ्या

मसद्व्जा गोजा ऋतजा अद्रजा ऋतं

या ऋचेवर येऊन थडकल्या. एखाद्या मोठ्या तळ्याचा बांध फुटून ज्याप्रमाणें एकदम प्रचंड पाण्याचा लोंढा बाहेर पडतो, त्याप्रमाणें या बटुमंडळींच्या मुखांतून जें हंसें कोसळलें तें त्यांच्यानें आवरवेना ! गुरुजींस प्रथम या उकळीचें कारण न समजल्यामुळें त्यांस मोठें आश्चर्य वाटलें, परंतु अंमळशानें तें ध्यानांत आल्यावर ते शिष्यांस दटावून म्हणाले, 'अरे, तुम्ही वेदवाणीस हंसतां ? तुम्हीं पुन्हां असें कराल, तर मी तुम्हांस संथा देणार नाहीं.' या हास्यकल्लोळांत विष्णुशास्त्री बिलकुल सामील नव्हते. आपली पोथीवर दृष्टि ठेवून ते संथा म्हणत. गुरुजींनीं त्यांना शाबासकी देणें अगदीं स्वाभाविक होतें !

(९)

कृष्णशास्त्री खरोखर मोठे सुदैवी होते. संसारांतील हरएक प्रकारचीं सुखें उत्तम, सुदृढ शरीरप्रकृति, मोठा व सुखाचा रोजगार, चोहोंकडे विद्वत्तेबद्दल नांवलौकिक, स्वसुखाविषयीं मातापितर नेहमीं दक्ष, व होतकरू मुलें या सर्व गोष्टींमुळें त्यांचे दिवस मोठे सुखांत व चैनींत चालले होते. मुलें त्यांच्या खोलींत बसलीं म्हणजे हें टेबल उघड, तें कपाट धुंडाळ असें करून बरीच अव्यवस्था माजे. पण कृष्णशास्त्री त्याबद्दल कधीं चकार

शब्दानें बोलत नसत. विष्णुशास्त्री सांगत कीं, एकदां शास्त्रीबुवा रात्रीं जेवावयास खालीं गेले असतां मी व काशीनाथ असे दोघेजण वर त्यांच्या माडींत गेलों. तेथें चालू असलेलें घड्याळ पाहून आम्ही तें उघडून पाहूं लागलों, परंतु तसें करतांना घड्याळाची कांचच निघाली. ती बसविण्याची आम्ही खटपट करूं लागलों असतां एकाएकीं ती फुटली ! मग आम्ही तें घड्याळ तसेंच्या तसेंच बंद करून खालीं पळून गेलों. पुढें दोन-तीन दिवसांनीं अशाच वेळीं वर येऊन पहातों तों घड्याळाला दुसरीच कांच बसविलेली आहे असें आढळलें. परंतु पहिली कांच फुटली ती कशानें व कोणीं फोडली याबद्दल कांहीं चौकशी सुद्धां झाली नाहीं.

( १० )

डेक्कन कॉलेजांत केरोपंत नाना छत्रे हे गणिताचे प्राध्यापक होते. त्यांच्या विद्वत्तेमुळें व साध्या आणि आनंदी स्वभावामुळें विद्यार्थिवर्गांत त्यांची मोठी चहा असे. आपला विषय विद्यार्थ्यांना समजून देण्यांत त्यांचा हातखंडा असे. एकदां कोणी विद्यार्थ्यानें कांहीं बिकट शंका काढली असतां त्यावर उत्तर देतांना नाना म्हणाले कीं, " अरे तुझ्या या शंकेचें तूर्त जरी समाधान झालें नाहीं, तरी तुला ही शंका आली हीच मोठी गोष्ट. तिचें समाधान पुढें केव्हां तरी होईलच. अशी गोष्ट सांगतात कीं एका कावळीस दोन पोरें होतीं. त्यांस ती म्हणाली कीं, ' बाळांनो, जिकडून कोणी धोंडा फेकील त्याच्या उलट दिशेनें तुम्ही उडून गेलां म्हणजे तुमचा बचाव होईल. ' त्या दोन पोरांपैकीं एक जरा अधिक हुषार होतें, त्यानें शंका काढली, ' पण आई, जर दोन्हींकडून एकदम दोन धोंडे आले तर मग काय करावें ? ' आईनें उत्तर केलें, " बाळा, इतकी कल्पना तुला सुचली एवढेंच बस आहे. मला आतां तुझ्या रक्षणाची काळजी उरली नाहीं. " अशारीतीनें शंकेखोर मुलांना न रागावतां मोठ्या चतुराईनें ते गप्प करीत.

( ११ )

विष्णुशास्त्र्यांस आपल्या प्राचीन इतिहासाविषयीं, प्राचीन राजघराण्यांविषयीं, त्यांतील पराक्रमी व राजधुरंधर व्यक्तींविषयीं अत्यंत अभिमान वाटे. पेशव्यांच्या वैभवाच्या, पराक्रमाच्या, गोष्टी वृद्ध लोकांपासून ऐकण्याचा त्यांना फार नाद होता. एखादा गोंधळी आला कीं त्याजकडून पोवाडे म्हणवून घेण्याचा त्यांचा नेहमींचा शिरस्ताच असे. साताराचे हरिशास्त्री पंडित म्हणून एक गृहस्थ त्यांच्या घरीं येत. या शास्त्र्यांना बोलण्याची कला फार चांगली अवगत असे. ते एकामागून एक ऐतिहासिक प्रसंग वर्णू लागले कीं बैठकीला रंग असा चढे कीं श्रोत्यांना व वक्त्याला वेळेचें भानहि राहात नसे. महादजी शिंदे पुण्यास मोठ्या रुबाबानें येऊन आपल्या अल्पवयी मालकास—सवाई माधवरावास—शिकारीसाठीं कसा बाहेर नेई, त्या वेळीं आपल्या प्रतिस्पर्ध्यावरून मालकाचें मन उडावें म्हणून महादजी कशा खटपटी करी; नाना फडणिसाच्या अनेक शहाणपणाच्या युक्त्या, बाजीराव गादीवर आला त्या वेळीं बेबंदशाही कशी माजली, यशवंतराव होळकर पुण्यावर चाल करून कसा आला, अशा तऱ्हेच्या पेशवाईच्या अखेरीस घडलेल्या गोष्टी हरिशास्त्री इतक्या रसभरीत व चित्तवेधकरीतीनें सांगावयाचे कीं, त्याच त्याच गोष्टी परत परत ऐकूनहि ऐकणारांना कंटाळा येऊं नये.

विष्णुशास्त्र्यांच्या ‘ पुनरुज्जीवनवादा ’चें मूळ या त्यांचा आवडींत होतें. या गतवैभवाच्या श्रवणानेंच त्यांच्या स्वदेशाभिमानानें विशेष पेट घेतला; त्यांच्या कार्याचें स्फूर्तिस्थान महाराष्ट्राचें गतवैभव होतें, इंग्रजी शिक्षण नव्हतें. या बाबतींत विष्णुशास्त्र्यांच्या स्वभावावर प्रकाश पाडणारी एक गोष्ट आहे ती अशी : विष्णुशास्त्र्यांनीं कोजागरीसाठीं दूध वगैरे आणवून आपल्या निवडक स्नेह्यांबरोबर ती रात्र खेळांत व मजेंत घालविण्याचा विचार केला. इतक्यांत संध्याकाळीं बातमी आली कीं, ग्वाल्हेरला शेवटचे बाजीरावसाहेब यांचे दत्तक पुत्र नानासाहेब हे गोसाव्याच्या रूपानें लपूनछपून असतां शिंदे सरकारास

त्यांचा शोध लागला व त्यांनीं नानासाहेबांस पकडून कैद केलें व रेसिडेन्सी-मध्यें आणून पोंचविलें. ही वार्ता ऐकून विष्णुशास्त्री एकदम खिन्न झाले! त्यांनीं कोजागरीचा बेत रद्द केला!

× × ×

विष्णुशास्त्र्यांच्या पत्नी नेहमीं आजारी असावयाच्या. संततीचा योगहि यथातथाच दिसत होता. स्त्रीस्वभावानुरूप विष्णुशास्त्र्यांच्या मातुश्री मनांत-सारख्या रुखरुख घेऊन असत. एकदां घरांतील कारकून श्री. त्रिंबकराव यांजमार्फत त्यांनीं विष्णुशास्त्र्यांकडे दुसऱ्या लग्नाची गोष्ट काढली. विष्णुशास्त्री त्रिंबकरावांचें बोलणें ऐकून बराच वेळ गप्प बसले; परंतु नंतर थोडेसें रागावून ते उत्तरले, "या म्हाताऱ्यांना नाहींत त्या उठाठेवी सुचतात." त्यांचें मत असें होतें कीं, स्वतःस जरी संतति नाहीं, तरी आपले धाकटे बंधु लक्ष्मणराव यांस आहे ती बस आहे; पुनः दुसरें लग्न करून विनाकारण भानगडींत पडण्याच्या विचारांत त्यांनीं कधींहि मन घातलें नाहीं.

# लोकमान्यकृत चिपळूणकरप्रशस्ति

सार्वजनिक सभेंत लोकमान्य टिळकांनीं विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या श्राद्ध-तिथिनिमित्त एक निबंध वाचला. त्यांत शास्त्रीबुवांच्या कार्याचें महत्त्व त्यांनीं विवेचिलें आहे. आरंभीं इंग्रजी राज्यस्थापनेनंतर तयार झालेल्या पिढ्यांचें वर्णन करून त्यांनीं असें सांगितलें कीं विष्णुशास्त्र्यांच्या पूर्वीं झालेल्या चळवळी इंग्रजी शिक्षणानें हुरळून गेलेल्या लोकांनीं केल्या आणि शास्त्रीबोवांच्या लेखांचा जर कांहीं परिणाम झाला असेल तर हा विषवृक्ष इतकीं वर्षें वाढला होता तो तोडून टाकण्यांत मुख्यतः झाला. शास्त्रीबुवांना ही गोष्ट करतांना त्या वेळच्या पुढाऱ्यांना नांवें ठेवावीं लागलीं. शास्त्रीबुवांनीं योग्य समय ओळखून योग्य साधनांचा उपयोग केला आणि लोकांचा मोर्चा तिकडे फिरविला हें त्यांच्या मार्मिकपणाचें व प्रसंगावधानाचें फळ होय. टीकेंतील कडक भाषेबद्दल लोकमान्य म्हणतात कीं, कोणीहि मर्दानें प्रतिपक्षाच्या शस्त्रांच्या प्रखरपणाविषयीं तक्रार करण्यांत अर्थ नाहीं. विष्णुशास्त्र्यांनीं भाषा हें जें राष्ट्रोत्कर्षाचें साधन तें परिपूर्णतेला आणिलें. शास्त्रीबुवांचें अन्तःकरण कळकळीनें जळत होतें म्हणूनच त्यांच्या हातून कडक भाषा लिहिली गेली. ज्याला आपल्या विचारांची लोकांवर छाप बसवावयाची असेल किंवा वाग्देवीच्या प्रसादानें लोकांच्या मनोवृत्ति जागृत करावयाच्या असतील त्यांनीं

अमर्षशून्येन जनस्य जन्तुना न जातहार्देन न विद्विषादरः

(ज्याला रागच ठाऊक नाहीं अशा माणसाच्या मैत्रीबद्दलहि कोणाला आदर वाटत नाहीं किंवा त्याच्या शत्रुत्वाबद्दलहि डर वाटत नाहीं ) हाच न्याय स्वीकारला पाहिजे. जॉन्सन, मेकॉले वगैरेचे विचार तरी सर्वमान्य कोठें होते ?

पण भाषा हें त्यांचें हत्यार होतें. म्हणून शास्त्रीबुवांच्या मतांविषयीं ज्यांना आदर नाहीं, अशांनींहि त्यांच्या भाषेच्या उत्कर्षाबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजेत. शास्त्रीबुवांच्या स्वार्थत्यागाविषयीं लो. टिळक म्हणतात कीं 'त्यांनीं सरकारी नोकरी सोडली ती पुढील अंदाज पाहून सोडली हा कांहीं त्यांचा दोष नव्हे. पण पोट भरण्याची पंचाईत नाहीं इतकें पाहून खात्री झाल्यावर तरी नोकरी सोडली हा त्यांचा गुण आहे. असें तरी किती लोक करतात? अदमास पाहिला ही कांहीं त्यांची चूक नव्हे. तर अदमास पुरा झाल्या-वरहि द्रव्य किंवा अधिकार यांच्या लालुचीनें नोकरी करीत राहतात, त्यांच्या मानानें तरी शास्त्रीबुवांचा स्वार्थत्यागच होय. स्वार्थत्यागाची व्याख्या ठरविणें कठिण आहे. पण जेव्हां स्वार्थ देशकार्याच्या आड येईल तेव्हां जो मनुष्य तो बाजूला सारील तोच स्वार्थत्यागी.

• • •

ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम २६९१०
विभाग ग्रा.वा.
क्रमांक ११८८
नों. दि. ३-७-६१

# कांहीं स्मृति

श्री. ना. दा. सावरकर यांनीं लोकमान्य टिळकांच्या एका भेटीच्या वेळीं झालेल्या भाषणाची आठवण दिली आहे. सामान्य बोलणें थोडा वेळ झाल्यावर मीं विष्णुशास्त्र्यांच्या मराठी भाषेवरील अधिकाराबद्दल बोलणें काढलें. तेव्हां लोकमान्यांना जणूं एकदम एखादा प्रिय विषय निघाला असें वाटून ते म्हणाले कीं, " ज्ञानेश्वरीच्या लेखनानें मराठी भाषेंत जसें कांहीं एक नवीन युग निर्माण झालें, तसेंच विष्णुशास्त्र्यांच्या निबंधमालेनें एक नवीन युग निर्माण केलें."

× × ×

गीतारहस्याची किंमत काय ठेवावी याबद्दल चर्चा चालू असतां लोकमान्यांनीं पुढील प्रसंगाची आठवण करून दिली.

" तो प्रसंग म्हणजे १८८० सालीं केसरी सुरू करण्याचे वेळीं विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे घरीं आम्ही बसलों असतां केसरीची वर्गणी काय ठेवावी हा वाद निघाला ! शास्त्रीबुवा व मी एका मताचे होतों. त्या वेळीं वर्तमानपत्राचे धंद्यांत क्रांति होण्यासारखी आम्हीं केसरीची वर्गणी एक रुपया ठेवावी असें ठरविलें. खेडेगांवच्या शाळेंतील पंतोजीसहि आमचें पत्र घेतां यावें अशी शास्त्रीबुवांची व माझी इच्छा होती."

× × ×

वीर वामनराव जोशी यांना स्वदेशसेवेचे पाठ देतांना लोकमान्य त्यांना म्हणाले, " विद्येचें मिष करून सरकारनें आमच्या देशाचें अन्तःकरण पार मारून टाकलें. देशाचें शरीर मेल्यानें मला एवढें दुःख वाटत नाहीं, पण देशाचें मन मेलेलें पाहून मला अतिशय दुःख होतें. मन जिवंत असेल तर

शरीरांत केव्हांहि प्राण भरतां येईल; परंतु मनच मेल्यावर काय करणार? विद्वान् म्हणविणारांना देशकार्याची दिशा कळूं नये याचा सरळ अर्थ हाच कीं त्यांचें मन मेलें आहे. मी आणि गोपाळराव आगरकर शास्त्रीबुवांच्या भेटीस गेलों त्या वेळीं त्यांनीं आम्हांस असेंच उत्तर दिलें. केसरींत व मराठ्यांत लिहीत चला असें शास्त्रीबुवांनीं आम्हांला सुचविलें. तेव्हां 'आम्हांला लिहितां येत नाहीं' असें आम्ही त्यांना म्हणालों. त्याबरोबर झटक्यासरशीं 'तुमचें अंतःकरण देशाकरितां जळतें आहे ना?' असा त्यांनीं सवाल केला व आम्ही 'होय' म्हणतांच 'तर मग तुम्हांला लिहितां आलेंच पाहिजे. तळमळींतूनच शब्द जन्मास येतात; शब्दांपासून तळमळ उत्पन्न होत नाहीं. तुमच्या अन्तःकरणांत जर तळमळ आहे तर तुम्हांला वाचा फुटलीच पाहिजे' असें शास्त्रीबुवांनीं मोठ्या आवेशानें आम्हांस सांगितलें."

• • •

# ' निबंधमालें ' तील कांहीं उतारे

१

मनुष्याची किंवा राष्ट्राची सुधारणा म्हटली म्हणजे तिचा पाया आत्मस्थितीचें पूर्ण ज्ञान हा होय. ज्यास आपली अवस्था काय आहे, पुढें काय होणार, आपलें बळाबळ किती, वगैरे गोष्टींचें चांगलेसें ज्ञान नाहीं, त्याची स्थिति सुधारावयाची नाहीं. तर आमच्या लोकांस प्रथमतः स्वतःविषयींचें ज्ञान करून देणें अवश्य होय...सध्या जगाची हल्लीं स्थिति काय आहे अलीकडे निरनिराळ्या संबंधांनीं पृथ्वींतील देशांचे परस्परांशीं व्यापार कसे सुरू आहेत, त्यांत या आमच्या देशाचें इतरांशीं दळणवळण कोणत्या प्रकारचें आहे, आमच्या राष्ट्राची पूर्वीं स्थिति कशी होती व हल्लीं कशी आहे, आपली पुन्हा भरभराट होण्यास कोणत्या गोष्टी आवश्यक आहेत, इत्यादि विषयांवर सर्वांचा यथार्थ समज होणें हें फार जरूरीचें आहे. हें जोंपर्यंत होणार नाहीं तोंपर्यंत हल्लींसारखेंच पोकळ लोककल्याण व रिकामी बडबड चालेल व वास्तविक उपयोगाचें असें कांहींच होणार नाहीं. ज्यास आपली प्रकृति नीट करून शरीर सुदृढ करावयाचें असेल, त्यानें प्रथम आपल्या प्रकृतीचें मान समजून घेणें जसें अत्यावश्यक होय, त्याचप्रमाणें येथेंहि प्रत्येक मनुष्यास आपल्या देशाची स्थिति पूर्णपणें ध्यानांत येऊन आपलें बळाबळ जेव्हां त्यांच्या पुरतेपणीं मनांत भरेल, तेव्हां आमच्या सुधारणेस आरंभ झाला असें खास म्हणतां येईल.

२

अज्ञानध्वंसनाचीं अलीकडे जशीं जबरदस्त साधनें उपलब्ध झालीं आहेत तशीं पूर्वीं कधींहि नव्हतीं. छापखाने, आगगाड्या, आगबोटी, डांका,

तारायंत्रें वगैरे सर्व अर्वाचीन कलाहि युद्धांत कामीं पडणारीं अशी दिव्य अस्त्रेंच होत असें म्हटलें असतां चालेल, तर या महासाधनांच्याद्वारें आमचा येवढा सारा देश जो कुंभकर्णासारखा निद्रापद भोगीत स्वस्थ व सुस्त होऊन पडला आहे, त्यास हलवून जागें करण्याची प्रथमतः तजवीज झाली पाहिजे...तर देशस्थिति सुधारण्याचा राजमान्य मार्ग म्हटला म्हणजे लोकांस ज्ञानसंपन्न करणें हा होय. ही संपन्नता सिद्ध करण्याचीं दोन मोठीं साधनें म्हटलीं म्हणजे रसना व लेखणी हीं होत. पहिल्या सदराखालीं शाळा व व्याख्यानें येतात व दुसऱ्याखालीं वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें, व ग्रंथ हे येतात.

३

इंग्लिश भाषेंत ज्याप्रमाणें हरएक उपयुक्त व मनोरंजक विषयांवर शेकडों बालबोध ग्रंथ झालेले आहेत व प्रतिवर्षी तयार होत आहेत, तसेच इकडील देशभाषांतून जर होतील तर सहस्त्रावधि लोकांस अल्पायासानें, अल्पकाळानें व अल्पार्थानें पुष्कळ ज्ञान करून दिलेसें होईल. पदार्थविज्ञानाच्या ज्योतिष, रसायन, दर्शनानुशासन, भूगर्भशास्त्र, यंत्रशास्त्र इत्यादि निरनिराळ्या शाखांवर तसेंच इतिहासादि विषयांवर व अनेक लौकिक विषयांवर जर सुबोध ग्रंथ लोकांस वाचावयास मिळतील, तर हल्लीं सामान्य गोष्टींचेंहि लोकांत जें लज्जास्पद अज्ञान दृष्टीस पडतें तें दूर होईल, व विद्यानंदाचा खरा अनुभव घडून आपले सर्व प्रकारचे हक्कहि लोकांस कळूं लागतील.

४

आमच्या या आर्यभूमीच्या संबंधानें जो कोणी विचार करूं लागेल त्यानें प्रथमतः ही एक मोठी गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, हा देश मोठा अवाढव्य आहे. हिंदुस्थानचा विस्तार रशिया देश काढून टाकला असतां बाकीच्या युरोपखंडाएवढा आहे हें सर्वांस माहीत असेलच; तर हिंदुस्थान म्हणजे युरोपांतील एकुणीस राष्ट्रें असें समजलें पाहिजे. या एकुणीस राष्ट्रांत

जसे शेंकडों धर्मपंथ आहेत, शेंकडों तन्हेचे आचारविचार आहेत, शेंकडों भाषाभेद आहेत, तशीच स्थिति हिंदुस्थानांतील आहे. हिंदुस्थान हें जरी या देशाचें नांव आहे तरी यांतच एकीकडे फिरंगाण म्हणजे फिरंग्यांचा मुलूख आहे, एकीकडे हपसाण म्हणजे हपश्यांचा मुलूख आहे, एकीकडे रोहिलखंड म्हणजे रोहिल्यांचा मुलूख आहे, एकीकडे गोंडवन म्हणजे अगदीं रानटी स्थितींतले गोंड लोकांचा टापू आहे; गुजराथचा भाग मुसलमानांनीं हाकून दिलेल्या पारश्यांनीं व्यापला आहे, पंजाब शीखांनीं भरला आहे, याप्रमाणें स्थिति आहे. अचारविचार व रीतिभाति यांच्या संबंधानेंहि या देशांत वरच्यासारखेंच वैचित्र्य आहे. साप जरी चावला तरी त्यास युक्तीनें चिमट्यांत धरून दूर रानांत नेऊन सोडणारे जैनधर्मी श्रावक लोक येथें आहेत, व लग्नेच्या लग्नें बसविणारे फासे पारधी अथवा ठगहि आहेत. पन्नास पन्नास, शंभर शंभर बायका करणारे जसे कुलीन ब्राह्मण एकीकडे आहेत, तशा दुसरीकडे पतिबाहुल्यानें राहणाऱ्या कूर्ग लोकांच्या स्त्रिया आहेत. एकीकडे कन्याघाताची प्रवृत्ति आहे, दुसरीकडे स्त्रीराज्याची अलौकिक तऱ्हा आहे; ज्यांनीं बापजन्मीं कधीं शस्त्रस्पर्श केला नाहीं अशी एकीकडे गुजराथी व बंगाली मंडळी आहेत, तर तरवारीशीं सदोदित काम ठेवणारे व शस्त्रपूत मरणाविषयीं हौस बाळगणारे दुसरीकडे रजपूत व पुरभय्ये आहेत.

निबंधमालेंत वाङ्मयीन निबंधच येत असत अशी जर तुमची कल्पना असेल तर ती चुकीची आहे. विचारप्रवर्तक निबंधांबरोबर सामान्य लोकांचें मनोरंजन व्हावें म्हणून शास्त्रीबुवा " चमत्कारिक माहिती ", " भाषापरिज्ञान ( व्युत्पत्ति वगैरे ) ", " सुभाषितें ", " उत्कृष्ट उतारे ", " विनोद-महदाख्यायिका " इत्यादि सदरें देत. त्यांतल्या त्यांत " विनोद महदाख्यायिका " हें सदर फारच लोकप्रिय होतें. या गोष्टींनीं चित्ताला

आह्लाद तर होतोच पण त्याबरोबरच व्यवहारज्ञान प्राप्त होतें. नमुन्यासाठीं पुढील गोष्टी दिल्या आहेतः —

## ( १ )

## पिकदाणी

एका श्रीमान् गृहस्थाचा एक गांवढळ मित्र त्यास फारा दिवसांनीं भेटावयास आला. पाहुण्याचें घरधन्यानें चांगलें आदरातिथ्य केलें. भोजनोत्तर सुरापान होऊन धूम्रपानास सुरुवात झाली. पाहुणा पडला गांवढळ, तेव्हां त्यास शहरांतला रीतिरिवाज माहीत नसल्यामुळें तो चुट्टा ओढतांना खालीं सतरंजीवर थुंकूं लागला. त्याचा स्नेही तें पाहून त्रासला; पण करतो काय ? त्यास उघडपणें न थुंकण्याविषयीं सांगतां येईना तेव्हां त्यानें आपल्या चाकरास पिकदाणी आणावयास सांगितलें. चाकरानें ती आणून पाहुण्याच्या पायापाशीं मांडली; पण पाहुण्यानें ती लाथेनें दूर केली. चाकरानें पुनः मांडली; पाहुण्यानें पुनः लत्ताप्रहार केला. याचें कारण येवढेंच कीं, पाहुण्यास नेहमींची संवय भुईवर थुंकण्याची, व पिकदाणी म्हणजे काय हें त्यास कधीं माहीतच नाहीं ! शेवटीं चाकरानें तिसऱ्यांदा जेव्हां पिकदाणी मांडली तेव्हां कपाळास आंठ्या घालून त्यास पाहुणा म्हणतो, " अरे, मी पुनः पुनः पायानें दूर करीत असतां हें भांडें तूं वरचेवर माझ्या पायाशीं आणून ठेवतो आहेस; पण विचार पहा; हें येथून आतांच्या आतां काढून न टाकशील, तर मी खचितच त्यांत थुंकल्याशिवाय राहाणार नाहीं ! "

## ( २ )

## वादाचा निर्णय

दोघां शिष्यांचा एकदां असा वाद पडला कीं, सूर्याचा उपयोग अधिक कीं, चंद्राचा अधिक ! एकजण म्हणाला, " सूर्याचा उजेड अधिक, तेव्हां

त्याचा उपयोग जास्त.” त्याचें दुसरा खंडन करतो, “ अरे, सूर्याचा उजेड अधिक खरा पण त्याचा उपयोग काय ? दिवसा अधिक उजेड काय आणि कमी उजेड काय सारखाच ! चंद्राचावरीक खरा उपयोग, कां कीं रात्रीं अंधार असतां तो उगवतो ! ”

( ३ )

## भाषापरिज्ञान

‘ प्रहर ’ या शब्दाचा मूळ अर्थ ‘ ठोका ’ हा होय. पूर्वीं या देशांत धनिकांच्या घरोघर वेळ कळविण्यास पहारेकरी ठेवलेले असत. त्यांनीं दिवसा सूर्याच्या गतीवरून व रात्रीं नक्षत्रांवरून वेळेचें मान ठेवावें व एक प्रहर झाला म्हणजे घड्याळावर टोला देऊन सर्वांस वेळ कळवावी. याप्रमाणें मूळचा अर्थ टोला इतकाच असतां पुढें लवकरच दोन ‘ प्रहरां ’चें अंतर जो तीन तासांचा वेळ त्या अर्थीं वरील शब्दाची प्रवृत्ति पडली असावी. इंग्रजी ‘ वॉच ’ या शब्दाचीं अर्थान्तरें वरच्याप्रमाणेंच झालीं आहेत; व मराठी पहारा याची उपपत्तीहि वरील व्याख्येवरून ध्यानांत येईल.

ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम 2-9-626
विभाग वा.वा
क्रमांक 1986
नों. दि. 3-2-67
IRBK-0103389

किंमत एक रुपया

चित्रशाळा
पुणे